# माणूस

शनिवार । १ मे १९७६ । एक रुपया


## वसईतील ख्रिश्चन तरुण बांधवांचा छोटासा सहा कलमी कार्यक्रम

मुंबईच्या उत्तरेला असलेल्या वसई तालुक्यात सुमारे ५० हजार ख्रिस्ती लोकांची वस्ती आहे. सर्वांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम मराठी आहे. त्यामुळे धर्माने ख्रिस्ती आणि मनाने पूर्णपणे मराठी असा हा वैशिष्टयपूर्ण समाज आहे. लग्नप्रसंगी विविध रूढींनिमित्त अनाठायी खर्च करण्याची जी सर्वसामान्य प्रवृत्ती आपल्या देशात आहे तिला हा समाजही बळी पडलेला आहे.

लग्नप्रसंगी होणाऱ्या अवाढव्य खर्चाला आळा घालण्यासाठी, हुंडापद्धत उखडून काढण्यासाठी, गेल्या ऑक्टोबरमध्ये अर्नाळ ते भुईगाव या आठ गावांत कार्य करणाऱ्या समाजसेवा मंडळाने व स्थानिक धर्मगुरूंनी, कार्डिनल ग्रेशस यांच्या आशीर्वादाने अनिष्ट रूढी निर्मूलन मोहीम चालू केली. यंदा डिसेंबर ते फेब्रुवारी हा वसईतील ख्रिस्ती समाजाचा लग्नाचा हंगाम होता. या हंगामात एकूण १०५ लग्ने झाली; त्यांपैकी ५८ लग्ने नव्या पद्धतीनुसार झाली.

जुन्या पद्धतीनुसार लग्नसोहळा शनिवार, रविवार असा दोन दिवस चाले. नेहमीप्रमाणे लाऊडस्पीकर्स, वाजंत्री आलीच ! लग्नाला येणाऱ्या सर्वांनाच जेवण देण्यात येई. या जेवणावळी दिवसभर चालत. जेवणानंतर मद्यपान करण्याची पद्धत होती. या ना त्या नावाखाली नवरेमुलगे चतुराईने हुंडा वसूल करीत. या सर्व जुन्या रूढी टाकून देऊन त्यावर नव्या कार्यक्रमाची प्रस्थापना समाजसेवा मंडळाने केली. नवा कार्यक्रम असा– १ : लग्नविधी एकाच दिवसात पार पाडावा व आदल्या दिवशीचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत. २ : वाजंत्री शक्यतो एक दिवसाची असावी. लाऊडस्पीकर्स अजिबात लावू नयेत. ३ : वधू वा वराकडे कोणत्याही प्रकारच्या जेवणावळी दिल्या जाऊ नयेत. ४ : विवाहविधी संध्याकाळी ३ ते ४ या कालावधीत पार पाडले जावेत– (म्हणजे आपोआप अर्ध्या दिवसात समारंभ आटोपता येईल. ५ : वधूवरांचा स्वागत समारंभ शक्यतो एकत्रितपणे साजरा व्हावा. तसे शक्य नसल्यास वधूपक्षाकडे धावती भेट देऊन वरपक्षाकडे ताबडतोब वरात नेण्यात यावी. वरपक्षाकडील स्वागत समारंभ अत्यंत साधेपणाने व अल्प खर्चात होईल याची दक्षता घ्यावी. ६ : वधूपक्षाकडून सोन्याची साखळी, घड्याळ, सूट, सायकल, कपाट व दागदागिने इत्यादी गोष्टी हुंड्याच्या रूपाने मागण्यात येतात. अशा प्रकारच्या घृणास्पद मागण्या केल्या जाऊ नयेत व पुरविल्या जाऊ नयेत.

पहिल्याच वर्षी हा नवा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला. सुमारे ६० टक्के कुटुंबांनी या पद्धतीचा स्वीकार केला. एकाएकी हे समाजपरिवर्तन झाले कसे ? लग्नासाठी अनाठायी खर्च करावा लागतो म्हणून समाज आधीच कंटाळलेला असतो, पण हे दुष्टचक्र भेदायचे कोणी, असा प्रत्येक व्यक्तीपुढे प्रश्न असतो. म्हणून तो कुणी तरी सुरूवात करील का, याची वाटच पाहत असतो. 'ऑल टॉक अबाऊट इट, बट नोबडी डझ एनिथिंग'–अशा परिस्थितीत हा समाज असताना एक सामुदायिक मोहीम म्हणून हा कार्यक्रम पुढे आला. लग्न मोसमाच्या दोन महिने अगोदर, समाजसेवा मंडळाचे पदाधिकारी, तरुणवर्ग, आणि गावातील धर्मगुरू

पृष्ठ २ वर चालू

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : सत्तेचाळीसावा**

**१ मे १९७६**

**मूल्य : एक रुपया**

**संपादक**
श्री. ग. माजगावकर
**साहाय्यक**
दिलीप माजगावकर
**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


यांनी प्रचाराची जोरदार फळी उभारली. ज्यांची लग्ने होती अशा वधुवरांना समाजसेवा मंडळाच्या उत्साही कार्यकर्त्यांनी व धर्मगुरूंनी विश्वासात घेतले, त्यांना नव्या पद्धतीचे प्रयोजन समजावून दिले आणि त्यांची संमती मिळवून घेतली. जुन्या पद्धतीमुळे होणारे तोटे आणि नवीन पद्धतीमुळे होणारे फायदे, धर्मगुरू दर रविवारी प्रवचनांतून समजावून देऊ लागले. तसेच, जे लोक विरोध करीत होते व जीर्ण रूढींनाच चिकटून बसण्याचा अट्टाहास करीत होते अशांची समजूत धर्मगुरूंनी आपले वजन खर्च करून केली. समाजसेवकांनी गावोगावी प्रचारसभा घेऊन नवा कार्यक्रम लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न केला.

अशा या सर्व दिशांनी केलेल्या प्रचारामुळे व जिद्दीच्या कार्यामुळे लोकमत तयार झाले आणि अनेकांनी हे आव्हान स्वीकारले. अर्थात पहिल्याच वर्षी १००% यश मिळेल अशी अपेक्षा करणे गैरवाजवी ठरेल. तरीही जाल, भुईगाव आणि निर्मळ या गावांनी विक्रम केला. भुईगावी ६ पैकी ५ लग्ने नव्या पद्धतीनुसार झाली. जाल आणि निर्मळ या गावी १००% यश मिळाले याचे श्रेय बहुतांशी लोकांचे लाडके फादर एडवीन कोलासो व फादर अभियो यांना द्यावे लागेल. आगाशीला २४ पैकी तीनच लग्ने नव्या पद्धतीने लागली. 'याचे उट्टे आम्ही पुढच्या वर्षी भरून काढू.' असे काही तरुणांनी मला सांगितले.

काही लोकांनी वरील ६ कलमी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे काही नव्या कलमांची भर घातली. उदा. मद्याचा वापर टाळणे, मटण-मासळीची जेवणे महाग पडतात म्हणून फक्त शाकाहारी भोजन करणे, लग्नाचे औचित्य साधून दानधर्म करणे, आदी गोष्टी नवविवाहितांनी केल्या. नंदाखाळा या गावातील श्री. आलेक्स लोपीस आणि लुईजा कोरिया या वधुवरांनी आपली विवाहपत्रिका संयुक्तपणे छापली. दोघांनी एकत्र स्वागत-समारंभ केला व खर्च विभागून घेतला. स्वागत-समारंभ साधेपणाने म्हणजे रु. ५०० मध्ये उरकला. 'हे तुम्हाला कसे शक्य झाले?' असे मी विचारले असता, श्री. लोपीस म्हणाले, 'केकपीस ३० पैसे, पेपिनो ड्रिंक ५० पैसे, वेफर्स १० पैसे, वडे १० पैसे आणि केळी घरच्या बागेतील. म्हणजे प्रत्येक व्यक्तीमागे आम्हाला १ रु. च खर्च आला.' समाजाला अशा प्रकारे आदर्श घालून दिल्याबद्दल समाजसेवा मंडळातर्फे रेव्ह. फा. तवारीस यांच्या अध्यक्षतेखाली नववधूवरांचा सत्कारही करण्यात आला.

भुइगावचे श्री. एलिस फ्रान्सिस डायस हे आपल्या आईवडिलांचे एकुलते चिरंजीव. सधन कुटुंब. खूप वर्षांनी घरी कार्य निघालेले. आपल्या एकुलत्या मुलाचे लग्न खूप गाजावे, अशी साहजिकच आईची इच्छा. आजूबाजूच्या लोकांच्याही खूप अपेक्षा. तरीही श्री. फ्रान्सिस यांनी नवीन पद्धतीनुसार लग्नसोहळा साजरा केला. मी त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली व हे परिवर्तन कसे झाले याबाबत विचारणा केली. ते म्हणाले, 'लग्न जुन्या पद्धतीनुसार करावे, गावजेवणे व जेवणावळी द्याव्यात असे आम्ही लग्नाच्या पाच-सहा महिने अगोदरच ठरविले होते. त्यानंतर समाज सेवा मंडळाचा कार्यक्रम आला. आमच्या चर्चचे फा. कोरिया यांनी आम्हाला नव्या पद्धतीचा स्वीकार करण्याचा खूप आग्रह केला. त्यात आमच्या गावातील तरुणांनी व आमचे मित्र श्री. दाबटे यांनी आम्हाला प्रोत्साहन दिले आणि आम्ही दुपारी १ ते ७ या वेळात सारा समारंभ आटोपून घेतला. बँडवाल्यांना संपूर्ण दिवसाचे पैसे दिले होते, तरी त्यांना अर्ध्या दिवसापुरतेच येण्यास सांगितले!' 'याबाबत तुम्हाला विरोध सहन करावा लागला असेल!' मी विचारले. 'अर्थात, पण तो पचविण्याची आम्ही तयारी ठेवली होती. आज चार शिव्या खाव्या लागतील, पण उद्याची पिढी आपल्याला धन्यवाद देईल ना. आपण आता पुढे पाहायला शिकले पाहिजे...' ते आत्मविश्वासाने म्हणाले.

उमराळे गावातील श्री. फिलिप घोन्साळविस (एम. ए.) या तरुणाने सहा कलमी कार्यक्रमाचे तंतोतंत पालन केले. या कामी त्यांना गावातील सुशिक्षित मित्रांनी खूप सहकार्य दिले. अल्प खर्चात लग्न उरकल्यामुळे झालेल्या बचतीमधून त्यांनी संत जोसेफ स्कूल, उमराळा या शाळेला २०० रु. ची देणगीही दिली.

—फ्रान्सिस दिब्रिटो

# दऱ्याखोऱ्यातून । शेतातून । झोपड्यातून ।

## ग्रामायन शिबिर

गेल्या वर्षी ग्रामायन संस्थेने मिरजेजवळील म्हैसाळ येथे विद्यार्थी-शेतमजूर शिबिर आयोजित केले होते. आठवडाभर पुण्याचे विद्यार्थी या शेतमजुरांच्या झोपड्यात राहिले, त्यांच्याबरोबर शेतात राबले, एकत्र जेवले-झोपले. संध्याकाळी व्याख्याने, रात्री करमणुकीचे कार्यक्रम, आसपासच्या खेडेगावातून भटकंती—असा या शिबिराचा भरगच्च कार्यक्रम होता. समारोपासाठी पुण्याचे त्यावेळचे महापौर भाई वैद्य व आणखी काही कार्यकर्ते मुद्दाम म्हैसाळला गेले होते व दिवसभर राहून त्यांनी शिबिराच्या कार्यक्रमात भागही घेतला.

यंदा असेच शिबिर पुणे-मुंबई रस्त्यावर, कामशेतजवळील नायगाव येथे घेण्याचे ठरले आहे. या परिसरातील ग्रामीण भागाची स्थिती म्हैसाळपेक्षा अगदी वेगळी. म्हैसाळला शेतमजुरांशी संबंध होता. नायगाव भागात लहान शेतकरी बहुसंख्येने आहेत व शेतीला जोडून काही लहान उद्योगधंदेही या भागात चालू आहेत म्हैसाळ नागरी विभागापासून बरेचसे तुटलेले आहे. नायगाव परिसर हा नागरी विभागांशी, पुणे-मुंबईशी अर्धवट जोडला गेलेला परिसर आहे. घरटी एक माणूस तरी शेतीशिवाय आसपासच्या उद्योगधंद्यात गुंतला गेलेला असावा. म्हणजे विद्यार्थी-लहान शेतकरी-कामगार असा या शिबिराचा चेहरामोहरा आहे.

हे शिबिर नायगाव येथे घेण्याची सूचना तळेगाव येथील इंद्रायणी महाविद्यालयाच्या चालकांकडून आली. या महाविद्यालयाला नायगाव येथे थोडी जमीन दान म्हणून मिळालेली आहे. या ठिकाणी एक ' ग्रामीण विकास केंद्र ' स्थापन करावे अशी चालकांची कल्पना आहे. या केंद्रात शेतीशिक्षणाशिवाय आसपासच्या भागात चालू असणाऱ्या वा होऊ शकणाऱ्या लहान लहान व्यवसायांचे शिक्षणही दिले जावे, या केंद्रामुळे महाविद्यालयाचा व त्यासभोवतालच्या परिसराचा, त्यातील लोकजीवनाचा दुवा जोडला जावा, असाही चालकांचा प्रयत्न आहे. ग्रामायन शिबिरामुळे या प्रक्रियेला सुरुवात व्हावी अशी अपेक्षा आहे.

इंद्रायणी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बहुसंख्य विद्यार्थी आसपासच्या भागातील शेतकरी किंवा कामगार कुटुंबातील आहेत. यांपैकी काही विद्यार्थी या शिबिरात असतील. पुण्याहून आलेले काही कार्यकर्ते—विद्यार्थी व स्थानिक विद्यार्थी, दोनदोनचे लहान गट करून सुरुवातीला या परिसरात चार दिवस हिंडतील—परिसर पाहतील, लोकांचे प्रश्न-अपेक्षा समजावून घेतील व निसर्गसुखाचा आस्वादही घेतील. चार दिवस या इंद्रायणीच्या खोऱ्यात मनमुराद हिंडल्यावर दोन दिवस नायगावला पुन्हा एकत्र जमतील. आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण करतील. नायगावला होणारे विकास केंद्र कसे असावे याविषयी काही विचारविनिमय होईल व करमणुकीच्या कार्यक्रमाने या शिबिराची सांगता होईल.

आठवडाभरात यापेक्षा अधिक काय होणार ?

शहरी विद्यार्थ्यांना आसपासच्या ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध करून देणे एवढाच मर्यादित हेतू दृष्टीसमोर ठेवून ' ग्रामायन ' कडून अशी शिबिरे योजली जातात. विशेषतः स्थानिक मंडळींचा पुढाकार या शिबिरात राहावा याकडे कटाक्षाने लक्ष पुरविले जाते. ग्रामीण भागाचा ' उद्धार ' वगैरे दृष्टिकोन यात बिलकुल नाही.

आठवडाभर एकत्र राहून अनुभवांची फार तर देवाण-घेवाण होऊ शकते, ओळखी वाढतात, गुंतागुंतीने भरलेले लोकजीवन थोडेफार समजू शकते.

नायगावच्या परिसरातील हे लोकजीवन आहे कसे ? ह्या इंद्रायणीच्या खोऱ्याचा इतिहास काय आहे ? येथील निसर्ग कसा आहे ? शिबिराला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या विषयांची थोडी ओळख असावी म्हणून पुढील दोन लेख प्रसिद्ध केले आहेत.

इंद्रायणी महाविद्यालयाच्या चालकांकडून ते पाठविले गेलेले आहेत.

अशी 'ग्रामानुभव शिबिरे' आणखीही महाराष्ट्रात योजली गेलेली असण्याचा संभव आहे. किंवा विद्यार्थी-कार्यकर्ते या उन्हाळी सुटीत लहानलहान गट करून, पदयात्रा काढून किंवा सायकलवरून, एस्. टी. तून ग्रामीण विभागात आठ। पंधरा दिवसांसाठी हिंडण्याचा उपक्रम स्वतंत्रपणे पार पाडू शकतील. या उपक्रमांची टिपणे ठेवून ती ग्रामायनकडे पाठवली तर अशा टिपणांचे, अनुभवाची जोड असलेल्या 'पाहण्यां'चे ग्रामायनकडून स्वागतच होईल !

नायगाव शिबिर : दि. १८ ते २३ मे.

□

# इंद्रायणी परिसरातील निसर्ग

गोपाळ नीलकंठ दांडेकर

ढगांची सावली पुढं धावत होती. ऊन तिचा पाठलाग करीत होतं. पण कितीही धावलं, तरीं ती त्याला सापडत नव्हती. ती पलीकडच्या डोंगरावर चढून नाहीशी होत होती. तिच्या मागं लागलेलं ऊनही तिच्या पाठोपाठ दिसेनासं होत होतं. किती तरी सावल्या. किती तरी उन्हाचे तुकडे. खालच्या कोकणचं एकसुरीपण मावळलं होतं. जणू ते सगळं आता जिवंत झालं होतं. हेलावत होतं. शिवाशिवी खेळत होतं. आपल्याशीच एक भाग लपत होता. दुसरा त्याला खिजवीत होता. शोधून काढीत होता. आकाशात ढग वितळला की, त्या दोन भागांची भेट होत होती. मिठी पडत होती.

काळोखी वाढत चालली, अन् हळूहळू आभाळ गडगडू लागलं. कधी या कोपऱ्यात, कधी त्या कोपऱ्यात. ते गडगडणं दरीभर घुमे. त्याचा पडसाद बराच वेळ ऐकू येत राही. पण एक पडसाद पोकळीत विरतो न विरतो, तोच दुसरी तोफ सुटे. असं ते गडगडणंही पाठशिवणीचा खेळ खेळू लागलं.

त्याच्या मागोमाग नाचऱ्या विजा आभाळावर लकलकू लागल्या. विजा अन् गडगडाट यांची शिवाशिवी सुरू झाली. कधी कधी वीज चमचमे, मग गडगडे. कधी हे उलटं होई. आकाश काळवंडलं असूनही या चमचमाटानं ते आता देखणं दिसू लागलं. काळ्या तोंडाच्या वानरानं दात विचकावेत तसं.

लवकरच हवेत गारवा आला. ते गारपण बुधाच्या अंगाला झोंबू लागलं. त्याच्या देहावर काटा शिरशिरला.. तरी तो जागा सोडून उठला नाही.

अन् शेवटी पाऊस दरीत उतरला. पाहता पाहता दरी दिसेनाशी झाली. सगळ्या उल्काच आभाळातून खाली उतरताना दिसू लागल्या. जणू आभाळ दोहिलं जात होतं. मधूनच वीज चमकली की, सगळ्यांमधून चळकांपलीकडलं दिसे. पण पलीकडेही चळकांशिवाय काहीच नव्हतं.

एके दिवशी पाऊस थोडा उबाला आहे पाहून तो रानात गेला. रान सगळं ओलंचिंब झालं होतं. कड्याच्या पोटाशी जीव धरून असलेल्या चवेणीला कोवळी, कोवळी, पिवळसर हिरवी पानं फुटू लागली होती. एकाच्या पोटात दुसरं, दुसऱ्याच्या पोटात तिसरं. करवंदीच्या जाळ्यांच्या आसऱ्यानं उभा राहून तेरडा आता तरारला होता. त्याला कळ्या येऊन कुठं कुठं तांबडी फुलेही धरली होती. उन्हाळ्याच्या कडाक्यानं गवताचं ठोंब पार वाळून काळं झालेलं होतं. त्यांची मुळंसुद्धा सुकून खडखडीत झाली होती. पण पहिला पाऊस पिताच त्या ठोंबातून लवलवीत कोंब बाहेर पडले होते. होता होता प्रत्येक ठोंब गरगरीत दिसू लागला होता. पाती एकात एक मिसळून जात होती.

परोपरीच्या वनस्पतींची बीजं उन्हाळाभर कशी तरी जीव मुठीत धरून बसली होती. धरतीचा आसरा घेऊन. पहिल्या पावसाने मिठी घालताच हरखली. त्यांचा कोंबावाटे बाहेर पडला. त्यांनी आपले इवले इवले हात आकाशाच्या गळ्यांत घातले.

शेवाळही उन्हाळाभर उन्हाचे भपकारे खाऊन खाऊन तडतडीत झालं होतं. पहिल्या पावसाच्या रूपानं त्याला पुन्हा अमृतवल्ली लाभली होती. प्रत्येक दगड, प्रत्येक खडक त्या हिरव्या शेवाळानं झाकली होती. ती हिरवी शाल झाडांच्या मुळांवर, बुंध्यावर, फांद्यावर, चहूकडे पसरली होती. त्यामुळं सगळं रान कमी–अधिक प्रमाणात हिरवं झालं होतं.

चैत्र–वैशाखात झाडांना फुटलेली तांबूस पालवी आता गहिरली होती. सतेज दिसू लागली होती. आंबा, मोह, हिरडा, आईन–सगळ्याच झाडांची पानं उन्हाविनाच चमकत होती. लकाकत होती.

येळीच्या अन् करवंदीच्या जाळ्यांमधून कसल्या कसल्या वेली घुमारल्या होत्या. गुंजांच्या, गोकर्णाच्या, कांगोणीच्या अन् रानजाईच्या. त्या हात बाहेर काढीत होत्या. त्यांच्या घुमाऱ्याचे हात अजून वळलेले होते. नुकत्या जन्माला आलेल्या बाळासारखे.

सागाची भली ऊंच झाडं अजून टपाटपा पाणी गाळीत होती. त्यांच्या खरखरीत पानांवरल्या काटावळीत पाणी अडकून राहात होतं. ते हळूहळू उतरतीकडे जात होतं, अन् मग–टपटपत होतं.

वाऱ्याची झुळूक समोरल्या पिवळसर गवताची मजा मजा करायची. समुद्रावरल्या लाटांसारख्या गवतावर लाटा उठायच्या. तशाच

मुलायम. तशाच हलक्याफुलक्या. गवतावर तर वाऱ्याच्या झुळुकी मोजतासुद्धा यायच्या. एक यायची, ती सगळं गवत चेपीत पलीकडे निघून जायची. मग दुसरी थोडी हलकी, थोडी नाचरी. तिसरी पुन्हा जोरबाज.

बारीक बारीक दवाचे थेंब आकाशातून झरू लागले. बारीक म्हणजे किती? असे पिठासारखे. राखेसारखे. पांढरे. हळूहळू आकाशातून उतरू लागले. सगळ्याभर पसरू लागले. डोंगरांवर, किल्ल्यावर, रानावर, झुडपांवर, खाचरांवर, झोपडीवर.

जणू आकाशातून देव अमृत शिंपडतोय. त्या अमृताच्या शिंपड्याखाली हे सगळं भिजतंय. देव मोठा दयाळू आहे. त्याच्या मनात लहान–मोठं नाही. जितकं त्याचं प्रेम या जुन्यापुराण्या किल्ल्यावर, जितकं समोरच्या झाडाझुडपांवर आहे. तो सगळ्यांच्यावर दव शिंपडतो आहे.

उगवतीकडे तांबडं फुटलं. त्या अंगाला काळोख होता. तोच आता तांबूस होऊ लागला. आभाळ अगदी स्वच्छ होतं. निखर होतं. यामुळं तांबडी झळाळी एका ठिकाणी उमटताच चहूकडे होऊ लागली. चांदण्या त्या झळाझळीत दडी देऊ लागल्या. हळूहळू त्या झळाळीचा तांबूसपणा वदलू लागला.

उगवती तांबडी झाली, तशी मावळतीही उजळू लागली. तिकडचं हळूहळू दिसायला लागलं. एवढ्यात पलीकडल्या डोंगरांमधून शिट्या फुंकीत आगगाडी इकडून तिकडे गेली. मग डोंगर जसा अंधारातून आभाळात उमटला. त्याच्या अलीकडील दरीही दिसू लागली. सगळं उगवतीकडल्या तांबड्यानं देखणं होऊं लागलं.

हिवाळा सरता सरता पतझड सुरू झाली होती. सगळी झाडं उघडीबोडकी दिसू लागली होती. बारक्या झुडुपांचं काही तेवढंसं जाणवत नव्हतं, पण मोठाली झाडं पार भुतासारखी दिसायची. नुसते सुके हातपाय. डोकी नाहीतच. साग, आईन, हिरडा, उंबर या झाडांचं रूप अगदी बघवेनासं व्हायचं.

त्यातल्या त्यात सागाचं तर भारीच. ते राखी, भुरकट रंगाचं झाड आपली भली सपाटी पानं गाळायला प्रारंभ करायचं. ती पानं बहुधा सगळी किडलेली असायची. सगळ्यांची जाळी झालेली. जेव्हा पान झाडावरून सुटायचं, तेव्हा देठाचा जड भाग खाली व्हायचा. टप्पदिशी ते खाली भुईवर वाजायचं. अशी सारखी टपटप सुरू असायची. मग ते झाड दीनवाणं होऊन उभं राहायचं. वारा भरायला काय शिल्लक राहिलं? एखादी वावटळीची थापट बसली की मग तेवढ्यापुरत्या त्याच्या फांद्या हलायच्या अन् पुन्हा स्थिर व्हायच्या.

अशी सगळ्या झाडांची पानावळ खाली गळायची. वारा सगळ्यांची पानं हिसकून घ्यायचा मग सुरू व्हायचा त्याचा धिंगाणा.

एखादा त्याचा झपाटा आला, की धूळ अन् बारकासारका पालापाचोळा वर उडायचा अन् आकाशात दिसेनासा व्हायचा. पण तो झपाटा अधिक जोरदार असला, की मग अगदी भुईच्या तळापासून सगळं डुचमळायचं. वर उडायला बघायचं. लहान झुडपं अन् बारकी झाडं तर सारखीच घुमत असायची. पण वाऱ्याचा झोत आला की मोठाली झाडंसुद्धा अगदी बुंध्यापासून गदागदा हलायची. झिंज्या पिंजारलेल्या म्हातारीसारखी.

साधे वाऱ्याचे लोटच ही अशी दुर्दशा करायचे. मग वावधुळी उठल्या म्हणजे तर बोलायलाच नको.

कधी त्या दरीतूनच वर येत. कधी मनरंजनाच्या किंवा श्रीवर्धनाच्या अंगानं. कधी कोकणातून. कधी टेमलाईच्या पठारावर त्या उठत. एकदम जणू भुईतून उचंबळत. सुरनळ्यासारख्या. अन् मग त्यांचा घेर वाढत जाई. मथेणीत रवी गरगरा फिरते, तशा त्या एकाच बाजूला भोवंडत.

फाल्गुन लागला. अन् चाफ्याची सगळी पानं गळून पडली. त्यांच्या फांद्यांच्या टोकाला बारीक बारीक कळ्या घुमारल्या. ती टोकं तांबूस चकचकीत दिसू लागली. होता होता कळ्या फुलल्या. सगळं टेमलाईचं पठारं चाफ्याच्या वासानं घमघमायला लागलं.

उम्बराचीही पानावळ पार झडून गेली होती. पण फाल्गुन लागताच त्या झाडाच्या अंगी चैतन्य रसरसलेलं दिसू लागलं. त्याच्याच अंगी तरी का, सगळ्याच झाडांची तीच गत झाली. आवळीही. रानची सगळीच झाडं नव्हाळली. देखणी दिसायला लागली. त्यांच्या फांद्यांच्या हाताना जणू कोवळी तांबूस नखं फुटली. त्या कोवळ्या झळाळीनं सगळं रान श्रीमंत झालं.

पश्चिमेकडे कड्याजवळ एक पिंपळाचं झाड होतं. तो पिंपळ पानं गळून अगदी ओकाबोका झाला होता. पण फाल्गुन लागता जणू काही चैतन्यच खालून उसळ्या मारीत त्याच्या फांद्याफांद्यांतून कोंदटलं. प्रत्येक फांदीनं कात टाकली. जुना खडबडीतपणा हरपला. नवा तजेला अंगी उमटला. त्या फांद्यांच्या टोकाशी तांबूस, नव्हाळलेली, लुसलुशीत पालवी फुटली. एकाच्या गर्भात दुसरं पान. दुसऱ्याच्या गर्भात तिसरं. होता होता फांदोऱ्या हात हात वाढल्या. त्या फांद्यांना तेजस्वी पानं झळझळू लागली. प्रत्येक पान अतिशय देखणं. मऊ. तोंडात घातलं, तर विरघळून जावं. अशा एक दोन नव्हे, हजार हजार पानांनी पिंपळ पाल्हेजला.

बाहव्याच्या झाडानं जुनी पानं टाकली होती. त्याच वेळी फुलांच्या मागोमाग शेंगांच्या डिंगऱ्या टोकांना लटकू लागल्या. त्यांचा रंग जांभळसर हिरवा. पण वर तेज कसं थक्क होऊन पाहात राहावं. वाऱ्याच्या झुळकीबरोबर शेंगांची बोटं हलवून जणू सगळ्या रानाला आवतण देऊ लागला.

पळसाची फुलं करंज्याच्या आकाराची, तसलीच पोकळ. त्यांना नाही म्हटला, तरी नाजुकसा सुगंध. ती पुढल्या अंगानं उमलायची. मग पांढुरक्या पापुद्र्यांतून केशरी पाकळ्या बाहेर यायच्या. पोपटाच्या चोचीत असाव्यात, अशी ती फुलं दिसायची. होता होता सगळा पळस केशरी दिसू लागायचा. जणू काय विठुबाचे वारकरीच खांद्यावर भगव्या पताका घेऊन पंढरीला निघाले आहेत.

टेमलाईच्या पठारावर आंबा बख्खळ. किंबहुना सगळ्याच माचीच्या रानात आमरायांची दाटी. सगळे आंबे रायवळ. कलमी झाडांचं नाव नाही. पण रायवळ आंब्यांचा दिमाखही काही कमी नसायचा. एकीकडे आंब्यांच्या पानांना गळ लागायची. दुसरीकडे त्याच्या फांदोऱ्या पालवू लागायच्या. आंब्यांची कोवळी पालवी सुवासानं घमघमायची. त्या घमघमाटात भर म्हणून दुसऱ्या झाडांच्या

ढहाळचा मोहरू लागायच्या. सगळं रान मोहरून जायचं. भुंगे त्या मोहोरावरून रुंजी घालायचे. मधमाशा मोहोराच्या रोखानं धावत सुटायच्या.

पण होळीच्या मोसमात करंजाची ही पानावळ झडून जायची. मग कोवळया पालवीच्या मागोमाग करंजाची झाडं फुलोराची. बारीर बारीक, पांढऱ्या रंगाची, उग्र वासाची अशी फुलं सबंध फांदी-वर आतून फुटून निघायची. पालवी फुटताक्षणीच पुन्हा करंजाखाली शीतल छाया पसरायची.

रानात वसंतानं प्रवेश केला की, अडुळजसा आपले लांब लांब पानांचे हात बाहेर पसरून वाऱ्याच्या झुळकेबरोबरच ते डोलवायचा.

माचीच्या रानात जसे आंबे, तशाच जांभळी. या जांभळीची जांभळं बारीक. पाटीभर जांभळं खावी तेव्हा पुचकुलीभर गर पोटात जायचा, बियांचा फापटपसाराच भारी. तर त्या जांभळींनाही आंब्याबरोबरच पालवी फुटायची. मोहोर धरायचा.

ओघळीत पश्चिमेच्या अंगाला एक वेळूचं बेट होतं. भलं दाट. सगळे वेळू एकात एक मिसळलेले. उंच आकाशापर्यंत वाढलेले.

ते वेळूचं बेट फाल्गुन लागताक्षणी जुनी पानं टाकून द्यायचं. बेटाच्या भोवताली त्या पानांचा नुसता खच पडायचा. पानं गच्च भरलेली असली की, वारा विचकतबाचकत आत शिरायचा. पण पानावळ झडली की, मग सगळं बेट वाऱ्याला धिंगाणा घालायला मोकळं. एखाद्या बांबूला भुंग्यानं भोक पाडलेलं असायचं. वारा त्यात शिरून शिट्या वाजवायचा.

फाल्गुनाच्या महिन्यात त्या वेळच्या बेटाला पालवी फुटायची. वारा आला की, सगळं वेटच्या बेट सळसळू लागायचं. वारा त्या बेटात शिरायचा खरा, पण सगळ्या बांबूंनी एकमेकांना धरून ठेवलं अस-ल्यावर ते बेट इतर झाडांसारखं गदगदा हलायचं नाही.

असं रान तांबूस पालवीनं साजरं व्हायचं. त्या पालवीचा सुगंध रानभर दाटायचा.

•

पाच दिवसपर्यंत पाऊस कोसळत होता. उसंत न खाता कोसळत होता. साऱ्या रानभर वाहतं पाणी अंथरलं होतं. खाचरं पाण्यानं तुडुंब भरली होती. सगळी जलमय झाली होती. उलंडून उलंडून वाहात होती. एवढे ढेरेदार सागाचे वृक्ष, पण मुकाट्यानं पावसाचा मारा खात उभे होते. तीच गत आंब्याची, हिरडयांची, खैरांची, सौंदडींची अन् हिवरांची. पळसाच्या पानांना एकच काम होतं. वरून आलेलं पाणी झेलायचं. ते खाली टपकवायचं. पुन्हा वर होऊन जागा गाठायची. धडपड करायची. पुन्हा पाण्याच्या मारानं खाली झुकायचं.

आंब्याच्या, सागाच्या आणि मोहाच्या झाडांवरून पाण्याचे लोट खाली कोसळत होते. पाणी त्यांच्या फांद्यावरून खोडांवर उतरायचं. तिथून ते धरतीवर उडी घ्यायचं, पण धरती हेही त्याचं शेवटचं ठिकाणं नव्हतं. ते सारखं ढळतीकडे धावत होतं. त्याचे लहान लहान ओहोळ बनत होते. ते मोठ्या ओहोळांना मिळत होते. तो पाणलोट पिसाळल्यासारखा खडकांना धडका देत होता. झाडांच्या बुंध्यांशी झटा घेत होता.

त्याला निरनिराळे पाणलोट मिळत होते. त्यांच्या मदतीनं तो फुगत होता. धनंतर होत होता, अन् शेवटी हजार फूट खोल खाली दरीत आदळत होता. त्याच्या घनगंभीर आवाजानं सगळी दरी भरून जात होती.

ती सगळी डोंगराची ओळ पावसानं अगदी झाकून गेली होती. रानाचा हिरवा रंग, काळेकभिन्न कडे—हे सगळं पावसाच्या रंगाशी एकंकार होऊन गेलं होतं.

मावळतीकडून ढग लोटत होते. मनरंजन अन् श्रीवर्धनाला अड-कून ते खाली कोसळत होते. विजा नाहीत, ढगांचं गडगडणं नाही. नुसतं पावसाचं कोसळणं—कोसळणं.

त्याच्या त्या घोरांदार आवाजाची धास्ती खाऊन सगळं जणू काही चिडिचिप्प बसलं होतं. केवळ बेडूकच काय ते मधून मधून आरडा-यचे. थांबून थांबून, सूर धरून. बाकी मग अगदी पाखरंसुद्धा घर-ट्यात बसून ते धुवांधार पावसाचे दिवस कसेबसे लोटीत होती. ◻

---

# इंद्रायणीचे खोरे

## सौ. वै. वि. पटवर्धन

---

धन्य तीर्थ इंद्रायणी। धन्य धन्य प्रत्यक्ष शूलपाणी।
तारक ब्रह्म त्रिवेणी। मिश्रित रुपे वाहतसे।

असा ह्या इंद्रायणीचा महिमा। 'अल्याड पल्याड पताकांचे भार। मधे मनोहर इंद्रायणी।' असे ह्या नदीचे वर्णन नामदेवांनी केले आहे. आध्यात्मिकदृष्ट्या, पारमार्थिक क्षेत्रात अशी ही महत्त्वाचे स्थान असलेली इंद्रायणी भूगोलाच्या दृष्टीने नदी कसली, एक लहानसा ओढाच म्हणाना. इंद्रायणीचा एकूण व्याप अवघा ५८ मैलांचा पण हिचा परमार्थक्षेत्रातला अधिकार दांडगा व विस्तारही मोठा.

बारा मावळे पुण्याखाली आणि बारा मावळे जुन्नरखाली. कार्ल्याची लेणी ज्या डोंगरात आहेत त्याच्या उत्तरेस आंद्रा नदीचे खोरे आहे. या नदीच्या खोऱ्याला आंदर मावळ म्हणतात. नाणे मावळ म्हणजे इंद्रायणीचे खोरे. नाणे हे गाव इंद्रायणीच्या उत्तर तीरावर, खड-काळ्यासमोर आहे. कुंडलिका, आंद्रा, सुधा ह्या तीन लहान लहान नद्या कामशेत, सांगवी आणि नवलाखउंबऱ्याजवळ इंद्रायणीला मिळतात. कुबेरगंगा नावाची नदी आळंदीजवळ इंद्रायणीला मिळत असे. तिचे पाणी इंद्रायणीपेक्षा स्वच्छ व निर्मळ. आता ही कुबेरगंगा आटली आहे.

कुरवंडे गावच्या उत्तरेला नदीचा उगम आहे. कुरवंडे गावची समुद्रसपाटीपासून उंची २०८१ फूट आहे. सह्याद्रीच्या माथ्यावर २३०० फूट उंचीवरील कुरवंडे खिंडीच्या उत्तरेला नदीचा उगम आहे. इंद्रायणीच्या उगमापासून आग्नेयेस तीन मैलांवर सुप्रसिद्ध लोणावळा गाव आहे. उगमापाशी इंद्रायणी म्हणजे एक लहानसा ओढाच आहे. सुमारे दोन मैलांपर्यंत नदीचा प्रवाह दक्षिण दिशेने वाहतो. कुरवंडे गावापासून इंद्रायणी दक्षिणपूर्व अशी वाहते. इथून १॥ मैल वाहत गेल्यावर इंद्रायणी लोणावळा धरणाच्या दक्षिण बाजूने जाते. नदीचे पाणी इथे भरपूर वाढते. म्हणजेच ओढयाची

नदी होते. २७०० ते २८०० फूट उंचीवर असलेल्या कुसगाव, डोंगरगाव, औंधा, विसापूर डोंगरांमधून निघणारे अनेक ओढे इंद्रायणीला मिळतात.

कामशेतजवळ इंद्रायणीला कुंडलिका ही उपनदी मिळते आणि सांगवीजवळ तिला भेटते, आंद्रा ! सांगवी उगमापासून १६ मैलांवर आहे. आंद्रा नदी मिळाल्यावर इंद्रायणी खुल्या मैदानातून वाहू लागते. पूर्व दिशेने वाहत वाहत आधी देहूजवळ जाते. आधी तुकाराम महाराजांचे दर्शन घेऊन मग १२ मैलांवर ज्ञानोबांच्या चरणाशी आळंदी गावाजवळ जाते. मग सुमारे २० मैल दक्षिणपूर्व दिशेने वाहत जात उत्तरेला वळून तुळापुराजवळ भीमेला मिळते.

उगमापासून मुखापर्यंत म्हणजे भीमेला मिळेपर्यंतच्या इंद्रायणीच्या प्रवाहाची लांबी ५८ मैलांची आहे. नदीच्या सर्वसाधारण उताराचे प्रमाण मैलाला ८ फूट आहे. विहीरगाव डोंगर सोंडेने (Spur) कुंडलिका आणि इंद्रायणी नद्यांच्या दऱ्या एकमेकींपासून वेगळ्या झाल्या आहेत. विहीरगाव डोंगरची सोंड सुमारे १० मैल रुंद आहे. इंद्रायणी भीमेची उपनदी, भीमा कृष्णेची उपनदी. दख्खनच्या पठाराच्या सर्वसाधारणतः असलेल्या उतारांप्रमाणेच इंद्रायणी खोऱ्याचा उतार वायव्येकडून आग्नेयेकडे आहे. इंद्रायणी खोऱ्याच्या दक्षिणेला पवना व मुळा-मुठा नद्यांची खोरी आहेत, तर उत्तरेला भामा आणि त्याच्याच पुढे भीमेचे खोरे आहे. इंद्रायणीच्या कक्षेत पुणे जिल्ह्यातील मावळ, खेड आणि हवेली हे तीन तालुके येतात.

इंद्रायणीच्या खोऱ्याचा एकूण विस्तार ३८४ चौरस मैल आहे. पाणलोटाचे क्षेत्र १९५ चौरस मैल आहे. खोऱ्याची लांबी सुमारे ४३ मैल आहे. खोऱ्याची जास्तीत जास्त रुंदी १८ मैल आहे. त्या ठिकाणीच कुंडलिका इंद्रायणीला मिळते. पुणे जिल्ह्याचा मध्यभाग आणि बराचसा वायव्य भाग इंद्रायणीच्या खोऱ्याने व्यापला आहे. बोरघाटाजवळून रेल्वे मार्ग व मोठे राजरस्ते इंद्रायणीच्या खोऱ्यामधून जातात. त्यांच्या द्वारे सह्याद्रीच्या शिखरांवरून कोकणात जाता येते. विहीरगाव, कुसगाव ह्या डोंगरांच्या रांगांनी खोरे वेढलेले असल्यामुळे येथील भौगोलिक परिस्थिती धरणे बांधण्याच्या दृष्टीने अत्यंत सोयीची आहे. लोणावळा व वळवण ही प्रसिद्ध धरणे त्यामुळेच इथे बांधली गेली आहेत.

मान्सूनमध्ये नदी पुराने फोफावत जाते तर डिसेंबर ते मे ह्या काळात पाण्याची बारीक धार दृष्टीस पडते. कुंडलिका व आंद्रा इंद्रायणीला उजव्या बाजूने मिळतात. उगमापाशी नदीचे पात्र अरुंद आहे. कामशेतजवळ येईतो नदीचे पात्र हळूहळू रुंदावत जाते. मळवली, कामशेत व आळंदीजवळ सुमारे २००० फूट उंचीचे काही डोंगर आहेत. पण विशेष उल्लेखनीय असे उंच पर्वतशिखर ह्या खोऱ्यात दिसत नाही. कुसगाव डोंगर ओळीजवळ २७०० फुटांचे पठार आहे. सतत झीज होत गेल्यामुळे नदीच्या दरीचा आकार व्हीसारखा झाला आहे. कामशेत व शेलारवाडीजवळ नदीच्या पात्राचा उतार २००० फुटांपासून १९०० फुटांपर्यंत उंच-सखल तीव्र होतो. पाण्याचा जोर जास्त आहे. नदीच्या पात्राचा मध्यभाग खडकाळ व उथळ आहे. उंची व पृष्ठभागानुसार सामान्यतः इंद्रायणी नदीच्या खोऱ्याची तीन टप्प्यांत विभागणी करता येते. दोन्ही तीरांवरील उतार सौम्य प्रकारचे आहेत. कामशेतपर्यंतचा २००१ फुटांचा भाग, कामशेतपासून शेलारवाडीपर्यंतचा १९०२ फुटांपर्यंतचा मध्यभाग, शेलारवाडी ते तुळापूरपर्यंतचा खालचा भाग. ३००० फुटांवरील प्रदेशाच्या खोऱ्याचा बहुतांश भाग सपाट प्रदेशाचा आहे. ह्या भागात नदीला अगदी कमी उतार आहे. आंद्रा मिळाल्यावर नदी वळणावळणाने वाहते. शेवटी सपाट वाहत जाते. तिसऱ्या भागात झीज जास्त, त्यामुळे पाऊस जास्त. इंद्रायणी ही भीमेची उपनदी असूनसुद्धा नदीच्या जीवनातल्या, डोंगराळ भाग व मैदानी भाग व संगमाजवळचा संथ उताराचा विभाग अशा तिन्ही अवस्था दाखवते.

उगमापासून कुंडलिका मिळेपर्यंत नदीची प्रथमावस्था. हा भाग रुक्ष, खडबडीत. अनेक लहानलहान ओढे ह्या भागात मुख्य प्रवाहाला मिळतात. विहीरगाव व कुसगाव डोंगरांच्या दोन्ही बाजूने येणारे उभार एकमेकींच्या अगदी जवळ आहेत. ह्या प्रथमावस्थेत नदीच्या खोऱ्याचा आकार व्ही अक्षरासारखा झाला आहे. हे ह्या भागाचे खास वैशिष्ट्य. ह्या अवस्थेत प्रवाहाचा उतार जास्त, दुसऱ्यात जरा कमी आणि तिसऱ्या व शेवटच्या अवस्थेत उतार अगदीच कमी असतो. नदीची गती वळणदार आहे. ज्वालामुखीच्या सततच्या उद्रेकाने बनलेले ट्रॅप खडक ह्या खोऱ्यात आहेत. खनिजे ह्या भागात फारशी नाहीत.

खोऱ्यातील माती काळी अगदी काळी व जरा थोड्या फार फरकाने काळपट, पिवळी, रेताड, मुरमाड जमीन दिसते. जमिनीची खोली व जाडी १॥ ते ४ फुटांपर्यंत आहे. तेथे ती काळी आहे. जमीन सुपीक, गाळाची व चुनखडीमिश्रित अशी आहे.

हवामान : ह्या भागात तिन्ही ऋतू अनुभवास येतात. मार्च ते मे उन्हाळा, जून ते सप्टेंबर पावसाळा, नोव्हेंबर ते फेब्रुवारी हिवाळा.

पाऊस : उगमापासून भीमेला मिळेपर्यंत ह्या भागात वेगवेगळ्या ठिकाणी कमीअधिक पाऊस होतो. लोणावळा भागात पावसाचे वार्षिक सरासरी प्रमाण १८० इंच आहे. तुळापूरला वर्षाला सरासरी २० इंच पाऊस पडतो. इंद्रायणी खोऱ्याच्या वरील भागात वर्षाला सरासरी ६० इंच पाऊस पडतो. कामशेत येथे पावसाचे वार्षिक सरासरी प्रमाण ४० ते ६० इंच आहे. जसजसे पश्चिमेकडून पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण झपाट्याने कमी कमी होत जाते.

शेती : तांदूळ, ज्वारी, बाजरी ही मुख्य पिके. बटाटे, फळभाज्या, ऊस, तूर, हरभरा ही दुय्यम महत्त्वाची पिके घेतली जातात.

पावसाच्या प्रमाणात पश्चिमेकडून पूर्वेकडे जावे तसतसा फरक होतो. त्याचा परिणाम शेतीवर होतो. नदीखोऱ्याच्या पश्चिम भागातच प्रामुख्याने शेती आहे. जमिनीचे प्रकार व पावसाचे प्रमाण यानुसार पिके काढली जातात.

१. सुपीक जमीन, भरपूर पाऊस—तांदूळ.
२. सुपीक जमीन, बेताचा पाऊस—गहू.
३. जमीन फारशी सुपीक नाही व बेताचाच पाऊस—ज्वारी; बाजरी.

हा भाग नदीखोऱ्याच्या पूर्व भागात येतो. लोणावळा, कामशेत, तळेगाव–दाभाडे, देहू, आळंदी ह्या नागरी केंद्रांचा शेतीवर परिणाम होतो. दुग्धव्यवसाय हा मुख्यत्वे गवतावरच अवलंबून असलेला. शेलारवाडी, भावडी, तुळापूर, वडगाव, तळेगाव, महाळुंगे, खालुंबरे, कामशेत येथील शेतकऱ्यांचा मुख्य जोडधंदा हाच आहे. पुण्याला व

आसपासच्या गावी दूध पुरविले जाते. पाण्याच्या टंचाईमुळे फळ-भाज्या विशेष होत नाहीत. शेतीच्या लागवडीच्या नव्या पद्धतींची अजून फारशी माहिती नसल्याने शेती अजूनही जुन्या पद्धतीनेच होते. डोंगराळ प्रदेशातील काही शेतकरी अगदी एका बाजूला पडतात. बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंधच येत नाही. पावसाळ्यात डोंगरावर राहायचे व उन्हाळ्यात उतारावर. परंपरागत पद्धतीने शेती करण्यात येत असल्याने, मनुष्यबळाचा वापर जास्त केला जातो. त्यामुळे एकरी उत्पादन कमी होते. जपानी पद्धतीने भातशेती केल्यास एकरी सध्याच्या दुप्पट उत्पन्न होईल.

ह्या भागातील शेतकरी पावसावर अवलंबून राहणारा. पाऊस जिथे आणि ज्यावेळी जसा सुरू होईल, तशी लागवडीला सुरुवात होते. धानोरे, कुरुली, जांबवडी, उंवरे या गावच्या शेतकऱ्यांना कमी पावसामुळे शेती करणे फार कठीण जाते. ह्या भागात जलसिंचनाची अत्यंत जरूरी आहे. वीजपुरवठा कमी, त्यामुळे जलसिंचनाची सोय होत नाही. आर्थिक स्थिती चांगली नसल्याने, शेतकरी इलेक्ट्रिक मोटर्स व पंप विकत घेऊ शकत नाहीत. फक्त सधन शेतकरी मोटर्स व पंप बसवून शेतीला पाणीपुरवठा करू शकतात.

पश्चिम भागातील जमिनीत प्रामुख्याने एकच पीक घेण्यात येते. खतांचा वापर पुरेसा न केल्याने असे होत असावे. जमिनीची खोली पुरेशी असल्याने वस्तुतः पाणीपुरवठ्याची सोय व खतांचा वापर योग्य त्या तऱ्हेने केल्यास वर्षाला दोन पिके घेणे शक्य आहे.

इंद्रायणी खोऱ्याचा एकूण विस्तार ३८४ चौरस मैल आहे. खेड, हवेली व मावळ या तालुक्यांतील गावे यात येतात.

इंद्रायणी खोरे : जमिनीचा उपयोग

| एकूण जमीन | जंगल | लागवडी-खालील जमीन | लागवडी-खालील पडीक | इतर |
|---|---|---|---|---|
| ३८४·५९ | ४९·९२ | २८१·८५६ | १९·४४ | ३६·६७२ |
| १०० | १३ | ७३·४० | ४·५४ | ९·५४६ |
| ३६० डिग्रीज | ५२ | २६२ - | १४ | १२ |

इंद्रायणी खोऱ्याचा एकूण विस्तार ३८४ चौरस मैल आहे. ३/४ जमिनीचा भाग लागवडीसाठी उपयोगात आणता येईल. जंगलाने फक्त १/७ भाग व्यापला आहे. काही अपवाद वगळता इमारतीच्या बांधकामात झाडांच्या लाकडांचा उपयोग करतात. कागदकारखान्या-साठीही येथील बांबू पाठविले जातात. इंद्रायणीच्या काठच्या वन-स्पतींपैकी रामेठा एक प्रमुख वनस्पती. कागद तयार करण्यासाठी याचा उपयोग केला जातो. उताराकडील जमिनीवर २००० ते २२५० फुटांच्याही उंचीपर्यंत झाडे वाढतात. ज्यूटप्रमाणे दिसणाऱ्या ह्या वनस्पतीचा उपयोग हातकागदासाठी प्रामुख्याने केला जातो. हा कारखाना मळवली येथे आहे. कडुनिंब, करंज, कवठ, धावडा, पळस, पांगारा, फणस, बकुळ, बहावा, बाभूळ, बेहेडा, वाळुंज, शिरीष, शिसवी ह्या काही पानझडी व नित्यपर्णी वनस्पतींच्या व वृक्षांच्या लाकडांचा उपयोग प्रामुख्याने इमारती बांधकाम, गाड्या, शेतीची औते, फर्निचर, होड्या, मूर्ती, नक्षी व कातीव काम, लाकडी पेट्या, खेळणी, तोफगाड्यांची चाके, जळाऊ लाकूड, गाड्यांचे जू इत्यादी कामांसाठी केला जातो. बेहेड्याच्या फळाची, हिरड्याची साल औषधी म्हणून वापरली जाते. पांगारा, पळस, फणस, बाभूळ, शिरीष ह्या झाडांचा वापर गुरांचा खाण्याचा चारा, पाला म्हणूनही केला जातो.

औषधी वनस्पती : औषधी वनस्पती इंद्रायणीकाठी भरपूर मिळतात. अडुळसा, अनंतमूळ, आस्कंद, आवळा, कळलावी, कुडा, गुळवेल, गोखरू, निरगुंडी, बेल, शतावरी बेल वगैरे.

गुरांसाठी चारा म्हणून प्रामुख्याने आंबा, उंबर, जांभूळ, टेंबूर्णी, नांद्रुक, भारंग, मोहा, रायकुडा ह्या वनस्पतींचा उपयोग होतो.

गवत इथे भरपूर, त्यामुळे गवताचा व्यापार ह्या भागात मोठ्या प्रमाणावर चालतो. गोंडवळ, मारवेल, पवना, बोंगरट, शेडा हे गवताचे प्रमुख प्रकार इथे दिसतात.

तांदूळ, ज्वारी, बाजरी ही मुख्य धान्ये. कापूस, ऊस, केळी, शेंग-दाणे, भाजीपाला ह्यांचीही लागवड केली जाते. ज्वारी, तांदूळ, गहू व नागली ही मुख्य अन्नधान्ये. सबंध खोरेभर म्हणजे एकूण जमिनीच्या ५५ टक्के भागात गवत भरपूर वाढते. प्रदेशाच्या पूर्व भागात दुग्धव्यवसाय जोमाने चालतो. आसपासच्या लहानसहान गावांतून गवत, वडगाव व तळेगावला पाठविले जाते. ह्या गवताचा गुरांना वैरण म्हणून, चारा म्हणून वापर केला जातो. वर्षातून एकदा गवताचे गठ्ठे, भारे पाठविणे सोपे जाते. पश्चिमेकडच्या डोंगराळ भागात प्रामुख्याने भातशेती होते. मळवली, कामशेत, कार्ले, पाथर-गाव, कुसगाव ह्या ठिकाणी तांदूळ प्रामुख्याने पिकविला जातो. जंगल नसलेले डोंगराचे उताराचे भाग भाताच्या लागवडीसाठी वापरतात. ह्या प्रदेशातील फिकट तपकिरी जमीन भाताला अगदी योग्य आहे.

शेतकी संशोधन-केंद्र वडगाव ही संस्था आज मावळ भागातले भातसंशोधनाचे उपकेंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. भाताच्या सुवासिक जातींबद्दलचे संशोधन ह्या ठिकाणी चालू असते. १० जून १९४० मध्ये ह्या केंद्राच्या कार्यास प्रारंभ झाला. भातावर विविध प्रकारचे संशोधन इथे केले जाते. पुण्यापासून २४ मैलांवर वडगाव येथे हे केंद्र आहे. कोकण व देश दोन्ही भागांना केंद्र मध्यवर्ती आहे. केंद्राकडे एकूण ४८ एकर जमीन आहे, त्यांतली २५ एकर लागवडीखाली आहे. जमीन मध्यम प्रतीची, सखोल. हवामान थंड व कोरडे. पाऊस ५० ते ५५ इंच होतो. आसपासच्या गावांतील शेतकऱ्यांना बियाणे म्हणून वाटप केले जाते. १९४६ साली आंबेमोहोर १५७ ही जात शोधून काढण्यात आली. ही जात गरवी. भात तयार होण्यास १५० ते १५५ दिवस लागतात. एकरी हजार ते बाराशे किलो पीक निघते.

१९५४ साली १५९ आंबेमोहोर ही जात शोधून काढली. वासाला कमी म्हणून हल्ली प्रसार नाही. त्याचप्रमाणे चिमणसाळ ३९ ही जातही शोधून काढण्यात आली. सध्या दोन–चार वर्षांपासून ताय-चुंग, सत्या, सूर्या, आय. आर. ८, जया अशा जाती व इथल्या भातांच्या जातींच्या संकरित पिकांच्या लागवडीचा प्रयोग चालू आहे. भारतीय भाताची रोपे उंच वाढतात व भुईसपाट आडवी होतात, त्यामुळे भात कमी मिळतो. भात जमिनीत गळून जाते. उंची कमी

पृष्ठ २९ वर

# अमेरिकेत गाजलेले पॅट्रिशिया हर्स्ट प्रकरण

**१२** एप्रिल रोजी कॅलिफोर्निया न्यायालयाने पॅट्रिशिया हर्स्टला ३५ वर्षे कारावासाची शिक्षा फर्मावली. प्रथम ९० दिवस ती मानसोपचार तज्ज्ञाच्या देखरेखीखाली राहील. न्यायाधीश कार्टर ह्यांनी असेही सूचित केले की, बँक दरोडा आणि शस्त्रांचा वापर या दोन्ही गुन्ह्यांची शिक्षा एकत्र म्हणजे २५ वर्षे भोगण्याची मुभा देण्यात येईल.

पॅट्रिशिया हर्स्ट प्रकरणाने गेली सुमारे दोन वर्षे, केवळ अमेरिकन जनतेचेच नव्हे, तर जगातील सर्वच नागरिकांचे लक्ष खिळवून ठेवले होते. पॅट्रिशिया ऊर्फ पॅटी ही रँडोल्फ आणि कॅथेरिन हर्स्ट यांची लाडात जोजावलेली सुकन्या. कॉस्मॉपॉलिटन, पॉप्युलर मेकॅनिक्स, गुड हाउसकीपिंग इत्यादी नियतकालिके, आठ वृत्तपत्रे आणि इतर सुमारे ३०० प्रकाशने हर्स्ट कॉर्पोरेशनच्या मालकीची आहेत. कॅलिफोर्नियातील करोडोपतींमध्ये त्यांचे स्थान बरेच वरचे आहे.

पॅटी वयाच्या १९ व्या वर्षापर्यंत श्रीमंत अमेरिकन कुटुंबातील मुलींप्रमाणे चैनीचे सामान्य आयुष्य जगत होती. तिचा वाङ्‌निश्चयही झाला होता आणि आपल्या संसाराची सुखस्वप्ने रंगवत, घर सजविण्यासाठी ती खरेदी करीत होती. आई-वडिलांच्या मर्जीत ती होती. पण हे सुखासीन आयुष्य काळाला पाहवले नाही. ४ फेब्रुवारी १९७४ च्या रात्री तिचे आयुष्य संपूर्ण बदलले. स्वतःला सिंबियॉनीज लिबरेशन आर्मीचे (S. L. A.) सैनिक म्हणविणाऱ्या तीन इसमांनी पॅटीला फरफटत घराबाहेर काढले. ती तेव्हा बर्कले येथे तिचा भावी पती स्टीफन वीड यांजबरोबर राहत होती. त्या लोकांनी स्टीफनला बाटलीचा ठोसा मारला आणि पॅटीला एका मोटारीच्या डिग्गीत कोंबून पळवून नेले.

पॅटीवरच्या या अत्याचाराने तिचे आयुष्य पार बदलून गेले. फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (F. B. I.) सतरा महिने पॅटीचा शोध घेत होते. तिच्या नाहीशा होण्याने अनेक F. B. I. अधिकाऱ्यांची झोप उडाली होती. तिचा शोध लागत नव्हता म्हणून F. B. I. वर टीका करणारी अनेक पत्रे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत होती. सॅनफ्रान्सिस्कोमधील F. B. I. चे प्रमुख चार्लस विल्यम बेटस् हे त्यामुळे डगमगले नाहीत. धीराने त्यांनी अविरत प्रयत्न चालू ठेवले आणि अखेर १८ सप्टेंबर १९७५ रोजी पॅटीला अटक करण्यात ते यशस्वी झाले. फारसा प्रतिकार न करता ती अटकेसाठी आलेल्या पोलिसांना शरण गेली. 'माझ्यावर गोळ्या झाडू नका, तुम्ही मला पकडले आहे' असं ती म्हणाली.

या सतरा महिन्यांत S. L. A. सैनिकांनी पॅटीच्या वडिलांना अनेक धमक्या देणारी पत्रे लिहिली. एका पत्रात पॅटीच्या वडिलांनी २० लाख डॉलर्स किंमतीचे अन्नधान्य सॅनफ्रान्सिस्कोमधील गोरगरिबांना वाटावे अशी मागणी होती. ही मागणी पूर्ण न केल्यास आपल्या मुलीचा छळ होईल म्हणून त्यांनी ती पूर्ण केली.

पॅटीला पळवून नेल्यापासून नऊ आठवड्यांनी पॅटीविषयी सर्वांत आश्चर्यजनक आणि खळबळजनक बातमी त्यांना कळली. तिच्या आवाजातील काही ध्वनिमुद्रित फिती (टेप्स्) त्यांना मिळाल्या. पॅटीने त्यांत अगदी शांतपणे म्हटले होते की, ती सिंबियॉनीज लिबरेशन आर्मीत सामील झाली आहे. ' मी लढण्यासाठी येथेच राहणार असून वडिलांना आपल्या मुलीविषयी चिंता वाटते हे थोतांड आहे.' असेही तिने त्या टेप्स्मध्ये म्हटले होते. टेप्स्बरोबर स्वयंचलित बंदूक घेतलेले तिचे एक छायाचित्र पाठविण्यात आले होते.

दोन आठवड्यांनंतर हर्स्ट दांपत्याला आणखी एक हादरा बसला. सॅनफ्रान्सिस्कोमधील सनसेट जिल्ह्यातील हिबरनिया बँकेच्या एका शाखेवर एक निग्रो इसम आणि चार गोऱ्या मुली यांनी दरोडा घातला. या पाचजणांनी १०९६० डॉलर्स बँकेतून पळवून नेले. पॅटीने आता 'तानिया' हे नाव घेतले होते. त्या चार गोऱ्या मुलींमध्ये तानिया होती. या बँक प्रकरणात तिने एका स्त्रीचा खूनही केला. हातात बंदूक घेतलेले 'तानिया'चे छायाचित्र बँकेच्या कॅमेराने टिपले. ते छायाचित्र हिबरनिया बँकेने पुढे दर्शनी भागातच लावून ठेवले.

एमिली आणि विल्यम हॅरीस हे तिचे S. L. A. तील साथीदार. त्यांनी १६ मे १९७४ रोजी मेल क्रीडा सामानाच्या दुकानात चोरी केली. त्यात ती दोघे पकडली गेली. पॅटी त्यावेळी रस्त्यावर मोटारीत बसली होती. त्या दोघांना आपली सुटका करता यावी म्हणून पॅटीने दुकानाच्या दर्शनी भागावर मशीनगनच्या साहाय्याने गोळ्यांची फैर झाडली. यामुळे त्या दोघांना निसटता आले.

पॅटी स्वतः दहशतवादी किंवा 'शहरी गनीम' (अर्बन गोरिला) आहे की, S. L. A. च्या कारस्थानांना ती बळी पडली या मुद्यावर तिच्या विरुद्ध केस सुरू झाली. बँक दरोडा, एक खून, मेल क्रीडा सामानाच्या दर्शनी भागावर मशीनगनचा भडिमार हे तिच्यावरील मुख्य आरोप होते आणि तेच सिद्ध होऊन तिला आता शिक्षा झाली आहे. तिची करुण कहाणी (जर खरी असेल तर) अंगावर शहारे आणणारी आहे.

४ फेब्रुवारी १९७४ रोजी स्टीफन वीड (तिचा भावी पती) याच्या घरून तिला पळवून नेण्यात आले. त्यावेळी तिचे डोळे बांधण्यात आले होते. सॅनफ्रान्सिस्कोच्या दक्षिणेला डॅली सिटीत एका तळघरातील क्लोजेटमध्ये तिला ५७ दिवस कोंडून ठेवण्यात आले. हे क्लोजेट जेमतेम तिला निजायला पुरेसे होते. यात अन्नपाण्यावाचूनच नव्हे, तर दैनंदिन शरीरधर्मावाचूनही तिला वंचित ठेवण्यात आले. तिच्यावर अनेक जणांनी बलात्कार केला. आठवड्यातून एकदा सर्वांचे सामायिक असनेच दात घासणे

इत्यादी घाणेरडे प्रकार कमीच वाटावे असे प्रकार. उदा.– स्वतःच्या मलमूत्रावरच निजणे इत्यादी तिला करावे लागले. तू पळून जाण्याचा प्रयत्न केलास तर F. B. I. चे लोक तुला गोळ्या घालून ठार करतील अशा धमक्याही तिला वारंवार देण्यात आल्या. 'मी स्वत: शहरी गनीम बनले असून आपणहून S. L. A. त सामील झाले आहे' अशा टेप्स् तिच्याकडून ध्वनिमुद्रित करण्यात आल्या. ५७ दिवसांनंतर तिला कपाटातून बाहेर काढण्यात आले. मशीनगन चालवण्याचे तंत्र तिला शिकवण्यात आले. 'तानिया' हे नाव तिला चिकटवण्यात आले. स्वत:ला S. L. A. चा फिल्ड मार्शल म्हणवणारा डोनाल्ड डी. फ्रीझ उर्फ 'सिंक' या निग्रो इसमाने तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला आणि 'सेल'मध्ये हा प्रकार नेहमीच चालतो असे तिच्यावर ठसवले. विल्यम वूल्फ, ज्याला पॅटी 'क्युमो' म्हणत असे, बलात्कार करणाऱ्यांतलाच एक होता.

१७ मे १९७४ रोजी लॉसएंजल्स पोलिसांना S. L. A. ची लपण्याची जागा सापडली. त्यांनी त्या घरावर बंदुकीच्या ५ हजार फैरी झाडल्या. त्यात लागलेल्या आगीत स्वत:ला फील्ड मार्शल म्हणवणारा 'सिंक', विल्यम वूल्फ आणि इतर चार सभासद जळून ठार झाले. हा सर्व प्रकार अमेरिकन दूरचित्रवाणीवर त्याच वेळी दाखवण्यात आला. पॅटी हर्स्ट हीसुद्धा त्याच घरात आहे असे दूरचित्रवाणीवरील घोषिका वारंवार सांगत होती. पण पॅटी त्या घरात नव्हती. एमिली आणि विल्यम हॅरीस यांच्याबरोबर ती वेगळी राहत होती. दूरचित्रवाणीवर आपण आपल्याच मुलीचे प्रत्यक्ष मरण पाहात आहोत, या कल्पनेने तिच्या आई-वडिलांना अतोनात दु:ख झाले, पण जळालेल्या प्रेतांमध्ये पॅटी नाही असे दिसून आल्यावर पुन्हा तिचा शोध घेण्याचे F. B. I. ने सुरू केले. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यापासून पळून ती पेन्सिल्व्हानियातील एका शेतावरील घरात दडून राहिली होती. अखेर १८ सप्टेंबर १९७५ रोजी सॅनफ्रान्सिस्कोमधीलच एका लहानशा घरात ती सापडली.

पॅटीची केस लढवण्यासाठी हर्स्ट दांपत्याने एफ. ली. बेली या नामांकित वकिलांना पाचारण केले. अमेरिकेत गुन्हेगारी खटल्यांच्या क्षेत्रात त्यांचे नाव अग्रेसर आहे. बेली यांच्याविरुद्ध अमेरिकन सरकारी वकील जेम्स एर्ल ब्राऊनिंग (ज्युनिअर) हे होते. ज्युरींमध्ये सात स्त्रिया व सात पुरुष होते. त्यांत समाजातील सर्वसामान्य थरापासून वरच्या श्रेणीपर्यंतचे सगळे लोक होते. कोणी सामान्य गृहिणी, कोणी स्वागतिका, कोणी पोस्टमन, तर कोणी सेनादलातील निवृत्त कर्नल असे ज्युरी होते. न्यायाधीश ऑलिव्हर जे-कार्टर हे होते. दोन्ही बाजूंच्या नामवंत, प्रज्ञावंत वकिलांनी केसचा कसून अभ्यास केला होता. ब्राऊनिंग ह्यांनी तर ३०० तास अभ्यास केला असे बोलले जाते.

पॅटी आणि तिचे वकील बेली यांच्या युक्तिवादातील कच्चे दुवे ब्राऊनिंग यांनी बरोबर शोधून काढले आणि त्यावरच केस जिंकली. ते मुद्दे असे. बँकेच्या चोरीच्या वेळी झिगुर्ड बर्झिन्स् नावाचा एक व्हिएटनामी बँकेत हजर होता. त्याने आपल्या साक्षीत सांगितले की, पॅटीने बँकेच्या प्रवेशद्वारापाशीच काही बुलेटस् टाकल्या होत्या आणि त्या तिनेच उचलल्या. पॅटीने आपल्या साक्षीत सांगितले होते की, बंदूक भरलेली आहे किंवा नाही हे तिला माहीत नव्हते. तिची साक्ष बर्झिन्सच्या साक्षीने खोटी ठरली. घरच्याघरी बाँब कसा तयार करायचा ते पॅटीच्या अक्षरात लिहिलेली एक वही ब्राऊनिंग यांनी न्यायालयात सादर केली त्यावरून समजले. पॅटीच्या पर्समध्ये माकडाची प्रतिकृती असलेला एक हार सापडला तोही ब्राऊनिंग यांनी सादर केला. गळ्यात घालण्याचा हा मेक्सिकन हार विल्यम वूल्फ याने पॅटीला दिलेला होता— प्रेमाखातर–असे ब्राऊनिंग यांचे म्हणणे. विल्यम वूल्फ याच्या मृतदेहाखाली असाच दुसरा हार सापडला. पॅटी आणि विल्यम वूल्फ यांचे प्रेमसंबंध होते. जबरदस्तीचा मामला काही नव्हता असे ब्राऊनिंग यांचे म्हणणे. न्यायाधीश कार्टर ह्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला पॅटीने ४२ वेळा नकार दिला. आपल्या किंवा आपल्या कुटुंबियांच्या जिवाला जर उत्तराने धोका असेल, तर तसे उत्तर द्यायला नकार देता येतो. त्याला Fifth Amendment Pleas असे म्हणतात. या नकारामुळेच मुख्यत: ती केस हरली असे नंतर तिचे वकील बेली ह्यांनी मान्य केले.

S. L. A. ने पॅटीवर मानसिक ताबा मिळवला होता आणि तिने घाबरून जाऊन बँकेवरचा दरोडा पार पाडला असा पॅटीचे वकील बेली यांचा युक्तिवाद होता. ज्याला इंग्रजीत ब्रेन वॉश म्हणतात तो प्रकार तिच्याबाबतीत इतका यशस्वी झाला की, एमिली आणि विल्यम हॅरीस यांना मेल क्रीडा सामानाच्या दुकानातून वाचवण्यासाठी तिने आपणहून मशीनगनचा मारा केला. तिची ही परावर्ती क्रिया (रिफ्लेक्स ॲक्शन) ही तिच्या ब्रेन वॉशचेच प्रतीक आहे. बेली यांनी आपल्या युक्तिवादाच्या समर्थनाकरता अनेक मानसोपचारतज्ज्ञ आणले होते. काही कोरिअन युद्धबंद्यांनीही जाहीररीत्या ब्रेन वॉशने माणसाचा कायापालट होऊ शकतो असे स्वानुभवाने सांगितले. १९६५ ते १९७५ च्या दरम्यान हजारो मध्यमवर्गीय तरुण दहशतवादी बनले. त्यांनीही असाच युक्तिवाद केला होता असे ब्राऊनिंग यांनी आणलेल्या मानसोपचारतज्ज्ञांनी सांगितले.

ज्युरींनी अनेक तास त्यावर विचार केला. ३९ दिवस न्यायालयात हा खटला चालू होता. दोन्ही बाजूंनी मिळून ७१ साक्षीदार उभे होते. शेवटी २२ वर्षांच्या तरुण पॅटीला शिक्षा झाली. पॅटीने कोर्टाचा निर्णय शांतपणे ऐकला. ती म्हणाली, 'ज्यांनी S. L. A. चा छळ सहन केला नाही, त्यांना त्यांची काहीच कल्पना यायची नाही.' ◻

# मरण्याचा हक्क !

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात न्यूजर्सी सुप्रीम कोर्टाने केरन ॲन क्विनलॉन हिला नैसर्गिकरीत्या मरू देण्याचा निर्णय दिला. तिच्या जीवन–मृत्युविषयी एक वर्षभर चाललेला वाद अशा रीतीने संपुष्टात आला.

गेले एक वर्ष ती बेशुद्धावस्थेत आहे. तिचा मेंदू आणि शरीराचा कुठलाही अवयव काम करीत नाही. न्यूजर्सीमधील डेनव्हिले येथील सेंट क्लेअर हॉस्पिटलात ती पडून

आहे. कृत्रिमरीत्या तिचे श्वसन चालू ठेवण्यात आले आहे. तिच्या नाकात आणि हातात अनेक नळचा खुपसण्यात आल्या आहेत. कृत्रिम श्वसनयंत्र नसते तर ती केव्हाच मरण पावली असती.

एकवीस वर्षांच्या केरनला अशा अनैसर्गिक रीतीने किती दिवस जगवायचे हा प्रश्न डॉक्टर्स, तिचे आईवडील आणि कोर्ट यांच्यापुढे होता. ती तिच्या सध्याच्या अवस्थेतून थोडीसुद्धा वरी होण्याची आशा नाही असे डॉक्टरांनी सांगितले आहे. तिचे वडील जोसेफ टी. क्विनलॉन आणि आई ज्युलिया हे रोमन कॅथॉलिक असून त्यांच्या धर्मगुरूने त्यांना केरनला अशा अवस्थेत नैसर्गिकरीत्या मरू देण्यास परवानगी दिली आहे. कृत्रिम श्वसनयंत्राची मदत बंद करून आमच्या मुलीला नैसर्गिकरीत्या मरू द्यावे अशी विनंती त्यांनी कोर्टाला केली.

जगण्याच्या हक्कासारखाच काही परिस्थितीत मरण्याचा हक्क असावा का असा प्रश्न या उदाहरणामुळे पुढे आला आहे. रुग्णाईताला आपल्या अंगाचा दाह सहन होत नसेल तर, तो स्वतःच डॉक्टरांना आपल्याला या यातनांतून सोडवण्याची विनंती करतो. त्याला एखादे जालीम इंजेक्शन देऊन त्याची सोडवणूक करणे हा एक मार्ग असतो किंवा एखादे औषध देऊन ' अधिक घेऊ नकोस हं नाहीतर अपाय होईल ' असा इशारा देणे हा एक मार्ग असतो. रोगी बहुधा दुखण्याला कंटाळून डॉक्टरांचा इशारा न मानता स्वतःच अधिक गोळचा घेतो.

केरनसारख्या रुग्णाच्या बाबतीत तो डॉक्टरांशी कुठल्याच बाबतीत संपर्क जोडायला असमर्थ असतो तेव्हा त्याचे श्वसनयंत्र बंद करणे किंवा दुसरा कुठला आजार उद्भवल्यास त्यावर इलाज न करता नैसर्गिक मरण येऊ देणे हाही एक मार्ग आहे. केरनच्या मेंदूत सर्व बिघाड झाला असून ती कुठल्याही परिस्थितीत वरी होऊ शकणार नाही असे डॉक्टरांनी सांगितल्याने तिच्या आईवडिलांनी कोर्टाकडे तिच्या मरणाची परवानगी मागितली नव्हे तिचे श्वसनयंत्र बंद करून परमेश्वराची इच्छा असेल तसे करण्याची परवानगी मागितली. केरनच्या बाबतीत तिचे श्वसन चालू ठेवणे म्हणजे तिचे मरण पुढे ढकलणे आहे असे त्यांचे म्हणणे होते. ती काही सांगण्याच्या अवस्थेत असती तर, तिनेही हाच निर्णय दिला असता असे ते म्हणाले.

अविवाहित मातांच्या इस्पितळात केरनचा जन्म झाला. ती ४ आठवडयांची असतानाच जोसेफ आणि ज्युलिया क्विनलॉन ह्यांनी तिला दत्तक घेतले. ती न्यूजर्सीतील त्यांच्या घरीच वाढली. ती एक सामान्य मुलगी होती. खेळात ती थोडीफार चमकली. आपल्या दत्तक आईवडिलांच्या प्रेमाच्या छायेत न्यूजर्सीमधील त्यांच्या घरात वाढली. ऑगस्ट १९७४ मध्ये ती आपल्या रॉबीन क्राफ्ट नावाच्या मित्राबरोबर दुसऱ्या घरात राहू लागली. ती जरा जादा 'दारूबाज' झाली होती असे तिचे इतर मित्र सांगतात.

१४ एप्रिल १९७५ रोजी केरन, थॉमस फ्रेंच या आणि इतर काही मित्रांबरोबर कुणाचा तरी वाढदिवस साजरा करण्यासाठी लोक लॅकाधाना येथे गेली होती. आदल्या दिवशी केरनने काही 'गोळचा' चढवल्या होत्या असे थॉमस फ्रेंच सांगतो. केरनने जीन घेतल्या-. बरोबर ती पांढरी पडू लागली. फ्रेंच तिला घरी घेऊन गेला. थोडयाच वेळात तिचा श्वासोश्वास थांबला. तिच्या मित्रांनी रुग्णवाहिका बोलावून तिला हॉस्पिटलात हलवले. तेव्हापासून ती कधीही 'उठली' नाही.

कोर्टाच्या निर्णयाने जोसेफ आणि ज्युलिया यांना आनंद झाला असे म्हणणे क्रूरपणाचे आहे. आपल्या दत्तक मुलीवर त्यांनी जिवापाड प्रेम केले. श्वसनयंत्र थांबताच काही मिनिटांतच ती परमेश्वरी इच्छेने मरेल हे त्यांना दिसते आहे तेव्हा तिचे श्वसनयंत्र कोणी बंद करावयाचे हे ते ठरवीत आहेत.

— विजया जोशी

# शेजाऱ्यांशी संबंध

## टिकाऊ सहकार्यातील अडचणी

वा. दा. रानडे.

चीनशी वकिलातीच्या पातळीवर राजकीय संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याचा निर्णय भारताने घेतल्यानंतर पश्चिम आणि पूर्वेकडील आपल्या दोन शेजाऱ्यांच्या संबंधातही महत्त्वाच्या घटना घडल्या.

पाकिस्तानशी अनिर्णीत प्रश्नांवर वाटाघाटी करण्याची तयारी पंतप्रधान श्रीमती गांधींनी दर्शविली व पाकिस्ताननेही त्यास होकार दर्शविला. बोलणी कोणत्या पातळीवर व्हावयाची हे आता लौकरच विचारविनिमयाने ठरेल. वाटाघाटीत मुख्यतः विमान, रेल्वे, रस्ता वाहतूक पुनः सुरू करणे आणि राजकीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी उपाय योजणे या प्रश्नांवर विचार व्हावयाचा आहे.


पाकशी वाटाघाटींचा आतापर्यंतचा अनुभव फारसा चांगला नाही. सिमला करारने दोन्ही देशांच्या संबंधात मैत्री व सहकार्याचे नवे युग सुरू होणार अशा आशा हा करार झाला तेव्हा व्यक्त करण्यात आल्या होत्या, पण तसे काही घडलेले नाही. दोन्ही देशांत टपाल वाहतूक सुरू होणे, मर्यादित प्रमाणात व्यापार सुरू होणे यांसारखी थोडी प्रगती झाली असली तरी अजून अनेक प्रश्न अनिर्णित आहेत. विमान वाहतूक पुनः सुरू करण्याचा प्रश्न पाकच्या आडमुठ्या धोरणामुळेच अनिर्णित राहिला. प्रश्न आपसात वाटाघाटींनी सोडवायचे ठरल्यानंतर आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेकडे केलेली तक्रार पाकने मागे घेतली पाहिजे अशी भारताची मागणी होती. भारताचे एक विमान १९७१ च्या प्रारंभी श्रीनगरहून लाहोरला वळवून नेऊन तेथे ते जाळण्यात

आले. त्याच्या निषेधार्थ भारताने पाकशी विमान वाहतूक बंद केली व आपल्या प्रदेशावरून पाक विमानांच्या उड्डाणांना बंदी केली. त्याविरुद्ध पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेकडे तक्रार केली. ही तक्रार मागे घेण्याचे पाकने आतापर्यंत नाकारल्यामुळे या प्रश्नावरील बोलणी अडून राहिली होती. भुट्टोंनी २७ मार्चला श्रीमती गांधींना पाठविलेल्या पत्रात ही तक्रार मागे घेण्याची तयारी दर्शविली, त्यामुळे एक अडथळा दूर झाला. म्हणूनच पाकशी वाटाघाटींची तयारी भारताने दर्शविली.

पण या एका प्रश्नापुरता तरी पाकने आपला आडमुठेपणा का सोडला ? भारताने चीनशी संबंध सुधारण्यासाठी केलेली हालचाल हे त्याचे महत्त्वाचे कारण. भारत–चीन संबंध सुधारण्याने आशियाच्या राजकारणाचे आतापर्यंतचे चित्र बदलण्याचा संभव आहे. एका बाजूस पाकिस्तान, अमेरिका व चीन आणि दुसऱ्या बाजूस भारत व रशिया असे दोन गट किंवा आघाड्या निर्माण झाल्या होत्या. शेख मुजीब अधिकारावर असेपर्यंत बांगला देश भारताच्या बाजूस होता, पण लष्करी क्रांतीनंतर तो पाकच्या बाजूला झुकल्याचे दिसत आहे. चीन हा आपला कायमचा दोस्त आणि भारत–चीन कायमचे शत्रू असे आतापर्यंत पाक नेते मानीत आले, पण भारत–चीन संबंध सुधारले तर, चीनला पाकच्या मैत्रीचे महत्त्व विशेष वाटणार नाही. आशियातील राजकारणात रशियाचा प्रभाव वाढू नये म्हणून अमेरिका व चीनने पाकिस्तानला आपला दोस्त मानून त्याला लष्करी व आर्थिक मदत केली, पण आता भारताप्रमाणे रशियानेही चीनशी संबंध सुधारण्याची तयारी दर्शविली आहे. या प्रयत्नास यश आले तर, चीनच्या पाक व अमेरिकाविषयक धोरणातही बदल होण्याची शक्यता आहे. या बदलत्या परिस्थितीत आपल्या दोस्तांची मदत आपणास पूर्वीसारखी मिळणार नाही व भारताशी सतत संघर्षाचे धोरण परवडणारे नाही या विचारानेच पाकने वाटाघाटींना तयारी दर्शविली असावी.

हवाई वाहतूक पुन्हा सुरू करताना आणि आपल्या प्रदेशातून पाक-विमानांच्या उड्डाणास परवानगी देताना आणखी एका प्रश्नाचा विचार भारतास करावा लागेल. विमानोड्डाणांना ज्या परिस्थितीमुळे बंदी केली तीच परिस्थिती पुन्हा उद्‌भवणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. बांगलादेशचा स्वातंत्र्य-लढा दडपून टाकण्यासाठी विमानांनी लष्कर आणि लष्करी साहित्य पूर्व पाकिस्तान सरकारला पाक सरकार भारतीय प्रदेशावरून पाठवू शकले असते, पण बंदीमुळे त्यांना ही मदत लांबच्या मार्गाने पाठवावी लागली. भारत–बांगलादेश सीमेवर पुनः गोळीबार, चकमकी व अतिक्रमणे होऊ लागली आहेत. बांगलादेशच्या सैनिकांनी मेघालय हद्दीत भारतीय सीमा सुरक्षादलाच्या सैनिकांवर लागोपाठ दोन दिवस गोळीबार केला. बांगलादेशमधील पाकचे हस्तक भारतविरोधी कारवाया करीत असून सध्याचे तेथील सरकार त्यांना आळा घालण्यास एक तर असमर्थ आहे किंवा त्यांना हेतुपूर्वक कुरापती काढावयाच्या आहेत. अशा कुरापती काढण्याचे बळ त्यांना आले कोठून ? हे तुरळक प्रकार आहेत, की त्यामागे काही पद्धतशीर डावपेच आहेत ? आणखी काही दिवसांनी याबाबत अधिक स्पष्ट कल्पना येईल. बांगलामधील पाकहस्तकांना पाकिस्तान व चीनकडून मदत होत आहे काय ! ही मदत चालू राहणार असेल तर, या दोन देशांशी संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांना काही अर्थ नाही, असेच म्हणावे लागेल. पाकची विमान वाहतूक आणि भारतीय प्रदेशावरून उड्डाणे पुनः सुरू झाली तर पाक, विमानांनीही लष्करी मदत पाठवू शकेल. पाकला ७५ कोटी रुपयांची शस्त्रे विकण्याचा करार अमेरिकेने नुकताच केला. भारत व पाक यांच्यात संबंध सुधारण्यासाठी व अनिर्णित प्रश्न सोडविण्यासाठी वाटाघाटी होणार आहेत, त्याचे स्वागत करणारी अमेरिकन परराष्ट्रखात्याची प्रतिक्रिया ज्या दिवशी प्रसिद्ध झाली, त्याच दिवशी पाकिस्तानला अमेरिकेने शस्त्रे विकण्याचा करार केल्याची बातमीही प्रसिद्ध झाली. हा निर्णय अमेरिकेला लांबणीवर टाकता आला नसता का ? अशा शस्त्रखरेदीतून वाटाघाटींना अनुकूल वातावरण निर्माण होत नाही. जगातून मिळतील तेथून पाक शस्त्रे व लष्करी साहित्य खरेदी करीत आहे. एवढ्या शस्त्रांची त्याला आवश्यकता आहे काय ? बांगलादेशही अमेरिकेकडून शस्त्रे घेणार असल्याची बातमी काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाली होती. नंतर तिचा इन्कार करण्यात आला, पण बांगलादेशने प्रत्यक्ष अमेरिकेकडून शस्त्रे घेतली नाहीत तरी, पाकिस्तानकडून त्याला ही शस्त्रे मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पाकशी संबंध सुधारण्याच्या वाटाघाटी करताना पाककडून याबाबतीत हमी मिळविली पाहिजे व ती पाळली जाते की नाही, याबाबत दक्ष राहिले पाहिजे.

बांगलादेशमध्ये कोणती राजवट असावी, हा त्या देशाचा अंतर्गत प्रश्न आहे. गंगेच्या पाण्याच्या वाटपाच्या प्रश्नावर बांगलाशी बिनशर्त वाटाघाटींची तयारी भारताने दर्शविली. आपल्या सदिच्छेचे प्रतीक म्हणून फराक्का धरणातून कमी पाणी घेण्याचा निर्णय भारताने घेतला, पण बांगलाकडून अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. मुजीबच्या खुनाच्या कटाच्या सूत्रधारांनी लिबियामध्ये आसरा घेतला होता. आता ते बांगलास परत येत आहेत. त्यांच्या येण्याने बांगलातील भारतविरोधी शक्ती अधिक प्रबळ होणार आहेत. अशा स्थितीत बांगलाशी संबंध सुधारणे कठीण आहे. बांगलादेशाशी संघर्षाचे संबंध असताना, पाकशी संबंध सुधारण्यात कितपत यश येईल याची शंका वाटते. पाकला भारताशी खरोखर मित्रत्वाचे संबंध हवे असतील तर, बांगलादेशमधील आपल्या हस्तकांच्या कारवाया त्याने थांबविल्या पाहिजेत. □



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण पाच : सुनावणी : १९ जुलै ते ६ नोव्हेंबर

वकिलाला छळणाऱ्या टोचण्या ! त्या जुलै १७ आणि १८, १९४८ च्या दोन दिवसांत मला छळणाऱ्या टोचण्यांची तीव्रता कशी होती याची पूर्ण कल्पना कुणालाही करता येईल का? सौ. परचुरे यांचे त्या दिवसांतले वारंवार माझ्या दृष्टीस पडणारे हिंदुमहासभा-भवनांतले वास्तव्य आणि त्यांचे लाल किल्ल्यातील कोर्टामध्येही येणे–त्यांना बघताच मला आठवे की, एके दिवशी संध्याकाळच्या वेळी ह्याच सौ. परचुरे माझ्याकडे माझ्या कचेरीत आल्या होत्या व मला त्यांनी विनवले होते की, 'डॉ. परचुऱ्यांना–त्यांच्या पतींना वाचवा व माझ्या सौभाग्याचे रक्षण करा–' हिंदू स्त्रीचे सौभाग्य, ज्या करताच ती जगते नि ज्यातच ती स्वतःच्या आयुष्याची धन्यता मानते ! मला आठवे की, एप्रिल १९४८ मध्ये एके दिवशी दुपारी कोर्टामध्ये दाराजवळ उभ्या असलेल्या एका चपराशाशिवाय तेथे कोणी नसताना कसा मी मॅजिस्ट्रेट श्री. अटल यांना भेटलो होतो आणि कसे मी त्यांना विचारले होते की, डॉ. परचुऱ्यांना तुम्ही काय केले आहे; नि मॅजिस्ट्रेट महोदयांनी कसे मला चाचरत पण तुटकपणे सांगितले होते की, कबुलीजबाबाचे कागद त्यांनी बँकेमध्ये ठेवून दिले आहेत ! लालकिल्ल्यामध्ये आल्यावर पहिल्याच दिवशी डॉ. परचुऱ्यांनी मला कसे सांगितले की, ग्वाल्हेरच्या किल्ल्यामधल्या कोठडीत कबुलीजबाबांवर डॉक्टरांच्या सह्या करवून घेताना १८ फेब्रुआरीला मॅजिस्ट्रेट त्यांच्याशी कसे बोलले होते, कसे वागले होते ! दिल्लीला आल्याच्या पहिल्याच दिवशी श्री. भोपटकरांनी कसे सांगितले की, या केसमध्ये डॉ. परचुरे नक्की फासावर चढणार, हेही मला आठवे. एके दिवशी डॉ. परचुऱ्यांनी रडकुंडीला आल्याच्या आवाजात मला म्हटले होते की, कोर्टाने 'कबुलीजबाब सिद्ध मानला तर माझे काय होईल' नि कसे मी तुटकपणे त्यांना म्हटले की, 'वाट्टेल ते' त्याचे स्वर माझ्या कानात ऐकू येत. पण मग हेही मला आठवे की, मीच ना लगेच त्यांना म्हटले आहे की, 'तुम्ही काही काळजी करू नका. ईश्वराची कृपा राहावी, आपण आपल्या-कडून शक्य ते सर्व करू.' माझ्या हाती करण्यासारखे किती थोडे आहे हेही आठवे ! आपल्या कुटुंबियांना तरी वाचवावे याकरिता डॉक्टरांनी कबुलीजबाबावर सह्या करण्याचे जे धैर्य दाखवले, ते माझे नाव त्यांना सांगितले गेले व माझ्या मदतीचा आधार त्यांना वाटला म्हणूनच; हा विचार मनात आठवला की, मी कळवळून जाई आणि हे सर्व खरे असले तरी कोर्टात ते सारे सिद्ध कसे करायचे? मॅजिस्ट्रेट श्री. अटलनी कोर्टात शपथेवर ते सर्व खरे आहे असे सांगितल्याशिवाय ते कसे सिद्ध होणार? जज्ज श्री. अटल ही व्यक्ती कशी आहे हे मला काय माहीत? हे मी कशाच्या आधारावर सांगू? वादी आणि प्रतिवादी आपल्या वादात न्याय मागायला न्यायाधीशासमोर आले म्हणजे न्यायाधीशाला न्यायाचा निर्णय करताना एकाच्या बाजूने तर दुसऱ्याच्या विरुद्ध असा निर्णय करावाच लागतो. पण म्हणून काय हरलेल्या पक्षकाराने न्यायाधीशाच्या प्रामाणिकतेविषयी वाटेल तशा शंका बोलून दाखवाव्या? अशा शंकांची किंमत किती? अशा शंकांवर विश्वास ठेवणे म्हणजे कींवदंतीला प्रमाण मानण्यासारखे होईल. त्याने त्या न्यायाधीशाचे चारित्र्यहनन केल्यासारखे नाही का होणार? कोर्टासमोर श्री. अटलना मी काय विचारू? ते कोर्टाला काय सांगतील? ते काही माझ्या पक्षकाराच्या बाजूने सांगतील का? अगदी कायद्याच्या पकडीत धरल्याशिवाय जज्ज श्री. अटल काही कबुल करतील अशी

आशा ठेवणे व्यर्थ होते. श्री. अटल हे बरेच वरिष्ठ श्रेणीचे अनुभवी अधिकारी होते. त्यांना कायद्याच्या कोंडीत गाठून काही कबूल करायला लावणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. पण मी वकिलाचा व्यवसाय व्रत म्हणून पत्करला आहे; हे काम मी व्रत म्हणूनच पत्करले आहे. माझे पक्षकार कायद्याच्या दृष्टीने निर्दोष आहेत, अपराधी नाहीत असा माझा विश्वास आहे आणि अशा कामात ईश्वर माझ्या मदतीला धावेलच. अशाच काहीशा विश्वासाने मला त्या दिवसांत धीर दिला होता–टोचण्यांची तीव्रता सहन करण्याची शक्ती दिली होती.

विपरीत परिस्थितीमध्ये, भीतीने अपराध-स्वीकृती द्यावी लागली, तर त्यामधून सुटका कशी होते–करून घेता येते, यासंबंधातले निरनिराळ्या न्यायालयांचे प्रसिद्ध झालेले निर्णय मी गोळा केले होते. त्यांतल्या माझ्या प्रकरणाच्या घटनांना अनुकूल अशा निर्णयाच्या मुद्द्यांचे टाचण मी करून ठेवले होते, त्याची मी वारंवार उजळणी केली. डॉ. परचुऱ्यांच्या कबुलीजबाबाची प्रतिलिपी कोर्टामधून मी मागितली होती व ती मला मिळाली होती. त्याची मी कितीदा तरी पारायणे केली. त्या दोन दिवसांत मी कोणाशी बोललो नाही–कोणाशी विचारविनिमय केला नाही. श्री. अटल कोर्टासमोर केव्हा येतात, याची अधीर मनाने वाट पाहत होतो.

१९ जुलैला सोमवार होता. त्या दिवशी सकाळी मी सौ. परचुऱ्यांना विचारले की, आज तुम्ही कोर्टात येणार आहात का म्हणून; तर त्या म्हणाल्या होत्या : 'हो, तुमच्याबरोबरच येणार आहे.' आम्ही कोर्टात लवकरच पोचलो होतो. गेल्याबरोबर मी चौकशी केली की, श्री. दफ्तरी येणार आहेत की नाहीं. तर ते आल्याचे कळले. मी श्रोतृवर्गाच्या खुर्चीवर बसून सौ. परचुऱ्यांशी बोलत होतो तेव्हा बघितले की, श्री. अटल मॅजिस्ट्रेट ग्वालियरही आले आहेत. ते पोलिसअधिकाऱ्यांच्या विश्रांतीकक्षेमधून आमच्याकडेच बघत होते. थोड्याच वेळात अभियुक्त मंडळीही कोर्टात येऊन आपापल्या स्थानावर बसली. मी उठून आपल्या जागेवर गेलो. जाताना डॉ. परचुऱ्यांकडे बघून स्मित केले नि त्यांना सांगितले, 'आज अटलमहोदय आले आहेत.' तर त्यांनी श्री.अटलांना बघितल्याचे सांगितले. डॉक्टरांचा चेहरा शांत होता. सगळी वकील मंडळी आली व ठीक दहा वाजता आत्मचरणजी येऊन बसले व कोर्टाचे कामं सुरू झाले. श्री. अटलमहोदय यांना आणण्यात आले. ते येऊन साक्षीदारांच्या पिंजऱ्यात उभे राहिले. माझी छातीतली धडधड काही क्षण थांबल्यासारखी वाटून लगेच अधिक जोराने सुरू झाली ! मी मनाशीच म्हटले, 'देवा ! दया कर. मला सांभाळून घे !'

साक्षीदाराचे नावगाव लिहून झाल्यावर साक्षीदाराने शपथ घेतली मी इमानाने खरे बोलेन...श्री. दफ्तरी ॲडव्होकेट जनरल यांनी एकेक प्रश्न विचारायला सुरुवात केली. श्री. दफ्तरी आत्मविश्वासाने प्रश्न विचारीत आहेत असे मला वाटले. दफ्तरी कबुलीजबाब लिहून घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटला विचारावयाचे जे प्रश्न असतात तसेच प्रश्न विचारीत होते. अटलमहोदय अगदी ठसक्यात उत्तर देण्याचा आव आणीत आहेत असे मला वाटले, पण ते जज्ज आत्मचरणजींकडे बघायचे टाळीत आहेतसेही मला दिसले. प्रश्नाचे उत्तर लिहिले जात असताना अटलमहोदय मधूनमधून आपल्या तोंडातले पान चघळीत व लटके हसत माझ्याकडेही बघत होते. मी श्री. डांगे यांना साक्षीदाराचे कथन लिहून घ्यायला विनवले होते. मी स्वतः श्री.अटल यांच्याकडे निरखून बघण्याचा प्रयत्न करीत होतो. काही प्रश्न विचारले गेल्यावर ते उत्तर काय व कसे देतात हे मी निरखून बघण्याचा प्रयत्न करी, तर साक्षीदार अटल कधी खाली बघत, कधी इकडेतिकडे. पण कोर्टाकडे बघून ते उत्तर देत नव्हते. माझ्याकडेही बघत नव्हते. लवकरच मला हे वाटायला लागले की, अटलमहोदय जरुरीपेक्षा जास्त बारीकसारीक गोष्टी सांगत आहेत. आपण फार अनुभवी, बारीकसारीक गोष्टीविषयी काळजी घेणारे, दक्ष आणि हुशार आहोत हे दाखवायचा त्यांचा प्रयत्न असावा. पण पुष्कळ वेळी त्यांचा आवाज कसा उमटत नाहीसा, कोता वाटे, जरी चेहऱ्यावर आत्मविश्वासाचा थाट होता तरी. दफ्तरींनी साक्षीदार मॅजिस्ट्रेटांना कबुलीजबाब घ्यायच्या अगोदर तो कबुलीजबाब राजीखुशीने दिला जात आहे की नाही, पोलिसांनी काही प्रलोभने, काही धमक्या दिल्या म्हणून असा जबाब दिला जात आहे का, आपण मॅजिस्ट्रेट आहोत हे त्याला माहीत आहे व आपल्यासमोर दिलेला जबाब अभियुक्ताच्या विरुद्ध उपयोगात आणला जाईल वगैरेची कल्पना त्याला आहे का, त्याने पूर्ण विचार केला आहे का इत्यादी खात्री मॅजिस्ट्रेटने करून घ्यायची असते, ती कायदेशीर काळजी घेण्याबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली. पण प्रश्न विचारणारे दफ्तरी ॲडव्होकेट जनरल व उत्तर देणारे अटल मॅजिस्ट्रेट, दोघेही 'अधिकपणा' करीत आहेत असे मला वाटले. मला ते ऐकून बरे वाटेना. त्याकडे लक्षच देऊ नयेसे वाटले. पण जेव्हा दफ्तरींनी साक्षीदार मॅजिस्ट्रेटांना त्यांनी लिहून घेतलेला कबुलीजबाब साक्षीदाराच्या हातात देऊन कोर्टामध्ये मोठ्याने वाचून दाखवायला सांगितले, तेव्हा मात्र मी उसळलो. मी 'त्या प्रदर्शित कागदांवरचे लिहिलेले मोठ्याने वाचून दाखविण्याची काय आवश्यकता आहे ? कोणताही लेख स्वतःच नाही का सांगत ? प्रदर्शित लेख असा वाचून दाखवायला माझी आपत्ती (हरकत) आहे' वगैरे म्हटले. पण लगेच मी स्वतःला आवर घातला नि म्हटले, 'मी याबद्दल आपत्ती-अर्ज (हरकत) देत आहे' साक्षीदाराचे कथन पूर्ण झाल्यानंतर तो दिलाही. (कोर्टाच्या फायलीचे छापील पुस्तक क्र. सात, 'विविध कागद' पान ४५) जज्ज आत्मचरणजींनी ते मोठ्याने वाचणे 'नको' म्हटले नाही व साक्षीदाराने त्या कबुलीजबाबाचे सात कागद हातात घेऊन सुरुवातीपासून मोठ्याने वाचून दाखवायला आरंभ केला. श्री. अटल मॅजिस्ट्रेट ते कागद कोर्टाकडे बघून कोर्टाला वाचून दाखविण्याऐवजी माझ्याकडे वळून वाचून दाखवीत होते. श्रोतृवर्गाकडे पाहून वाचीत होते, आरोपींच्या पिंजऱ्याकडे बघून वाचीत होते. अशा रीतीने त्या कबुलीजबाबातला शब्द नि शब्द साक्षीदार मॅजिस्ट्रेट श्री. अटल यांनी कोर्टात मोठ्याने, खड्या आवाजात वाचून दाखवला. मला तर ते वाचन ऐकण्याची शिसारीच आल्यासारखे झाले. कोणताही प्रदर्शित करायचा दस्तऐवज, प्रमाणित करण्याचा हा प्रकार फार छिचोरी, हलक्या मनोवृत्तीचा दर्शक आहे असेच मला वाटले. अटलमहोदयांचा त्यावेळचा आवेश जसा काही, एखादा शूर वीर तळपत्या तलवारीचे वार एकदा उजव्या बाजूने, एकदा डाव्या बाजूने सपासप फिरवीत समोर येणाऱ्या शत्रूवरच चालून जात आहे असा होता ! मध्येच

केव्हातरी एखादे वाक्य संपताच ते माझ्याकडे विजयी मुद्रेनं पाहत, माझ्या नजरेला नजर भिडवून ! मी तर त्यांच्याकडेच एकसारखा बघत होतो, न अभियुक्तांच्या पिंजऱ्यातल्या डॉ. परचुऱ्यांकडे, न श्रोतृवर्गातल्या सौ. परचुऱ्यांकडे. अटलमहोदय हे त्यांचे वाचन संपवीत का नाहीत, असे मला वाटायला लागले होते. एकदाचे ते वाचन संपले नि दप्तरी आपल्या जागेवर बसले. अटलमहोदय कबुलीजबाब प्रदर्श पी ८६ चे कागद हातात धरून फड मारलेल्या कुस्तीवीराने चीत केलेल्या प्रतिस्पर्ध्याकडे बघावे तसे माझ्याकडे बघायला लागले !

मी साक्षीदाराचे कथन उतरविलेले कागद श्री. डांगे यांच्याकडून घेऊन सावकाशपणे उभा राहिलो, नि कूटपरीक्षणाचा (उलट तपासणीचा) एक एक प्रश्न विचारावयास सुरुवात केली.

साक्षीदाराला डॉ. परचुरे या व्यक्तीविषयी, किंवा त्यांच्या कुटुंबाविषयी, किंवा त्यांच्या सांपत्तिक स्थितीविषयी जवळजवळ काहीच माहिती नाही, साक्षीदार डॉ. परचुऱ्यांना केवळ १९४५ पासूनच ओळखतो आहे आणि तेही एक लष्कर ग्वाल्हेरचा डॉक्टर म्हणून, एवढे वदवून घेतल्यावर मी अटलमहोदयांना त्यांच्या दंडाधिकार विषयक–मॅजिस्टरिअल पॉवर्स– माहिती विचारली. मला स्वतःला त्या सगळ्या माहीत आहेत, हे अटलमहोदयांना माहीत होतेच, आणि ते आपले अधिकार सांगण्यात किंवा नाकारण्यात चूक करणार नाहीत असे मला वाटत होते. मी विचारल्यावरून त्यांनी कोर्टाला सांगितले की, ते ग्वाल्हेरच्या एका भागापुरते म्हणजे लष्कर विभागापुरते शहरी व्यवहार न्यायाधीश– सिटी सिव्हिलजज्ज– होते. त्यावेळी ग्वाल्हेरचे लष्कर विभागाशिवाय आणखी दोन विभाग होते. एक कसबा ग्वाल्हेर व एक मुरार. मी जेव्हा साक्षीदाराला विचारले की, ' ग्वाल्हेरचा किल्ला कोणत्या विभागात आहे ?' तेव्हा अटलमहोदयांनी उत्तर दिले की, ' मला वाटतं कसबा ग्वाल्हेर विभागात ! मी त्यांना मजजवळचा ' ग्वाल्हेर गव्हर्नमेंट 'चा दिनांक २९–१२–१९१७ चा अंक काढून दाखविला नि सांगितले की, ' यातले नोटिफिकेशन वाचून बघा. त्यामध्ये ग्वाल्हेरच्या कसबा ग्वाल्हेर विभागाच्या म्युनिसिपल चतुःसीमा वर्णन केलेल्या आहेत. त्यात कोठे ग्वाल्हेर किल्ल्याचा उल्लेख आहे का ते कोर्टाला सांगा. ' अटलमहोदयांनी गॅझेटचा अंक हातात घेऊन त्यातले नोटिफिकेशन वाचून पाहिले. क्षणभर ते विचारात पडल्यासारखे दिसले पण एकदम म्हणाले, ' १९१७ मध्ये मी ग्वाल्हेर गव्हर्नमेंटच्या नोकरीमध्ये नव्हतो म्हणून हे गॅझेट मी पाहिले नाही. ' काय, म्हणता काय ?' जज्ज आत्मचरण ओरडूनच म्हणाले, ' तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की काय, की इंडिअन पिनल कोड ज्यावेळी गॅझेटमध्ये प्रकाशित करून प्रभावशील केले गेले, त्यावेळी आपणांपैकी बहुतेक सर्वजण जन्मलोसुद्धा नव्हतो. म्हणून इंडिअन पिनल कोड आपल्यावर काय लागू नाही ? भलतंच काहीतरी (नॉन्सेस) ! त्यापेक्षा तुम्ही सरळ कबूल का नाही करीत की तुम्ही हे गॅझेट पाहण्याची अजूनपर्यंत कधी पर्वा केलेली नाही ?' अटलमहोदयांचा विजेत्या कुस्तीवीराचा थाट, वीरश्रीचा आवेग सगळे काही जणू जमिनीवर कोसळले होते, आणि साक्षीदार महोदय केविलवाणे हसू दाखवीत इकडे तिकडे बघत उभे होते ! १९१७ चे ते गॅझेट बचाव पक्षाचे प्रदर्शन म्हणून कोर्टाच्या फाइलमध्ये लागले. येथेसुद्धा जज्ज महोदयांनी कोर्टाच्या फायलीमध्ये ' जरूरीपुरते 'च लिहिले होते, केवळ ' मी २९–१२–१७ चा... अंक पाहिला नाही ! ' असे साक्षीदार म्हणाल्याचे लिहिले होते.

वार लागलेल्या शिकारीवर पुन्हा भराभर वार करावेत तशा हिरीरीने प्रश्नांची बरसात मी सुरू केली. मी विचारताच अटलमहोदयांनी कबूल केले की, मी दाखवलेल्या गॅझेटच्या आधाराशिवाय दुसरा काही आधार त्यांच्याजवळ नाही; ग्वाल्हेरचा किल्ला ग्वाल्हेर आर्मीच्या एका मेजर पदावरच्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असतो. किल्ल्यावर हत्यारे, दारूगोळा बनविण्याचा कारखाना आहे; त्या कारखान्याची जागा निर्बंधित क्षेत्र–प्रॉहिबिटेड एरिया–म्हणून आहे; ग्वाल्हेर किल्ल्यावर जायला शिरायला प्रवेशपत्र घ्यावे लागते; साक्षीदाराने स्वतः किंवा स्वतःसाठी प्रवेशपत्र घेतले नव्हते, कोणा पोलिस अधिकाऱ्याने तसे प्रवेशपत्र घेतले होते की नाही याची त्यांना माहिती नव्हती; ग्वाल्हेर हायकोर्टाच्या भोवती भिंती कठड्याचे आवार आहे; कबुलीजबाब देणाऱ्याला त्यांच्या कोर्टात आणले नाही व ते किल्ल्यावर स्वतः गेले, तेव्हा त्यांनी अभियुक्त आजारी आहे का याची चौकशी केली नाही; त्याच्या अंगाला हात लावून बघितले नाही, त्याचे अंगठे सुजले आहेत, त्याची मान ताठरली आहे, त्याचे सांधे धरले आहेत हे काही पाहिले नाही; डॉक्टर किल्ल्यावरच्या कोठडीत किती दिवसांपासून आहेत याची त्यांना माहिती नव्हती; न्यायालयाचे बंदीगृह कोठे आहे हे त्यांना माहिती नव्हते; कबुलीजबाब घेण्याच्या अगोदर अभियुक्ताला काही दिवस न्यायालयीन बंदीगृहात (ज्युडिशिअल लॉकअप)– पाठविण्याची आज्ञा त्यांनी दिली नव्हती. किंवा कबुलीजबाब घेतल्यानंतरही अभियुक्ताला तेथे नेले नव्हते. किल्ल्यावर जाताना त्यांनी आपल्याबरोबर आपल्या कोर्टाचा चपरासी नेला नव्हता; कोर्टाचे शिक्के, सील नेले नव्हते, साक्षीदाराचे कथन लिहून घेण्याचे सरकारी छापील कागद नेले नव्हते, दिल्ली येथे नोंदविलेल्या अपराधाच्या संबंधाने चौकशी करण्याची अनुमती ग्वाल्हेर संस्थानच्या अधिकाऱ्यांकडून (एक्स्ट्रॉ डाएटिंग Extra diting अ‍ॅथॉरिटी) घेतली नव्हती; अटलमहोदयांचे दंडाधिकाराचे अधिकार स्पेशल मॅजिस्ट्रेट म्हणून जातीय दंगेग्रस्त क्षेत्रासाठी निघालेल्या विशेषाज्ञे–ऑर्डिनन्स– क्रमांक १ व २ संवत २००४ प्रमाणे होते. (यांचे गॅझेट नोटिफिकेशन साक्षीदाराने स्वतःच मुख्य परीक्षणात कोर्टामध्ये दाखल केले होते.) तर ग्वाल्हेर किल्ला हे क्षेत्र जातीय दंगाक्षेत्र म्हणून घोषित झाले आहे की नाही याची त्यांना माहिती नव्हती; कबुलीजबाबावर कोर्टाचे शिक्के त्यांनी एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात लावले होते; तोवर कबुलीजबाब त्यांनी स्वतःजवळ व स्वतःच्या बँक लॉकरमध्ये ठेवला होता; कबुलीजबाब अटलमहोदयांनी ग्वाल्हेर शासनाच्या न्यायसचिवालयाच्या हवाली एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात केला होता;

**' ....पण म्हणून इंडिअन पिनल कोड आपल्यावर काय लागू नाही ? नॉन्सेन्स '**

ग्वाल्हेर कोर्टाची राजभाषा हिंदी असताना कबुलीजवाब इंग्रजी भाषेमध्ये घेतला होता; कबुलीजबाब लिहिण्याला आरंभ करण्यापूर्वी विचारलेले कायदेशीर प्रश्न व त्यांची उत्तरे अटलमहोदयांनी एका छापील पिवळसर कागदावर लिहिली होती पण कबुलीजबाबाचे बाकी सहा कागद साधे पांढरे बाजारात मिळणारे कागद होते; (त्या सहा कागदांवर डॉ. परचुऱ्यांनी हातजागेमध्ये– (मार्जिन) हिंदीलिपीमध्ये सह्या केल्या होत्या). कायदेशीर प्रश्न व उत्तरे लिहिलेल्या पहिल्या क्रमांकाच्या कागदावर प्रश्नोत्तरे लिहून संपल्यावरदेखील बरीचशी जागा उरली होती, तरी त्यावर जबाब लिहायला सुरुवात केली नाही. दुसऱ्या निराळ्या कागदावर का त्याची सुरुवात केली याचे कारण साक्षीदाराला सांगता येत नव्हते; येथेच मी साक्षीदाराला भीत भीत एक प्रश्न विचारला की, असे तर नाही झाले की, 'कबुलीजबाबाचे साधे कागद पूर्वीच लिहून घेतले व कायदेशीर प्रश्नोत्तराचा कागद मागाहून लिहिला?' पण हा प्रश्न विचारताच अटलमहोदयांनी ताडकन् उत्तर दिले की, 'नाही' (नो). मी लगेच तो विषय तेथेच आवरला व इतर विचारले. अटल महोदयांना हे आठवत नव्हते की, डॉक्टरांनी कबुलीजवाब काय द्यायचा आहे हे तोंडी सांगितले त्यावेळी त्यांनी आपल्या परचुरे कुटुंबाची सविस्तर माहिती मॅजिस्ट्रेट महोदयांना सांगितली होती का? अटलमहोदयांनी एका प्रश्नाच्या उत्तरात हेही सांगितले होते की, ते किल्ल्यावर जवळजवळ तीन तासभर होते. आणखी इतरही काही किरकोळ माहिती साक्षीदाराने कबूल केली होती.

मी श्री. अटलमहोदयांचे कूटपरीक्षण (cross) संपवले. कोर्टाची वेळही जवळजवळ संपलीच होती. अटलमहोदय कोर्टातून केव्हाच निघून गेले. जाताना त्यांनी माझ्याकडे बघितलेसुद्धा नाही. मी खाली बसलो. कोर्ट उठल्यावर आम्हीही उठलो. मी डॉ. परचुऱ्यांचा निरोप घेताना ते माझ्याशी बोलले नाहीत. इतर कोणी माझ्याशी बोलले नाही. दफ्तरींनी नेहमीप्रमाणे माझ्याकडे बघून स्मित केले नाही, माझा नमस्ते बघितला नाही; फक्त एका व्यक्तीने मला एक प्रश्न विचारला. सौ. परचुरे यांनी मला विचारले, 'का? कसे काय झाले?' 'मला नाही माहीत!' मी उत्तर दिले. पण माझा आवाजच अधिक बोलत होता. माझ्या तोंडून शब्दच निघत नव्हता. मी करूच काय शकलो होतो? मला खरोखरीच त्यावेळी असेच वाटत होते की, मॅजिस्ट्रेट श्री. अटल यांच्या परिक्षणामधून कबुलीजबाबाची काट करण्यासारखे– डॉक्टर परचुरे यांनी मला जे सत्य म्हणून सांगितले ते कोर्टात प्रमाणित करण्याजोगे– साक्षीदार कोर्टात शपथेवर जे सांगत आहेत तसे काही घडले नाही हे उघड करून दाखविता येईल असे मी काऽऽही करू शकलो नव्हतो! त्यावेळी माझं मन तळमळून एकच गोष्ट करायची इच्छा करीत होते. कधी मी हिंदुमहासभा भवनात जातो, कधी मी खोलीचे दार आतून लावून घेतो, नि कधी मी देवाला साष्टांग दंडवत घालून म्हणतो की, 'देवा! माझ्यावर दया कर! मला काही मार्ग दाखव!'

¤

श्री. अटल मॅजिस्ट्रेट यांचे परीक्षण संपल्यावर दुसऱ्या दिवशी २० जुलै रोजी लगेच माफीचा साक्षीदार दिगंबर आर. बडगे याची साक्ष सुरू झाली. तोवर १५ जुलैलाच मी नथूरामच्या आग्रहावरून गोपाळ गोडसेसाठी वकीलपत्र कोर्टात देऊन ठेवले होते पण गोपाळ गोडसेच्या प्रकरणाची बारीकसारीक माहिती मला काहीच नव्हती. गेला पूर्ण आठवडाभर मी डॉ. परचुऱ्यांच्या कामातच पूर्णपणे गुंतलो होतो. मध्यंतरी दिगंबर बडगेच्या पुराव्याचा त्रोटक सारांश आम्हाला मिळाला होता त्याकडे मी बघितलेही नव्हते. बडगेची साक्ष इतक्यात सुरू होईल याची मला कल्पनाही नव्हती. पण ती २० जुलैलाच सुरू झाली. ती ३० जुलैपर्यंत चालली होती. कोर्टकामाचे नऊ दिवसभर हे परीक्षण चालले. हे सारे माफीच्या साक्षीदाराचे मुख्य परीक्षण व त्यानंतर बचावपक्षाच्या एक एक वकिलाचे कूटपरीक्षण ऐकता ऐकता एकंदर महात्मा गांधींच्या हत्येच्या बाबतीत जो कट झाल्याचा अभियोगपक्षाचा दावा होता त्याचे स्वरूप व त्या संबंधाने एकएका अभियुक्ताच्या बचावाचे स्वरूप, याची माहिती मला रोज मिळत होती. रोज त्यासंबंधाने माझे बोलणे थोडेँ गोपाळ गोडसेशी व पुष्कळसे नथूरामशी चालू झाले. त्या दोघांकडून दिगंबर बडगेच्या व्यक्तित्वाविषयी जितकी माहिती कळेल तितकी कळून घेण्याचा मी प्रयत्न केला. गोपाळ गोडसे बचावासाठी 'मी या कटात सहयोगी नव्हतो, मी दिल्लीला गेलोच नाही' असे म्हणत आहे हे मला कळले. गोपाळ गोडसेकडून तो ५ फेब्रुवारी ४८ ला पकडला गेला तेव्हापासून त्याला पोलिसांनी पुण्याला व नंतर मुंबईला वरळीच्या नव्या बिल्डिंगमध्ये ठेवले त्यावेळी कसे वागवले, यासंबंधीची माहिती मला मिळाली व त्याच आधारावर बडगेचे कूटपरीक्षण मी केले. त्यासंबंधी मी पुढे लिहिणार आहेच म्हणून येथे जास्त काही लिहीत नाही. एकच गोष्ट लिहितो म्हणजे मला माझी बाजू सांगितल्याचे समाधान वाटेल. ती अशी को जसे ग्वाल्हेरचे साक्षीदार तपासताना, ग्वाल्हेरच्या घटनांची पार्श्वभूमिका समजून घेताना मला पुष्कळसा स्थानिक अनुभव व हितचिंतकांची मदत मिळाली तसे गोपाळ गोडसेचा बचाव करताना काही माझ्या पाठीशी नव्हते. एवढेच नव्हे तर, गोपाळ गोडसेच्या बचावाशी निकट संबंध असलेले बरेचसे दिल्ली येथील साक्षीदार अगोदरच होऊन गेले होते व त्यांचा कोर्टासमोर आलेला पुरावा माझ्यासमोर काळ्या कातळाच्या उभ्या डोंगरासारखा 'आडवा' दिसत होता. तो डोंगर लांघून जायला ज्या खिंडीचा फायदा मिळाला असता, ज्या वाटा हाताळता आल्या असत्या असे मागाहून मला वाटायचे, त्यांचा उपयोग करून घेण्याची वेळ निघून गेली होती. असो.

माफीचा साक्षीदार बडगेची साक्ष संपल्यानंतर एकंदर कटासंबंधी आणखी काही पुरावा आला व दिनांक ९–९–१९४८ ला अभियोग साक्षीदार क्रमांक १०८ श्री. दिनकर पी. पाटील थोरात हे पोलिस अधिकारी साक्ष द्यायला आले. हे पाटील थोरात ग्वाल्हेर येथे ज्येष्ठ आरक्षी अधीक्षक–सीनिअर सुपरिंटेंडेंट पोलिस होते. माझी त्यांची ओळख अशी मुळीच नव्हती. पण मला हे माहीत होते की, ते पुण्याच्या एका कुळवंत मराठा घराण्यातले आहेत. यामुळेच की काय, त्यांच्या साक्षीविषयी मला काळजी अशी करायची आवश्यकता वाटली नव्हती. जे काही त्यांना विचारले जाईल त्याचे उत्तर ते स्पष्टपणे, निर्भीडपणे देतील याबद्दल मला विश्वास वाटला होता, नि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात पोलिस अधिकारी म्हणून उभे राहूनही त्यांनी माझी निराशा केली नाही. दिल्ली येथे नोंदविलेल्या गेलेल्या महात्मा गांधी खून अप-

राधाची 'ग्वाल्हेर येथे जी चौकशी झाली त्यामध्ये त्यांनी बरेचसे काम केले होते. त्यांनी आपल्या तोंडी पुराव्याबरोबर काही कागदपत्र कोर्टासमोर आणले नव्हते. ते जे काही सांगतील त्यांतले त्यांना प्रत्यक्ष माहीत असलेले काय आणि दुसऱ्यांच्या सांगोवांगीचे काय, हे कोर्टासमोर आणायचे हे सूत्र पाळून मी त्यांचे कूटपरीक्षण केले. त्यांच्या साक्षीत वारंवार दोन व्यक्तींचा उल्लेख आला; तो म्हणजे ग्वाल्हेरचे त्या वेळचे आरक्षी महानिरीक्षक–इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस मार्श–स्मिथ व किल्ल्यावरचे सैनिक अधिकारी मेजर छत्रे यांचा ग्वाल्हेरच्या चौकशीमध्ये ज्या घटनांची त्यांना प्रत्यक्ष माहिती होती असे मला माहीत होते, त्याबद्दल मी त्यांना सरळ प्रश्न विचारले नि त्यांनी त्यांची उत्तरे सरळपणाने दिली. ती देताना त्यांना स्वत: होऊन काही कागदपत्र पुराव्यात दाखल करायला संधी मिळू नये एवढीच काळजी घेऊन मी त्यांना प्रश्न विचारले. श्री. पाटील थोरात यांनी श्री. कृष्णराव परचुरे व नीलकंठ परचुरे यांच्या अटकेविषयी कोर्टाला माहिती सांगितली. ती सांगण्यात त्यांनी काही 'हातचे राखून' ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी सौ. परचुरे यांना पोलिसांनी कसे, कुठे व केव्हा प्रश्न विचारले याबद्दल प्रश्नांचे उत्तर देताना 'स्वत:ला सर्व माहीत असल्याच्या स्वरात' उत्तर दिले पण मी त्यांना जेव्हा 'मी असे म्हणतो'–'आय पुट इट टू यू' अशा थाटाने प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी तात्काळ 'मला याची प्रत्यक्ष माहिती नाही' हे कबूल केले. त्यांनी सांगितले की, मॅजिस्ट्रेट श्री. अटल किल्ल्यावर डॉ. परचुरे यांच्याबरोबर दोन तासांपेक्षा थोडा अधिक वेळ होते. त्यांनी सौ. परचुरे यांना प्रश्न विचारणारे अधिकारी पुण्याचे उप आरक्षी अधीक्षक श्री. देऊळकर होते व त्यांनी ही चौकशी १६ फेब्रुवारीला केल्याचे सांगितले. २४ जानेवारीला डॉ. परचुरे व ग्वाल्हेर हिंदुसभेचे कार्यकर्ते यांनी 'ग्वाल्हेरच्या सचिवालयासमोर जे विराट निदर्शन केले होते त्याबद्दलही सांगितले.'

दिनांक २२–९–४८ ला अभियोग साक्षीदार क्रमांक १२३ श्री. देऊळकर साक्षीला आले. त्यांनी सांगितले की, डॉ. परचुरे यांना महात्मा गांधी खून अपराधाबद्दल अटकेत घेतल्याबद्दल नोंद १६ फेब्रुवारीला केली होती. ही नोंद मुंबईचे पोलिस आयुक्त श्री. जे. डी. नगरवाला यांच्या आज्ञेवरून केल्याचे त्यांनी सांगितले. येथे हे सांगायला हवे की, पोलिसांनी डॉ. परचुऱ्यांना ३ फेब्रुवारीलाच अटक केली होती व किल्ल्यावर नेऊन ठेविले होते, आणि डॉ. परचुरे यांचे वडील बंधु श्री. कृष्णराव परचुरे व डॉक्टरांचा मुलगा नीलकंठ परचुरे यांना अटकेत ठेवून व डॉक्टरांचे स्वत:चे अनुमत (लायसेन्स्ड) पिस्तुल आपल्या ताब्यात घेऊन व परचुरे कुटुंबातल्या बायकांना पोलिस ठाण्यात नेऊन, त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार करून व विशेषे-करून डॉ. परचुऱ्यांचे पिस्तुल हे नथूरामने वापरलेल्या पिस्तुला-सारखेच आहे, इतके की, एक झाकावे व एक काढावे, काही ओळखता येऊ नये, इत्यादी सर्व मालमसाल्याचा पोलिस अधिकाऱ्यांनी ग्वाल्हेर किल्ल्यावरच्या कोठडीत डॉ. परचुरे यांना पोलिसांसमोर हात टेकून, पोलिस म्हणतील ते कबूल करायला लावण्यासाठी कसा उपयोग केला असेल, हे कुणासही न सांगता समजण्यासारखे आहे. बंधु, पुत्र, पत्नी आणि इतरही कुटुंबियांना पोलिसांच्या छळातून वाचवावे एवढे उद्दिष्ट डॉक्टरांना स्वत:चे हात जाळून घ्यावयास लावायला पुरेसे होते! म्हणूनच या साक्षीदार पोलिस ऑफिसरांनी ग्वाल्हेरच्या किल्ल्या-वरील कैदेत जे प्रश्नपरीक्षण–इन्टरॉगेशन केले ते फारच कौशल्याने केले असे त्याचा झालेला परिणाम पाहता म्हणावेसे वाटते. कबुली-जबाबामध्ये डॉक्टरांनी एक नाही, दोन नाही, तीनदा 'मी माझी भूमिका व माझ्या सहकाऱ्यांच्या भूमिका स्पष्ट करू चाहतो' असे म्हटले होते. प्रश्न परीक्षणामध्ये हीच विद्या डॉक्टरांना शिकवून त्यांनी त्यांच्या व त्यांच्या सहकारी मंडळींच्या निर्दोषत्वाची ग्वाही दिली होती असे मला निश्चित वाटले. म्हणूनच अशा पोलिस अधिकाऱ्याचे कूटपरीक्षण करताना मला फारच काळजीपूर्वक माझे उद्दिष्ट साध्य करून घेता आले तर पाहावयाचे होते. साक्षीदार देऊळकरांनी मुख्य परीक्षणात रीतसर माहिती सांगितली नि मी कूटपरीक्षणास उभा राहिलो. पोलिस अधिकाऱ्याचे कूटपरीक्षण करताना माझी पद्धत पोलिस अधिकाऱ्याला त्याच्या नकळत त्याची स्तुती करून प्रश्न विचारले म्हणजे पोलिस अधिकारी अधिक मोकळे-पणाने उत्तर देऊ लागतो या दीर्घ अनुभवावर आधारित होती व सुरुवातीसच मी मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्यांची साक्षीदार किंवा अभियुक्त यांची पोलिसांनी घेतलेली परीक्षणे व दिल्ली, ग्वाल्हेरच्या पोलिसांची परीक्षणे यांची तुलना केली व मुंबई पोलिस अधिकाऱ्यांची स्तुती करून म्हटले की, साक्षीदाराला त्याच्या स्वत:विषयी, त्याच्या शैक्षणिक योग्यतेविषयी, त्याच्या मुलाबाळां–नातेवाइकांविषयी माहिती विचारली म्हणजे साक्षीदार खुलतो नि पुष्कळ मोकळेपणाने बोलू लागतो. ह्या मानसशास्त्रीय सिद्धान्त तुम्ही कसा, कोठे शिकलात, तुमचे शिक्षण कोठे झाले, तुम्हाला पोलिस प्रशिक्षण शाळा नाशिक येथे साक्षीदारांचे प्रश्न परीक्षण कसे करावयाचे याचे प्रशिक्षण मिळते का वगैरे प्रश्न विचारले. त्या प्रश्नांच्या उत्तरात साक्षीदार पोलिस ऑफिसरने कोर्टाला जे सांगितले ते असे : पोलिस ऑफिसर म्हणून मला प्रशिक्षण, नाशिक पोलिस प्रशिक्षण शाळा (पोलिस ट्रेनिंग स्कूल) येथे मिळाले. आम्हाला साक्षीदारांचे प्रश्न परीक्षण कसे करायचे याबद्दल प्रशिक्षण मिळाले नाही. मला अपराधाची चौकशी कशी करायची याविषयी सामान्य निर्देशन मिळाले. अनुभवाने ऑफिसरला कळते की, साक्षीदाराचे प्रश्न परीक्षण कसे करावयाचे. मी जेव्हा प्रश्न परीक्षण करतो, तेव्हा मी साक्षीदाराला प्रथम त्याचे नाव, वय, धंदा आणि त्याचे राहणे कुठले याबद्दल विचारतो. साक्षीदाराला त्याच्या शैक्षणिक पात्रतेविषयी विचारतोच असे नाही. त्यानंतर साक्षीदाराची नातेवाईक मंडळी कोण कोण आहेत याविषयी साधारणपणे विचारतो. त्यानंतर अपराधासंबंधाने त्याला कोणच्या व किती घटना माहीत आहेत याबद्दल विचारतो. प्रश्न परीक्षणाची ही माझी रीत कायद्याला धरून पण माझ्या अनुभवाने मी तयार केली आहे.' साक्षीदाराने किंचित आढ्यतेनेच हे उत्तर दिलेसे वाटले. साक्षीदार देऊळकरांना हे उत्तर देताना फक्त एकाच गोष्टीचा विसर पडला होता. ती म्हणजे

**दिगंबर बडगेची साक्ष इतक्यात सुरू होईल याची मला कल्पनाच नव्हती.**

ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेटने ग्वाल्हेर कोठडीत डॉ. परचुऱ्यांचा कबुलीजबाब घेतला असे जे सांगण्यात आले, त्या कबुलीजबाबामध्ये ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेटनी मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्याने कायदेशीर परंतु स्वतःच्या अनुभवाने बनविलेली प्रश्न परीक्षणाची पद्धतच वापरली होती असे कबुलीजबाब सांगत होता ! बिचाऱ्या ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेटला प्रश्न परीक्षणाचे हे कौशल्य एकाएकी कुठून प्राप्त झाले? पुढे प्रश्न विचारल्यावर साक्षीदार देऊळकर सांगून गेले की, त्यांनी डॉक्टरांचे प्रश्न परीक्षण केले ते ग्वाल्हेर किल्ल्यावरील औषधे देण्याच्या खोलीत–डिस्पेन्सरी रूम–मध्ये. आणि लगेच त्यांनी शपथेवर सांगितले की, डॉक्टरांना किल्ल्यावर कोणच्या कोठडीत दोन आठवडे ठेवले होते हे त्यांना माहीत नाही. मला अगदी लगेच याविषयी आणखी प्रश्न विचारावे असा फार मोह झाला, पण मी स्वतःवर आवर घातला नि तो विषय चटकन् तेथेच संपविला. कैदेतल्या बंदीचे प्रश्नपरीक्षण इस्पितळाच्या खोलीत घेतलेला व बंदीला कोठे ठेवलेले आहे याची माहिती नसणारा पोलिस अधिकारी 'सांगा कुणी पाहिला' असेच लिहावेसे वाटते ! या पोलिस अधिकारी साक्षीदाराकडून जी मौल्यवान माहिती मला कोर्टाला देता आली तेवढी पुरे. ह्या माहितीच्या आधारावरच डॉक्टरांनी आपला कबुलीजबाब कोणच्या परिस्थितीत, कशा शारीरिक नि मानसिकरीत्या विकलांग झालेल्या अवस्थेत दिला याबद्दल बरेचसे सांगता येईल असे मला वाटले. पण मला येथे प्रामाणिकपणे हे कबूल करायला हवे की, साक्षीदार पोलिस अधिकारी देऊळकरांना त्यांच्या प्रशिक्षणाविषयी प्रश्न विचारताना माझ्या मनात आणखी काही कौशल्यनीती नव्हती. केवळ एकच मानसशास्त्रीय सिद्धान्त माहीत होता की, कुणालाही प्रश्न विचारून माहिती काढताना त्याला त्याच्या स्वतःविषयी, त्याला आवडणाऱ्या माणसांविषयी–छंदाविषयी त्यांच्याशी बोलले तर तो जीव खुलतो नि पुष्कळ प्रांजळपणे बोलू लागतो. नटवर्य गणपतराव जोशांचे हॅम्लेट बघताना मला त्यांचा–ज्यावेळी हॅम्लेट काही लोकांना त्याच्या बासरीवादन कलेची तारीफ करून ते खुलल्यावर त्यांच्याकडून आपल्या काकाने व आईने आपल्या पित्याचा खून कसा केला याची माहिती काढून घेतो–हा अभिनय अजून डोळ्यासमोर दिसतो. त्या अभिनयामागची विद्या आणखी दुसरी कोणती होती ? असो. परमेश्वराच्या दयेने ह्या माझ्या अभावितपणे विचारलेल्या प्रश्नांतून मला एक फारच महत्त्वाचा मुद्दा पटेल अशा तर्कसंगत पद्धतीने सांगता आला की, **डॉक्टरांचा कबुलीजबाब हा 'बंबईमा बनेलो माल'–मुंबई पोलिस अधिकाऱ्याने केलेल्या प्रश्नपरीक्षणाची कॉपी टू कॉपी–नक्कल होती, ग्वाल्हेर मॅजिस्ट्रेट 'का बनेलो माल' नव्हता !**

अर्थात हे सगळे मागाहून सुचले. ज्यावेळी साक्षीदार देऊळकरांचे कूटपरीक्षण मी संपविले त्यावेळी मला न्यायालयात सत्य सिद्ध करणे किती कठीण आहे, डॉक्टरांनी आपले हस्ताक्षर-सही करून दिलेला कबुलीजबाब हा राजीखुशीने दिलेला जबाब नव्हता, परंतु कुणीतरी बनविलेल्या कथनाचा तो मसुदा–नक्कल–होती हे आपण सिद्ध करू शकलो नाही असेच मला वाटत होते. स्वतः मॅजिस्ट्रेटने असे कुठे म्हटले आहे की, कबुलीजबाब त्यांनी किल्ल्यावर लिहिला नाही–घरून लिहून आणला ? असे विचार मला त्यावेळी छळीत. असल्या छळवादी विचारांनी जेरीला आलो की, परमेश्वराची करुणा भाकणे हाच माझा निवारा होता !

दिनांक १ ऑक्टोबर १९४८ ला अभियोग साक्षीदार क्रमांक १३१ श्री. एस. आर. मंडलीक सी. आय. डी. इन्स्पेक्टर पोलिस यांचे मुख्य परीक्षण झाले. पण कोर्टाची वेळ संपल्यामुळे त्यांचे कूटपरीक्षण होऊ शकले नाही. त्यासाठी सोमवार दि. ४–१०–१९४८ ला ते पुन्हा कोर्टात आले. मला शनिवार–रविवारचा सुटीचा वेळ मिळाला होता नि त्यांच्या कूटपरीक्षणाची मी जितकी मला सुचली तशी तयारी करून ठेवली होती. सोमवारी त्यांचे कूटपरीक्षण सकाळी १०·१५ला सुरू केले ते १२ वाजून ४५ मिनिटे झाली त्यावेळी संपले. मी मला जसजसे शक्य होत होते तसे योग्य शब्दांत त्यांना विचारीत होतो. माझ्या प्रश्नांना जज्ज आत्मचरण किंवा ॲडव्होकेट जनरल दफ्तरी या कुणाकडूनही काही अडथळा किंवा आक्षेप घेतला गेला नाही. याचे महत्त्व किती हे पोलिस ऑफिसरचे कूटपरीक्षण केलेल्या–करणाऱ्या–वकिलालाच जास्त प्रकर्षाने कळेल. मला स्वतःला त्यावेळी मात्र माझे प्रश्न अगदी 'बेचव' अगदी 'शामळू' किंवा बिन महत्त्वाचे असे झाले आहे की काय, असेच वाटत राहिले होते. तरीपण त्या दिवशी माझ्या काम करण्याच्या पद्धतीने माझ्याबद्दल श्री. आत्मचरण यांचे तसेच ॲडव्होकेट जनरल दफ्तरी यांचे काय मत झाले, याची कथा मी पुढे एका प्रकरणात अन्य संदर्भात सांगणार आहे, म्हणून ती येथे सांगत नाही. पण त्या दिवशीच्या माझ्या कामामुळे मला मग फार समाधान वाटले, तरीपण पुन्हा डॉक्टर परचुरे यांनी मला जी 'सत्यकथा' सांगितली होती त्यातल्या सत्याचे रोखठोक प्रमाण किंवा बोट दाखवून सांगावे असे प्रमाण मी न्यायासनासमोर आणण्यात यशस्वी झालो की नाही, याविषयी माझे मन त्यावेळी द्विधाच राहिले. मी माझ्या खोलीमध्ये टेबलाशी बसून कबुलीजबाबाचे कागद, साक्षीदार श्री. अटल, श्री. पाटील-थोरात, श्री. देऊळकर व श्री. मंडलीक यांच्या कथनाचे कागद समोर घेऊन बसे व त्यांची पारायणे करी. मी अंधारात चाचपडत आहे असे मला वाटायचे. उघडया डोळ्यांनी डॉक्टरांच्या वकिलीचा वसा घेतला होता मी. उतू नये, मातू नये, घेतला वसा टाकू नये ही लहानपणापासूनची शिकवण. निर्मळ मनाने वसा पाळावा, त्यात चुकू नये, नि वसा पूर्ण करण्यासाठी शक्ती नि भक्ती दे अशी दयाळू देवाची करुणा भाकावी. काया, वाचा मनाने परमेश्वराला शरण जावे. असे करूनच माझ्या छळवादी आत्मशंकी मनाचा तोल मी सांभाळू शके.

अभियोग साक्षीदार क्रमांक १२३ श्री. देऊळकर यांचे कथन झाले, त्या दिवशीच अभियोगपक्षाने डॉ. परचुऱ्यांच्याविरुद्ध असा आणखी एक साक्षीदार पुढे आणला होता. पण तो कबुलीजबाबाच्या संदर्भात नव्हता, म्हणून त्यावेळी त्याचा उल्लेख मी केला नाही. त्याची कथा आता सांगतो. तो साक्षीदार होता क्षेत्र उज्जयनी येथील प्रसिद्ध राजज्योतिषी पंडित सूर्यनारायण व्यासजी. ते साक्षीदार क्रमांक १२४ म्हणून आले. त्यांचे घराणे पिढीजात ज्योतिषाचे. त्यांचे वडीलही प्रसिद्ध ज्योतिषी. ते ग्वाल्हेरकर महाराज कै. वा. माधवराव शिंदे यांचे खास ज्योतिषी म्हणून होते. पंडित सूर्यनारायणजीही विद्वान व राजघराण्याचे विश्वासपात्र ज्योतिषी म्हणून

प्रसिद्ध होते. त्यांना अभियोगपक्षाने डॉक्टर परचुऱ्यांचे वडील श्री. सदाशिवराव परचुरे यांची जन्मकुंडली प्रमाणित करायला म्हणून न्यायालयासमोर आणले होते. कै. सदाशिवराव परचुरे हे माधवरावमहाराजांचे 'मास्टरसाब' म्हणून संस्थानात नोकरीला लागले होते. तेव्हा राजघराण्याबरोबर राजघराण्याच्या गुरुदेवांची कुंडलीही राजघराण्याच्या ज्योतिषाने मांडावी हे क्रमप्राप्त होते आणि म्हणूनच डॉक्टरांच्या 'पितामहांच्या घरी पुण्यपत्तन क्षेत्री अमुक संवत् शके तिथीला पुत्ररत्नाचा जन्म' झाला होता हे सांगणारी जन्मकुंडली 'माझ्या पिताजीने बनविली आहे. त्यांच्या स्वदस्तुरखुद्द हस्ताक्षरातली आहे' हे सिद्ध करायला पंडित सूर्यनारायणजी ताराबळ, चंद्रबळ घेऊन कोर्टात आले होते आणि हे सर्व कशासाठी, तर डॉक्टर परचुऱ्यांच्या बचावाच्या दुर्गम दुर्गाचा एक बुरूज ढासळून टाकण्यासाठी ! डॉक्टरांनी नव्हते का सुरुवातीसच म्हटले की, मी ग्वाल्हेरचा निवासी आहे, मुंबईच्या पोलिसांचा नि दिल्लीच्या न्यायालयाचा माझ्यावर अधिकार चालू शकत नाही ! आम्हा बचावपक्षाच्या वकिलांमध्ये रा. डांगे हे ज्योतिष समजत. साक्षीदारांच्या पिंजऱ्यात उज्जयनीचा राजज्योतिषी बघून त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढले. त्यांनी साक्षीदाराची 'उलटतपासणी'– रा. डांगे यांचा विनोदाचा शब्द–सुरू केली. पुढे मीही त्या विनोदाच्या सोहळ्यात सामील झालो. मी साक्षीदाराला नुसते ओळखत होतो, एवढेच नव्हे तर, त्यांच्यावतीने ग्वाल्हेरच्या उच्च न्यायालयात त्यांचा वकील म्हणूनही उभा राहिलो होतो. त्यांना मी थट्टेच्या सुरातच म्हटले–अहो, तुम्ही ग्वाल्हेरचे राजज्योतिषी म्हणवता, पण तुमच्याच विरुद्ध ग्वाल्हेर-शासनाने दुसऱ्या जागतिक लढाईच्या दिवसांत ग्वाल्हेर राज्य सुरक्षा नियमांखाली अभियोग नव्हता का चालविला ? त्यावर साक्षीदारानेही हसतच म्हटले, 'अजी वकील-साहब ! क्या आपही यह सवाल मुझे पूँछ रहे है ? आपही तो उस वक्त मेरे वकील थे ! ग्वालियर महाराजासाहबने वह अभियोग बादमे वापिस ले लिया था यह आपको तो मालूम है!' जज्ज आत्मचरणजींनी साक्षीदाराचे उत्तर त्यांच्या शब्दांत न लिहिता, त्याऐवजी अभियोग चालल्याबद्दल साक्षीदाराची कबुली लिहून पुढे तो अभियोग ग्वाल्हेरच्या महाराजांनी परत घेतल्याची पुस्ती लिहिली. साक्षीदाराच्या साक्षीत अशा पत्रिकात जन्मलेल्या मुलाचे नाव, जन्मखूण वगैरे काही लिहिले नव्हते व डॉक्टरांच्या पितामहांना किती मुले झाली व त्यांतले कोणत्या क्रमांकाचे हे जन्मलेले बाळ कुंडलीचा विषय होते, याविषयी साक्षीदाराला काही प्रत्यक्ष माहिती नव्हती हे दाखविण्याचा माझा प्रयत्न होता. पण सारे थट्टेच्या स्वरातच. पुढे अभियोगपक्षाने साक्षीदार क्रमांक १४० मेजर डी. एम. जाल ह्या ग्वाल्हेरच्या त्यावेळी ७८ वर्षे वयाच्या वृद्ध पारशी गृहस्थाला साक्षीदार म्हणून आणले. या गृहस्थांना कै. वा. सदाशिवराव परचुरे यांची चांगली माहिती होती. त्यांनी डॉ. परचुरे यांच्या 'मास्टरसाब' पित्याची सगळी माहिती–ते एका पायाने लंगडे होते इथपर्यंत–सांगितली, अगदी वाचाळ पारशी म्हाताऱ्याच्या भाषेत. त्यांना ग्वाल्हेरबद्दलच्या प्रौढीत झुलत ठेवून मी विचारले की, 'ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर आर्मीचा कैदखाना कोठे आहे ? ग्वाल्हेरला फेब्रुआरी महिन्यात थंडी कशी असते ?' साक्षीदाराने 'अरे, कैदखानेका तो मुझे वैसे पता नही, वही कही पुराने महलके पास होगा । मगर थंडका पूछो मत । बडी कडाकेकी थंड होती है, हाथ-पाव अकड जाते हैं, जी !' अशा शब्दांत उत्तर दिले. जज्ज आत्मचरणजींनी अर्थात आपल्या भाषेत ते उत्तर नोंदविले. साक्षीदाराने डॉक्टर परचुऱ्यांच्या एकूणएक भावाबहिणींची नावे सांगून, परचुऱ्यांचा पुण्याला एक वाडा आहे हेही सांगितले व हेही सांगितले की, डॉक्टरांचे वडील ग्वाल्हेरचे सरकारी नोकर म्हणून असतानाही पुणेरी पोशाख घालीत ! अभियोगपक्षाने साक्षीदाराचा उपयोग डॉक्टरांचे 'पुणेरी मूळ आणि कूळ' सिद्ध करण्याकडे केला, तर मी त्याचा उपयोग फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात किल्ल्यावरच्या कोठडीत डॉक्टरांचे थंडीच्या दिवसांत कसे हाल झाले असतील हे दाखविण्यासाठी करून बचावाचा एक आधार शोधून काढला होता !

अभियोगपक्षाचे साक्षीदार संपत आले होते, ऑक्टोबर महिना संपत आला होता, पण अभियोगपक्षाच्या दक्ष अधिकाऱ्यांचे हाताशी २७५ साक्षीदारांची नामसूची असूनही समाधान झाले नव्हते. त्याच दिवसांत एके दिवशी ग्वाल्हेर येथे डॉक्टर परचुऱ्यांच्या घरावर जप्तीची धाड घालून पोलिसांनी एक जुन्या कागदपत्रांची पेटी उचलून आणली व त्यामधून डॉक्टरांच्या घरातल्या माणसांच्या आणखी काही पत्रिका कोर्टापुढे पुराव्यात आणल्या व हे सारे सिद्ध करण्यासाठी, एक सब्इन्स्पेक्टर श्री. भाजेकर, एक पंच साक्षीदार व दोन ज्योतिषी असे चार साक्षीदार न्यायालयात आणून उभे केले. तोवर आम्ही सर्वजण अगदी कंटाळून गेलो होतो. पण न्यायालयात अभियोग चालू असता, न्यायाधीशाच्या अनुज्ञेशिवाय अभियुक्ताच्या घरावर अनुसधान (वॉरंट) घेऊन जाण्याची पोलिसांची कार्यवाही आपत्तिजनक होती नि मीही कोर्टापुढे त्याबद्दल आक्षेप घेण्याचा प्रयत्न केला, पण ही सर्व जप्तीची कार्यवाही अगोदरच संपन्न झाली असल्याने माझी 'फुकाची बडबड'च ठरली. मीही मग थट्टेच्या सुरातच या साक्षीदार ज्योतिष्यांचे कूटपरीक्षण केले नि पोलिस साक्षीदारांच्या कार्यवाहीतला अवैधपणा कोर्टाच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न केला होता. मला हरकती अर्ज, वादविवाद, निर्णय आदींचा घोळ घालून कोर्टाचे दिवस वाढविण्याचे टाळावयाचे होते. एवढेच नव्हे तर, मी डॉक्टरांच्या 'संस्थानी स्वातंत्र्याच्या' आक्षेपात स्वतः विशेष उत्साह दाखवीत नसताना अभियोगपक्षाने त्या आक्षेपाचे एवढे स्तोम का माजवावे हे मला कळत नव्हते, आणि म्हणूनच मी 'अभियोगपक्ष आपण आणखी एक तीर मारला अशी स्वतःची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न करीत आहे, तर करी ना का ! मला काय त्याचे !' अशा वृत्तीनेच ते सारे सहन केले. पण माझ्या त्या दिवसांतल्या वागणुकीतून लोकांनी माझ्याबद्दल काय बोलावे ? पुढे मला माझ्या एका ज्येष्ठ वकीलबंधूने सांगितले की, 'इनामदार ! तुम्ही महात्मा गांधी खूनखटल्यातील प्रॉसिक्यूशनच्या वकिलांना चांगलेच चकविले असे

## अभियोगपक्षाचे साक्षीदार संपत आले होते

त्यांचे म्हणणे आहे. त्यांना वाटले, तुमचा 'डोमिसाईल'चा मुद्दा तुमच्या बचावाचा मुख्य आधार आहे म्हणून. पण तुम्ही जादूगाराच्या पोतडीतून अनपेक्षित वस्तू काढावी तसेच केलेत. तुमचा बचाव भलताच काढून तुम्ही त्यांना मूर्ख बनविलेत!' खरी गोष्ट अशी आहे की, डॉक्टरांनी सुरुवातीस मला गंभीरपणे हा मुद्दा महत्त्वाचा म्हणून सांगितला होता व त्यांच्या समाधानासाठी म्हणून मी डोमिसाईलचा मुद्दा न्यायालयासमोर ठेवला होता. पण मला स्वतःला त्यामध्ये तथ्य वाटेना. कायदा, पूर्वदृष्टान्त, आंतराष्ट्रीय राजनीती वगैरेंचा विचार करता व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या हेग न्यायालयासमोर झालेल्या पूर्व निर्णयाचा दाखला बघता या डोमिसाईलच्या हरकतीमध्ये मला काही रस वाटत नव्हता. भारतभूमीवरल्या नरेंद्रमंडळींचे सार्वभौमत्वाचे अधिकार दिल्लीच्या राजसत्तेसमोर पत्त्याच्या डोलाऱ्यासारखे भराभर कोसळून पडत असलेले दिसत असता, ग्वाल्हेरचे नागरिकत्व सांगणाऱ्याची काय तमा? आपण सगळेजण भारतवासी, भारतीय राष्ट्राचे नागरिक नव्हतो का बनलो?

शेवटचा अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक १४९–पुन्हा ग्वाल्हेरचाच एक पोलिस शिपाई. याचे कथन दि. ६–११–१९४८ ला झाले नि अभियोगपक्षाने आपला पुरावा संपल्याचे घोषित केले. सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मलासुद्धा डोक्यावरचे एक ओझे उतरून ठेवल्यागत वाटले. प्रकरण न्यायासनासमोर असलेल्या अभियुक्तांच्या परीक्षणासाठी दुसऱ्या दिवशी सुनावणीला ठेवण्यात आले.

आम्ही बचावपक्षाच्या वकिलांनी आपापल्या अभियुक्तांच्यावतीने त्यांचे निवेदनरूप प्रतिवादकथन तयार केले होते व ते टंकलिखितही करून ठेवले होते. सामान्यपणे अपराधासंबंधी अभियोग-चौकशीत अभियुक्ताची नीती अशी असते की, पंजाबी म्हणीचा आधार घेऊन सांगायचे म्हणजे, 'एक ना, तो सौ सुख!' एकदा नकार म्हटला की, अभियोगपक्षाच्या पुराव्यातून शंभर पळवाटा काढता येतात. अभियुक्ताने नुसते 'मला गुन्हा कबूल नाही' म्हणायचे नि सगळा प्रमाणभार अभियोगपक्षावर टाकायचा. अभियुक्ताने स्वतःविषयी ओठ आवळून गप्प बसायचे! पण महात्मा गांधी-हत्त्या अभियोग ही काही सामान्य घटना कार्यवाही नव्हती. येथे 'महात्म्याची हत्त्या मी केली, त्याबद्दल मला फासावर चढवा. मी त्या शिक्षेचा स्वीकार करतो. पण माझ्या या कृत्यामागची माझीही, माझ्या मातृभूमीचीही बाजू आहे; ती जगाला, कोर्टासमोर मला सांगू द्या' असे म्हणणारा अभियुक्त अभियुक्तांच्या पिंजऱ्यात होता. त्याला तू आपले निवेदन कोर्टासमोर सांगू नकोस असे कोण–कोणता कायदा, कोणते तत्त्वज्ञान सांगणार? नथूराम गोडसेने आपले निवेदन स्वतःच लिहून काढले होते. त्यावर त्याच्या वकीलमंडळींनी अर्थातच 'सफाईचा हात' फिरविला होता एवढेच. निवेदनाचा मूळचा गाभा, भाषा, तर्कविचार, सर्व काही नथूरामचे स्वतःचेच होते. हे निवेदन, कोर्टाच्या छापील पुस्तकाची ५७ पाने भरली, एवढे प्रदीर्घ होते. हे निवेदन नथूरामने दि. ८–११–१९४८ ला कोर्टात दिले व ते सगळे दिनांक ९–११–४८ रोजी कोर्टामध्ये मोठ्याने वाचून दाखविले. जेव्हा नथूरामने 'मी महात्मा गांधींना वंदन करून त्यांच्यावर पिस्तुलाच्या गोळ्या झाडल्या' या निवेदनाबाबतचा परिच्छेद निःसंदिग्ध शब्दांत नि खणखणीत आवाजात वाचून दाखवला तेव्हा कोर्टातल्या साऱ्या श्रोतृवृंदामधून एक विजेची लहर धावल्यासारखे झाले. नथूरामने कोर्टाच्या प्रश्नाला तोंडी उत्तर देतानादेखील सांगितले की, 'होय, प्रदर्श वस्तू क्र. ३९ या पिस्तुलाने महात्मा गांधींवर मी गोळ्या झाडल्या ही घटना खरी आहे. महात्मा गांधी प्रार्थना प्रांगणाच्या पायऱ्या चढून वर येईतोपर्यंतचे साक्षीदारांचे कथन खरे आहे. महात्मा गांधींवर शक्य तितक्या जवळून सीध्या दोन गोळ्या झाडाव्या असा माझा बेत होता, इतर कोणा व्यक्तीला इजा पोहोचू नये, अशी काळजी मला घ्यायची होती. हाताच्या दोन्ही तळव्यांमध्ये पिस्तुल ठेवून, मी त्यांना वंदन केले. माझ्या बुशकोटाच्या आतल्या खिशातून पिस्तूल बाहेर काढतानाच मी पिस्तुलाच्या घोड्याचा खटका मोकळा केला होता. मला तेव्हा वाटले होते की, मी दोन गोळ्या मारल्या. मागून मला कळले की, तीन गोळ्या मारल्या होत्या.'

त्या दिवशी मी कोर्टात आणि कोर्टातून बाहेर आल्यावर काय काय ऐकले नि बघितले होते त्याबद्दलची कहाणी मी ह्या लेखमालेत पुढे सांगणार आहे. त्याबद्दल येथे पुन्हा लिहीत नाही.

गोपाळ गोडसेने आपले निवेदन २०–११–४८ ला कोर्टात दाखल केले नि त्याच दिवशी तोंडी वाचून दाखविले. कोर्टाने अभियुक्ताला विचारावयाचे प्रश्नही त्याच दिवशी विचारले गेले. त्या दिवशीचे आपले निवेदन वाचतानाची गोपाळची मुद्रा नि एकंदर आविर्भाव माझ्या डोळ्यासमोर अजूनही आहे. त्या दिवशीच मला प्रथम जाणवले की, ह्या माणसाच्या शरीरातीलच काय पण मेंदूमधील रक्तवाहिन्या मांसापेशींच्या नसून शुद्ध पोलादाच्या आहेत. त्यामुळेच की काय, त्याच्या चेहऱ्यावरचा निरागसपणाही पोलादी निश्चयाच्या स्वरूपात दिसे!

श्री. सावरकरांनी त्यांचे निवेदन दि. २२–११–४८ ला कोर्टात दाखल केले व वाचून दाखविले. त्याच दिवशी त्यांचे मौखिक परीक्षणही कोर्टाने केले. त्याबद्दलच कहाणी मी संबंधित संदर्भात वेगळी सांगणार आहे.

डॉ. परचुऱ्यांनी आपले निवेदन दिनांक २२–११–४८ लाच कोर्टात दाखल केले होते. त्यांचे मौखिक परीक्षण मात्र दिनांक १–१२–४८ ला झाले. डॉक्टर परचुऱ्यांनी आपल्या निवेदनात त्यांनी तयार करून आणलेल्या कबुलीजबाबावर सह्या केल्या त्यावेळी त्यांची शारीरिक आणि मानसिक अवस्था कशी होती व ती तशी का झाली होती हे सांगितले होते. त्या संदर्भातल्या निवेदनाचे काही परिच्छेद मी येथे देत आहे.

'पोलिस अधिकारी माझ्याशी फार उर्मटपणाने वागले. किल्ल्यावर त्या दिवसांत फारच थंडी होती. माझी कोठडी अगदी अंधारी होती. सतरा दिवस आणि सोळा रात्री मी त्या दगडाच्या भिंती असलेल्या खोलीत घालवले होते. तेथे संरक्षण विशेषाज्ञेद्वारा बंदीला मिळणाऱ्या कोणत्याही सुखसोयी मला देण्यात येत नव्हत्या, एवढेच काय, पण कोणाला भेटायचीसुद्धा संधी मिळत नव्हती. माझ्या मानसिक वेदना होत्याच पण दर दिवशी मला भेटायला येणाऱ्या ग्वाल्हेरचे सी. आय. डी. पोलिस अधिकारी श्री. खिज़र मुहम्मद यांच्या येण्यामुळे माझ्या शारीरिक वेदनांची त्यात भर पडे. त्यांनी मला वारंवार निरनिराळ्या धमक्या दिल्या. त्यांनी मला असेही

म्हटले की, शेजारीच असलेल्या जुन्या ऐतिहासिक इमारतीमधल्या तळघरातल्या कोठडीत तुम्हाला नेऊन तेथेही तुमची 'मरम्मत' 'छळ करू.' ते मला म्हणत, 'ग्वाल्हेरके हिंदुओंके बडे नेता बनते हो, नहीं ? अब देखो, मैं कैसा बदला चुकाऊँगा !'

'त्या किल्ल्यावरच्या कोठडीत मी तीन दिवससुद्धा राहिलो नाही तोच माझे सांधे धरले, सुजले नि अतिशय दुखायला लागले. मला ज्वरही येऊ लागला. श्री. खिज्र मुहम्मद यांना मी काही औषधे मागितली. पण त्यांनी ती मला द्यायचे साफ नाकारले. काही दिवस गेल्यानंतर किल्ल्यावरचे सैनिक अधिकारी यांनी मला एक मिक्श्चर रसायन पाठवले, ते घेऊन मला जरा बरे वाटले.

'मी तेथे राहून आठ-दहा दिवस झाले असतील–नसतील मला तर किती दिवस, किती रात्री गेल्या आहेत याची शुद्धच नव्हती– तोच ग्वाल्हेर संस्थानाबाहेरचे भारतीय पोलिस अधिकारी मला भेटायला येऊ लागले आणि मला आडवेतिडवे प्रश्न विचारू लागले. ते मला निरनिराळे प्रश्न विचारीत व आडवळणाने काही काही सुचवीत. मला जे जे माहीत होते ते मी त्यांना सांगे, परंतु ते जे काही सुचवीत त्याचा मी स्पष्ट इन्कार करी. एक दोन दिवसांतच त्यांच्यापैकी एक गोड बोलणारे हसरे अधिकारी मला भेटायला येऊ लागले. त्यांचे नांव मला आता कळते की, ते श्री. देऊळकर होते. त्यांनी मला आलटून पालटून धमक्या आणि उपदेश द्यायला सुरुवात केली. त्यांनी दिलेल्या धमक्यांपैकी काही अशा की, 'एवढ्याने काय झाले आहे ? तुमच्या घरच्या सगळ्या मंडळींना पोलिसांनी कैदेत टाकले आहे आणि तुमच्यासारखेच कोठड्यांतून ठेवले आहे.' त्यांचा उपदेश एकच की, 'तुमच्यासाठी तयार केलेल्या जबाबावर तुम्ही सह्या करा.' त्यांनी मला सांगितले की, ह्या कटाचे जाळे साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेले आता कळले आहे आणि त्यामुळे हजारो माणसांना पकडले आहे. त्यांनी मला सुचवले की जबाबामध्ये मी असे लिहावे की, मी माझी व माझ्या सहकारी कार्यकर्त्यांची बाजू स्पष्ट करून सांगत आहे, वगैरे. माझ्या अशा लिहिण्याने माझाही बचाव होईल नि त्यांचेही काम होईल असे त्यांचे म्हणणे होते. मी अशा लिहिण्याला विरोध केला तर ते म्हणाले, 'तुमच्या कुटुंबांतल्या मंडळींचा विचार करा. तुम्हा सगळ्यांनाच त्रास होईल.' 'नथूराम गोडसे दि. २८ जानेवारीला मला भेटायला आला होता हे मी कबूल करीन' असे मी त्यांना सांगितले तर ते म्हणाले की, एवढ्याने भागणार नाही. त्यांनी आणखीही म्हटले की, 'बरेटा' पिस्तुल पोलिसांनी नीलकंठकडून–माझ्या मुलाकडून–ताब्यात घेतले आहे. नथूराम गोडसेजवळून मिळालेल्या पिस्तुलाऐवजी तुमचेच पिस्तुल वापरले गेले असा पुरावा बनवायला पोलिसांना काही कठीण नाही.' त्यांचे हे बोलणे ऐकून मी तर चाटच पडलो. त्यांनी सांगितले की, 'येथून किल्ल्यावरून काढून तुम्हाला मुंबईला घेऊन जायला तुमचेच कॉंग्रेसी सरकार काही नाही म्हणणार नाही. तेथे मुंबईला नेल्यानंतर तुमची काय दुर्गती होईल याची कल्पना करा.' माझे शरीर व्याधींच्या वेदनांनी आधीच मरगळून गेले होते, रात्रभर मी तळमळत होतो. माझ्या मनाचे सारे बांध कोसळून पडल्यागत मला झाले. माझे वडीलबंधु कृष्णराव, एक मोठे सरकारी अधिकारी, ते कैदेत आहेत–माझी पत्नी, माझा मुलगा हीसुद्धा अशाच राक्षसी कोठड्यांतून राहात आहेत–माझ्या कोवळ्या मुलाला पोलिस कोठडीत ठेवून पोलिसांनी त्याचे काय हाल केले असतील–आणि माझी आई–ती ऐंशी वर्षांची सालस, धर्मभोळी, भाविक म्हातारी आई–तिचे काय करतील पोलिस अधिकारी ! तिचा विचार मनात येताच मी अंथरुणात पडलेला ताडकन् उठून बसलो. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या रोखठोक धमक्या नि त्यांचे निर्दय परिणाम यांच्या विचाराने माझ्यामधल्या विरोधाच्या साऱ्या नाड्या गळून गेल्यासारखे झाले. पोलिस म्हणताहेत तर, जबाबावर सही करून द्यावी व आपल्या माता, बंधु, भार्या, पुत्राला तर सोडवावे या यातनातून. शक्य झाले तर मुंबईला नेण्याचेही टाळावे स्वतः करता-असे मनाशी ठरवून सकाळी जेव्हा किल्ल्यावरचे सैनिक अधिकारी औषधाची बाटली घेऊन माझ्याकडे आले तेव्हा मी त्यांना 'श्री. देऊळकरांना मला भेटायला सांगा' असे सांगितले. मी त्या सैनिक अधिकाऱ्यांना सांगितले होते की, 'पोलिस अधिकारी मला एका खोट्या कबुलीजबाबावर सह्या करा म्हणून म्हणताहेत नि मी नाही केल्या तर माझा नि माझ्या सगळ्या कुटुंबाचा सरकार छळ करणार आहे.' 'तुम्ही कोर्टामध्ये ते नाकबूल करू शकता' ते म्हणाले आणि गप्प बसले.

(संदर्भ कोर्टकामाचे छापील पुस्तक दुसरे, पान २२० व २२१ परिच्छेद २, ३, ४ व ५ ओळ पाचपर्यंत.)

डॉक्टरांनी हे त्यांचे लेखी निवेदन कोर्टात कसे वाचले ?–जणू एखादा शाळकरी मुलगा शाळेत आलेल्या डेप्युटी साहेबासमोर, आपले गुरुजी, आपले शाळकरी वर्गबंधु आपल्याकडे बघत आहेत याची जाणीव ठेवून आपला वाचनाचा पाठ वाचतो तसे ! परंतु डॉक्टरांनी कोर्टाच्या मौखिक प्रश्नांना उत्तरे देताना मात्र चांगली, तडफदारपणे उत्तरे दिली. एका प्रश्नाच्या उत्तरात शेवटी डॉक्टरांनी आपणहून सांगितले की, 'श्री अटल महोदयांना सरकारी नोकरीमध्ये मिळणारी वार्षिक वेतनवाढ गेले दहा वर्षांपासून ग्वाल्हेर दरबारने दिली नव्हती, ती आता कबुलीजबाबावर माझ्या सह्या घेतल्यानंतर त्यांना मिळाली. एकदम १०० रुपयांची वाढ मिळाली आहे !'

हे श्री. दफ्तरींनी ऐकले नि माझ्याजवळ येऊन त्यांनी मला विचारले, 'अरे इनामदार ! हा काय लफडा हाय ! खरा हाय का हा !'

'मला काही माहीत नाही. तुम्हीच चौकशी करा ना ?' मी उत्तर दिले.

सगळ्या अभियुक्तांनी आपले लेखी निवेदन वाचून दाखवून कोर्टाच्या प्रश्नांना उत्तरे देताना शेवटी प्रत्येकाने 'आम्हाला काही बचाव पुरावा द्यायचा नाही,' असे कोर्टाला सांगितले होते. म्हणून कोर्टाचे काम लगेच दुसऱ्या दिवशी दोन्ही पक्षांची तर्कसमर्थनाची निवेदने ऐकण्यासाठी निश्चित करण्यात आले.

[ क्रमशः ]

चित्रपट । शिरिष सहस्रबुद्धे

# दोन फसलेले चित्रपट

## चलते चलते

'चलते चलते' हा चित्रपट नव्या धर्तीचा, नव्या लाटेतला: थोडक्यात; चाकोरी-बाहेरचा: आहे, अशी अफवा माझ्या कानी आली नसती, तर तो बघण्याचा प्रयत्न मी केला नसताही. तथापि या चित्रपटाचं व्यावहारिक अपयश पाहता, माझ्यासारखे चकलेले—चुकलेले प्रेक्षक संख्येनं खूपच कमी असावेत; अशी आशा करायला हरकत नाही.

सुरुवातीपासूनच सुरुवात करायची, तर 'चलते चलते' या शीर्षकाचा या चित्रपटाच्या कथानकाशी सुतराम संबंध नाही. केवळ, 'चलते चलते मेरे ये गीत याद रखना,' या 'थीम सॉंग'मधले दोन शब्द उचलून चित्रपटाचं बारसं झटपट उरकलंय असं वाटतं. कथेत नावीन्य नाही. 'अनोळखी तरुणीनं आपण नायकाची पत्नी असल्याचा दावा करणं' हा प्रकार आपण यापूर्वी 'अनामिका' (संजीवकुमार-जया भादुरी) मध्ये पाहिलेलाच आहे. 'चलते चलते'मधली गीता (सिमी गरेवाल) अशीच अनिल (विशाल) च्या, शब्दशः गळ्यात पडते आणि त्यानं अनेकदा धि:कारूनही त्याच्या पत्नीपदाचा हेका सोडत नाही. या उलाढालीत अखेर त्याच्या आणि आशा (नाझनीन)च्या प्रेमसंबंधांचा पुरा खात्मा होतो. गीता निराशेच्या भरात आत्महत्येचा प्रयत्न करते, मात्र अनिलवर तिच्या नावा यत्न केल्याचा आरोप येतो. गीता वाचते, आणि अनिल साहजिकच निर्दोष सुटतो, पण मानसिक तणावामुळे गीताला जवळजवळ वेड लागतं, आणि मत्सरानं पेटून ती आशाची हत्या करण्याचाही प्रयत्न करते. तिला सुधारण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राय (डॉ. श्रीराम लागू) यांनी केलेले प्रयत्न विफल होतात, आणि मग अनिल—आशाच्या प्रेमाच्या सफलतेच्या मार्गातून तिचा काटा काढण्यासाठी तिचा अपघाती अंत घडवून आणण्याखेरीज अन्य पर्याय, कथाकार वा दिग्दर्शकांनाही सुचत नाही. मात्र गीताला 'बळी' म्हणून प्रेक्षकांची साहानुभूती मिळू नये याचीही खातरजमा करण्यासाठी, तिचा अंत, हा तिने केलेल्या आशावरील अयशस्वी खुनी हल्ल्याचाच परिणाम, अशा स्वरूपात दाखवला आहे.

अशा या कथेवरच्या चित्रपटाच्या अपयशात अनेक घटक भागीदार आहेत. उदाहरणार्थ, चित्रपटाच्या अनेक अंगांमध्ये संबंधित कलाकारांचा नवखेपणा जाणवतो. खरोखरच अनेक कलाकार नवखे आहेतही. अगदी साधी चूक सांगायची तर, चित्रपटाचा दुसरा आणि तिसरा भाग संपल्यानंतर, ते संपल्याची सूचना देणारी स्लाइड्सुद्धा पडद्यावर पाहायला मिळते. अर्थात महत्त्वाचं अपयश म्हणजे, आपल्याला नक्की काय दाखवायचं—करायचं आहे, आणि तेही कसं; याविषयी कथालेखक, पटकथाकार दिग्दर्शक, आणि काही अंशी कलावंत, ही सर्वच मंडळी अंधारात वावरली असावीत, असं वाटतं. या कथेतून त्यांना नक्की काय निर्माण करायचं होतं? एक राजपुत्र—एक राजकन्या—एक राक्षसी असा 'मेरे जीवनसाथी'—(राजेश खन्ना—तनुजा—हेलन) टाइप् मसालेदार फॉर्म्युला, की समांतर चित्रपरंपरेतील मनोविश्लेषणाच्या नव्या प्रवाहाशी सुसंगत असा चित्रपट? 'चलते चलते' नेमका या दोन्हीमध्ये कुठं तरी फसलाय्. एक प्रामाणिक धडपड त्यातही जाणवते ती उपरोल्लेखित साच्यापासून दूर जाण्याची; ती जाणवते, ती प्रामुख्याने गीताच्या मनोविश्लेषणात्मक भागामध्ये पतिप्राप्तीसाठी अधीर झालेली पण पतीने ओळखण्यासही नकार दिल्याने तडफडणारी गीता, त्या मुरत आणि खोल चरत जाणाऱ्या विरहव्यथेमुळे तिच्यात उत्पन्न होणारी मानसिक विकृती आणि त्या तणावांचे पुढे आत्महत्या—खुनी हल्ला—अपघाती अंत यात होणारे भीषण पर्यवसान या साऱ्यांतून गीताचं जे मनोविश्लेषण करण्याचा प्रयत्न होतो, तो त्या साच्यातून बाहेर पडण्याचा प्रतीक ठरतो. प्रेमभंगाच्या विलक्षण धक्क्यामुळे उद्भवणाऱ्या ॲक्यूटमॅनिया या मनोविकृतीचं अत्यंत हृद्य व हृदयस्पर्शी चित्रण यापूर्वी 'खामोशी'सारख्या अविस्मरणीय चित्रात घडविलेलं होतं. तुलनेनं पाहता, अनुभवाची ती खोली 'चलते चलते'ला लाभलेली नाही. इथल्या मनोव्यापारसंशोधनात दोन प्रमुख दोष ठळकपणे खटकतात, एक म्हणजे त्यात अनेकदा डोकावणारा अवास्तव नाटकीपणा किंवा भडकपणा आणि दुसरा त्यातील मानसोपचाराशी संबंधित असलेल्या भागाची अर्ध शास्त्रीयता. विशेषतः चित्रपटाच्या अगदी अखेरच्या भागातला, गीताने केलेला आशाच्या खुनाचा प्रयत्न हा तद्दन फिल्मी प्रकार एखाद्या 'सस्पेन्स थ्रिलर'मध्येच शोभण्यासारखा आहे. आणि डॉ. लागू यांनी आपली लहानशी भूमिका जबाबदारीनं निभावली असली, तरी त्या पात्राची कथेत अंतिमतः खरोखरीच अपरिहार्य गरज होती का, आणि त्यांच्या मानसोपचारांना शास्त्रीय बैठक कितपत आहे, हे दोन्ही वादविषय होऊ शकतील.

अशा या फसलेल्या चित्रपटाला थोडंसं तारलंय ते सिमी व नाजनीन यांच्या अकृत्रिम भावदर्शनानं आणि उगवते गीतकार— संगीतकार अमित खन्ना व भाप्पी लाहिरी यांच्या सुरेल कारागिरीनं. काही लक्षात राहण्यासारखे शॉट्स् आणि काही ताज्या— फ्रेश—स्वररचना या उभयतांनी सादर केल्या आहेत. किंचित अपऱ्या पण धारदार नाकाच्या नाजनीनसंबंधी भविष्यात अपेक्षा बाळगायला हरकत नाही. मात्र अनिलच्या भूमिकेत विशालने निराशा केलेली आहे. बावळटपणा आणि वैताग यांचं एक चमत्कारिक मिश्रण हेच एक एक्सप्रेशन सदैव चेहऱ्यावर वागवणारा हा इसम 'रोमॅंटिक' प्रसंगात आपले अंकल देवआनंदच्या स्टाइलस मारतो आणि संवादफेकीतही तशीच अफाट गडबड करून,

प्रेक्षकांना अतीव बोअर करण्यात सिंहाचा वाटा उचलतो. दिग्दर्शक या नात्यानं सुंदर दार यांनी काही खास कामगिरी बजावली आहे, असं वाटत नाही. चित्राची गती कंटाळा येईल इतकी संथ आहे; आणि ते चौदा रिळांचंच असलं, तरी अधिक काटछाटीला निश्चितच वाव होता, कारण अनेक सिच्यु-एशन्स अकारण ताणलेल्या लांबवलेल्या वाटतात; मानसोपचार प्रकरण हे त्यांपैकी एक ठळक उदाहरण.

एकंदरीतच, मानसशास्त्रातील अर्ध-शास्त्रीय भागाचं भडक 'हिंदीकरण' करून आणि त्याच्या आधारावर प्रेमाच्या त्रिकोणासारख्या पेटंट हिंदी मसाल्याचे इमले उभारून तयार केलेला हा 'चलते चलते' चालण्यासारखा नाही इतका त्याचा पाया ठिसूळ आहे; डोलारा डळमळता आहे. ◻

## सबसे बडा रुपैया

चित्रपटव्यवसायातून मेहमूदमियाँ पूर्णपणे नाही, तरी बहुतांशी निवृत्त झालेले आहेत. ही समाधानाची बाब आहे असं मला वाटतं, मुंबईत राहून डझनावारी चित्रपटांत काम करताना त्याच्या कॉमेडीनल्या तोचतोचपणाचा वीट आला होता. आता मात्र अगदी मर्यादित चित्रपटांतून तो दिसतो, आणि मग त्याची कॉमेडी पुन्हा आकर्षक वाटू लागते. 'सबसे बडा रुपैया' या मेहमूद प्रॉडक्शनच्या नव्या कॉमेडीचं थोडंफार असंच घडलंय. मेहमूदच्या चाहत्यांनाच नव्हे, तर इतरांनाही सुखद ठरावी अशी एक भूमिका त्यानं त्यात पेश केली आहे.

या चित्रपटाचाही विषय तसा शिळाच. पैसा हा याचा केंद्रबिंदू आणि 'पैसा हाच परमेश्वर' हे याचं मूलतत्त्व. नातीगोती, भावना, औदार्य, प्रेम इ. सर्वांपेक्षा पैसा श्रेष्ठ, हे सूत्र राबणारं हे काही पहिलंच चित्र नव्हे. मात्र मेहमूदनं हा संदेश आपल्या खास ढंगानं दिला आहे. मात्र 'चलते चलते'मध्ये खटकलेला दोष; या चित्रपटातही प्रकर्षानं जाणवतो तो असा की, स्वत: मेहमूद, पटकथा संवादलेखक अबरार अल्वी आणि दिग्दर्शक एस्. रामनाथन (मेहमूदच्याच 'बॉम्बे टू गोवा'चे यशस्वी दिग्दर्शक) अशी अनुभवी मंडळी एकत्र येऊनही आपल्याला नक्की काय साधायचंय, याचा संपूर्ण आवाका– total Perspective– या कुणालाच पुरेसा आलेला नाही, परिणामी कथा निखळ विनोदी– pure comedy न बनता; सर्वांगीण रंजन, शोकान्तिकेची संभाव्यता, बोधवाद आणि कहर म्हणजे क्वचित प्रचारकी थाट, अशा निरनिराळ्या पातळ्यांवर गोंधळलेल्या अवस्थेत भटकत राहते. अर्थात यालाही एकवेळ हरकत घेतली नसती, कारण मेहमूदी चित्रपटात कथेची परवड होणं स्वाभाविकच असतं. पण इथं इतर गोंधळाबरोबरच मंडळींना कथानकाचा मध्यबिंदूच नीटसा ठरवता आलेला नाही; त्यामुळे रोमान्स, (हिंदी अर्थाने !) संदेश आणि मेहमूदमियाँची कॉमेडी या तीन बिंदूभोवती गुंफली जाऊन कथेचे तुकडे पडल्यासारखे वाटतात.

कथानक व पात्रे दोन्ही सांकेतिकच : आधुनिक सूक्ष्मता, तरलता नाहीच. अमित राय (विनोद मेहरा) हा एक बडा उद्योगपती. पण दानधर्मात अवाजवी उधळपट्टी करणारा, आणि त्याला सदैव संपत्तीमाहात्म्य ऐकवणारा त्याचा जुना मित्र आणि मॅनेजर नेकीराम (मेहमूद) या दोन परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वात संघर्षाच्या ठिणग्या पडतात आणि विनोद मेहराजींना कायमचा धडा शिकवण्यासाठी, हिंदी सिनेमातच शोभावा असा पराक्रम करून, मेहमूदमियाँ त्यांची सर्व जायदाद वगैरे गिळंकृत करतात आणि त्यांना अधेमधे न लटकवता तत्काळ थेट देशोधडीला लावतात. त्यांची प्रेयसी व भावी पत्नी सुनीता (मौसमी चतर्जी) हीसुद्धा बळकावण्याच्या इराद्याने तिच्या वडिलांवर (जीवन) दडपण आणतात. 'वनवासी' अमित रायचा अपमान करूनच हे नेकीरामजी थांबत नाहीत, तर त्याला गुंडाकरवी पिटण्याचेही कारस्थान– अर्थात त्याच्या अंतिम हितासाठीच– यशस्वी करतात. गोष्टी टोकाला आल्यानंतर मोठ्या नाटकीपणे सारा खुलासा करून नेकीराम रायला 'सबसे बडा रुपैया' हा मूल्यवान बाळबोध संदेश देतो आणि चित्रपट संपतो; तेव्हाच डोंगर पोखरून उंदीर निघाल्याचं प्रेक्षकांच्या आस्तेआस्ते ध्यानात येतं.

या बेतलेल्या मेहमूदी चित्रात, कथात्मक व कलात्मक मूल्यांचा विचार नाही असं मी म्हणतो, तेव्हा त्याच्या लोकरंजनाच्या क्षमतेचा मला अनादर नक्कीच करायचा नाही. या रंजनामधला रोमँटिक भाग विनोद–मौशुमी जोडीकडे आणि विनोदाचा ठेका मेहमूदला अशी सोपी तडजोड झालेली आहे. त्याशिवाय मग नृत्य–फायटिंग वगैरे हिंदी चित्रपटविश्वाचे आजीव सदस्य हजर आहेतच. आपला प्रेक्षक प्युअर कॉमेडी सहजपणे स्वीकारत नाही, तोपर्यंत ही व्यावसायिक तडजोड अपरिहार्य. अर्थात या ठिकाणी तरी ज्याने त्याने आपापली कामगिरी इमानानं बजावली आहे. विनोद मेहराच्या अभिनयक्षमतेला कठोर मर्यादा नैसर्गिकरीत्या आहेत, त्या इथेही जाणवतात. तथापि मेहमूदच्या चित्रपटात तो थोडा अधिक मोकळेपणानं वावरतो असं दिसतं. यातलं कोळी नृत्यगीत हे याचं एक उदाहरण. मौशुमीची भूमिकाच इतकी दुय्यम आहे की, त्यात दोष दिसण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तिच्या भूमिकेवर लादल्या गेलेल्या मर्यादा पाहता, तिच्यापेक्षा फरिदा जलालला अधिक वाव मिळाल्याचं दिसतं, आणि फरिदानंही त्याचा पुरेपूर उपयोग करून घेऊन आपली स्वतंत्र छाप निश्चितपणे पाडली आहे. नेकीरामची मध्यवर्ती भूमिका सजवताना मेहमूदनं आपल्या विशिष्ट शैलीला काही नव्या लकबींची, चालण्यातल्या आणि विशेषत: बोलण्यातल्या खास सवयींची जोड दिली आहे. या व्यक्तिरेखेला उत्तरार्धात त्यानं दिलेलं काहीसं खलनायकी वळण लक्षणीय आहे. यशस्वीही आहे. तथापि भावनाविष्कारात तो नेहमीप्रमाणेच कमी पडतो आणि चित्राच्या शेवटचं त्याचं रडणं हा चित्रपटातला सर्वाधिक हास्यकारक प्रसंग ठरतो.

'सबसे बडा रुपैया'चं संगीत हे त्याचं एक महत्त्वपूर्ण अंग ठरावं. आर. डी. बर्मनचे संगीतसाहाय्यक बासू–मनोहारी यांना या चित्राद्वारे प्रथमच स्वतंत्रपणे संगीत देण्याची संधी मिळाली असून त्यांनीही तिचं पुरेपूर चीज केलेलं आहे. नवनव्या संगीतकारांना पुढे आणण्याचे स्वागतार्ह प्रयत्न आज हिंदी चित्रपटसृष्टीतल्या संगीतात 'फ्रेशनेस्' आणीत आहेत. या चित्रातल्या लोकगीतांचा ताजेपणा त्यांना हातभार लावणाराच ठरेल.

विशेषत: 'बळी जइयो न रानी...' आणि 'दरिया किनारे एक बंगलो ग पोरी...' ही दोन वेगवेगळ्या प्रकृतींची गीतं माझ्या विशेष आवडीची. त्यातलं दुसरं उसळत्या उत्साहानं भारलेलं गीत झपाट्यानं लोकप्रियही होतंय्. गाण्यांच्या चित्रीकरणाचाही दर्जा चांगला आहे. 'द होल थिंग इज् दॅट...' हे गाणं वगळता अन्य तीनही गाण्यांचं चित्रीकरण आकर्षक आणि मुख्यत: नेत्रसुखद आहे. 'चलते चलते 'मधल्या 'प्यार में कभी कभी ऐसा होता है' या शेवटच्या गीताबद्दल हेच म्हणता येईल.

चित्रपटाच्या कथाप्रवाहात काडीचीही तर्कशुद्धता नाही. नेकीरामचा कारस्थानामागचा तथाकथित पवित्र हेतू अखेरीस उघड झाला, तरी त्यामुळे त्याच्या आधीच्या कृती अधिकच असमर्थनीय ठरतात, आणि शेवटच्या संदेशाला बटबटीत प्रचारकी थाट प्राप्त होतो. अर्थात हेही खरंच की, मेहमूदचे चित्रपट डोकं बाजूला काढून ठेवून पाहिलेलेच बरे, कारण बहुधा तोसुद्धा ते त्याच मार्गानं तयार करीत असावा. नाहीतरी त्याच्याकडून अधिक काय अपेक्षा करणार ? □

# चित्रचक्कर

## अनोख्या दोस्तीची कथा

# खान दोस्त

हिंदी चित्रसृष्टीमध्ये सर्वसाधारणपणे ज्या दोन परस्परविरोधी शक्तींचा संघर्ष आजपर्यंत पडद्यावर रंगवला गेला आहे, त्या दोन शक्तींच्या अनोख्या दोस्तीची एक अफलातून कहाणी खान दोस्तमध्ये आकाराला आली आहे.

भोळेभाबडे जीव आणि बनेल गुन्हेगार यांच्यातला संघर्ष आपल्याला नवीन नाही. त्यातून या संघर्षाला सुष्टदुष्ट शक्तींच्या संघर्षाचे चिरकालीन स्वरूप दिले असले, तर अशी कथा हमखास गल्ला भरू ठरणार हे निश्चित. त्यातून नेहमीच्या बाष्कळ प्रेम कहाणीपेक्षा वेगळे काही देण्याचा प्रयत्न असेल तर त्याचे यश अधिकच.

फाशीची शिक्षा झालेला एक खुनी गुन्हेगार रहिमतखान (शत्रुघ्न सिन्हा) आणि त्याच्यावर प्रेम करणारा तुरुंगातीलच एक हवालदार रामदीन (राजकपूर) यांच्या प्रेमाची ही कथा. गुन्हेगार आणि पोलिसांची व्यावसायिक प्रेम प्रकरणे, लाचलुचपत आणि सहकार्य यांचे अनेक आविष्कार आपण हिंदी चित्रात नेहमी पाहतो. पण ही प्रेमकहाणी तशी नव्हे. तशी म्हणजे निखळ स्वार्थावर, पैशावर आधारित प्रेमाची नव्हे, तर त्याहीवर नेणारी खऱ्या प्रेमाची.

हवालदार रामदीन हा धर्मभीरू, पापभीरू, सत्प्रवृत्त आणि त्यामुळे अर्थातच भोळाभाबडा असा एकनिष्ठ सेवक. सर्वांवर सारखेच प्रेम करा वगैरे सांगणाऱ्या संत महात्म्यांचा अवतारच. तुरुंगावर पहारा करणारा हा हवालदार म्हणजे खरं तर गुन्हेगार कैद्यांचा कर्दनकाळ वगैरे असायचा. पण रामदीन म्हणजे भल्या भल्या गुन्हेगारांशी चक्क गट्टी जमवणारा. त्यांचे भले व्हावे म्हणून झटणारा. त्यासाठी बहुतेक वेळा इतरांशी खोटे बोलणारा. असा हा खास हिंदी फिलमवाल्यांनी बेतलेला आणि सदासर्वकाळ भाव खाऊन जाणारा रोल. तर अशा या सत्पुरुषाच्या हातामध्ये रहिमतखान नावाचा एक खुनी गुन्हेगार सोपवला जातो. हा आणखी काही दिवसांतच फासावर जायचा असतो, पण हा मग्रूर कैदी तुरुंगात प्रवेशतो तोच मुळी साऱ्या अधिकाऱ्यांवर गुरकावत, आरडाओरडा करत. आल्याआल्याच तो एका विशालकाय कैद्याची (देवकुमार) हड्डी नरम करतो. तुरुंगातले जेवण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या तोंडावर फेकतो. इतका वेळ हे सारे पाहात असलेला रामदीन आता मात्र विलक्षण संतापतो आणि मग त्या कैद्याची जाम पिटाई करतो पण रात्री स्वत: येऊन नियमाविरुद्ध त्याला घरगुती तुपातले परोठे खिलवतो. कर्तव्य व प्रेम यांचा हा आजचा आविष्कार बघून कैदी पण चक्रावतो.

रहिमतखानाची आई त्याला भेटायला येते, तर रामदीन चक्क तिला आपल्या घरी ठेवून घेतो. आईला शिव्या दिल्या म्हणून रहिमतखानला शिव्यांची लाखोली वाहतो. आईच्या प्रेमावर एक व्याख्यान देतो. हे सर्व पाहून रहिमत रामदीनच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्याला गंडवतो. आई आजारी आहे वगैरे सांगून त्याला भरीला घालतो आणि एका रात्रीपुरती स्वत:ची सुटका करून घेतो. इंटरव्हलपर्यंत बरी बांधत आणलेली कथा यानंतर एकदम नेहमीच्या हिंदी स्टाईलवर जाते.

रहिमतखान आपल्या गँगमध्ये परत जातो. त्याची यारी—दिलवालीच्या कोठीवर लपतो. मग रामदीन त्याच्या शोधार्थ बाहेर पडतो. अर्थातच मधेच रहिमतची आई मरण पावणे, दुसऱ्या गँगचा रहिमतवर हल्ला, त्यात रामदीनचे डोळे जाणे, ते परत आणण्यासाठी स्वत:च्या कष्टाचा पैसा पाहिजे म्हणून रहिमतने पुन्हा तुरुंगात परतणे, अशा नेहमीच्या पद्धतीने मग ही कथा संपते. आणि एका चांगल्या कथेची वाट लागल्याचे पाहून आपण मात्र कपाळावर हात मारतो.

खरंतर रामदीन व रहिमतसारखी संपूर्ण परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वे समोरासमोर उभी ठाकली असताना कथा जबरदस्त जमायला हवी होती. पण गल्ल्याकडे पाहून कथा बदलल्याचे सतत जाणवत राहते. असा जबरदस्त विषय असताना एकाही गाण्याची आवश्यकता नव्हती, पण तुरुंगातही चक्क दोन गाणी घुसडलीं आहेत. कोठीवरचा नाच, हाणामाऱ्यांची दृश्ये ही तर अगदीच टुकार घेतली आहेत. रामदीनचे डोळे जाणे हा भाग तर आता पाहून पाहून कंटाळा आला आहे.

कालीचरण हीट गेल्यानंतर शत्रुघ्नवर कॅमेरा केंद्रित करून दुसरी कथा घई व भल्लांनी पाडली नसती तरच नवल. पण कथेपेक्षा जैतेंद्र जैनचे संवादच अधिक लक्ष वेधून घेतात. दुलाल गुहांबद्दल काय बोलायचे? त्यांची काही तरी कामगिरी पाहायला मिळेल असे वाटले होते. पण दिग्दर्शनात तसे खास काहीच नाही.

रामदीनच्या भूमिकेत राजकपूर एकदम फिट्ट बसतो. अर्थात अशा भोळ्याभाबड्या भूमिका हा तर त्याचा पूर्वापारचा विशेष. 'जिस देशमे गंगा' असो, 'सपनोंका सौदागर' असो, नाहीतर 'जोकर' असो. राज दिसणार तो भोळ्याभाबड्या, पापभीरू भूमिकेतच. आपली ही खास प्रतिमा त्याने याही भूमिकेत चांगली सांभाळली आहे. राज जबरदस्त अदाकार आहे हे काही नव्याने सांगायला नको. आणि तो असला म्हणजे समोर कोणीही असो. आपलाच प्रभाव तो चित्रावर दाखवत राहणार हे निश्चित. ही भूमिका त्याने अशीच जीव लावून केली आहे. खरं तर, त्याला अशी फिट्ट बसणारी, त्याच्या जुन्या भूमिकांचे स्मरण करून देणारी भूमिका त्याला बऱ्याच काळानंतर मिळाली आहे.

राजसारखा जबरदस्त अदाकार समोर उभा असताना शत्रुघ्नही त्याच्या तोडीस तोड भूमिका उभी करतो हे या चित्राचे वैशिष्टय. अट्टल बदमाष, खुनी गुन्हेगार ही त्याची नेहमीचीच इमेज या ठिकाणीदेखील आहे. पण सारे चित्रच या दोघांभोवती फिरत असल्याने नेहमी ठोबळ असणाऱ्या या भडक प्रतिमांना खूप बारकावे यात प्राप्त झाले आहेत. आणि ते सारे शत्रुघ्न सुरेख उभे करतो.

या चित्रात दोन सुखद धक्के बसतात ते सत्येन कप्पू व मिठू मुखर्जी यांच्या भूमिका पाहून. बंगाली चित्रसृष्टीतून नव्यानेच हिंदीत पाऊल टाकणारी मिठू मुखर्जीची पहिलीच भूमिका असून चांगली लक्षात राहते. या भूमिकेने तिचा चांगलाच गाजावाजा झाला असून बरेच नवे चित्रपट तिला मिळाले आहेत. अर्थात त्यात दुलाल गुहांच्या चित्रांची संख्या अधिक आहे. सत्येन कप्पूने आजवर अनेक भूमिका केल्या आहेत पण त्या बहुधा टाईप कास्ट झालेल्या असायच्या. यावेळी त्याच्या अभिनयाला वेगळेपणाचा वाव देणारी जेलरची भूमिका त्याला मिळाली अन ती त्याने सुरेख वठवली आहे. सत्येन कप्पू आता स्टिरिओ टाईप भूमिका सोडून अशा वेगळ्या भूमिकांतून आता दिसेल अशी आशा करायला हरकत नाही. ◻

## अमोल–ड्रीमबॉय !

'छोटीसी बात' सर्वत्र हाऊसफुल्ल गर्दी खेचू लागला आणि अमोल पालेकर हे मराठी नाव पुन्हा एकदा सर्वत्र चर्चिले जाऊ लागले. रजनीगंधाने अॅवॉर्डस् मिळवून अपूर्व यश दिलें होतेच, पण 'छोटीसी बात' अधीक हीट गेला. सदाहरित चॉकलेट हिरोंच्या राज्यात कोणतेही ग्लॅमर नसलेली सामान्य तरुणाची भूमिका करून अमोलने बाजी मारली एवढे मात्र खरे.

नुसती बाजी मारली असे नव्हे, तर आजवर हिंदी चित्रसृष्टीत कोणालाच प्राप्त न झालेले एक नवेच नामाभिदान सर्वत्र त्याला प्राप्त होत आहे आणि तेही तमाम कॉलेज तरुणींकडून. हे अफलातून नाव काय माहीत आहे? 'ड्रीम–बॉय'. कॉलेज तरुणींच्या स्वप्नभऱ्या या जगाचा राजा. बसस्टॉपवर, बसमधून कॉलेजात, कँटीनमध्ये सर्वत्र तरुणींच्या तोंडी सध्या हाच विषय अमोल–ड्रीमबॉय–अमोल.

आपल्या इंडस्ट्रीत ड्रीमगर्ल, सुपरस्टार असा आपला उल्लेख व्हावा म्हणून बडबडी मंडळी पाण्यासारखा पैसा ओततात. पत्रकारांना, आपल्या चमच्यांना, पार्ट्यांवर पार्ट्या देत असतात, पण इथे सगळेच निराळे. ग्लॅमर नसलेल्याच एका भूमिकेने–किंबहुना त्यामुळेच–अमोलने साऱ्या तरुणींना जिंकून घेतले. कोणासाठी कवडीही खर्च न करता चक्क पब्लिककडून वदवून घेतले. अर्थात कानामागून येऊन असा तिखटपणा दाखवल्यामुळे इंडस्ट्रीवाले रागावले नसतील तरच नवल, पण करतात काय बिचारे.

अमोलने सध्याची त्याची इमेज न गमवता नव्या भूमिका स्वीकाराव्यात असेच कोणालाही वाटेल. आणि याची पक्की जाण अमोललादेखील आहे. ही छोटीसी बात बडी झाली. आपला साधासुधा चेहरा चॉकलेट हिरोंच्या लायनीत गेला तर, आपला खरा अवतार संपला हे तोदेखील समजून आहे. त्यामुळेच भूमिका स्वीकारताना नेहमीचा चोखंदळपणा त्यांनी कायम ठेवला आहे.

त्याच्या या चोखंदळपणाने परवा एक गंमतच झाली. एक 'बडा बॅनर'वाले निर्माता सांगत होते, मी अमोलला रोल ऑफर करायला गेलो तर विचारतो, 'काय स्टोरी काय आहे?' आता तुम्हीच सांगा, मी एवढे मोठे बॅनर त्याला द्यायला तयार झालो आहे, तर कथा ऐकण्यासाठी हा अडून बसलाय, आणि वर म्हणतो काय, 'उगाच भलता सलता रोल करणार नाही, नाही तर मी आपली शेट्टीला ढुशी मारायची आणि त्याने दोन कोलांट्या खाऊन पडायचे ही भंकस नाय पायजे.'

अमोलचे हे डॅशिंग आपल्याला एकदम मंजूर. बॅनर मोठे असले की, कथेचे काय एवढे असे मानणाऱ्या हिंदीवाल्यांना आता अशा ढुशा दिल्याशिवाय ही मंडळी सुधारायची नाहीत. आणि कथेपेक्षा बॅनर मोठे मानून अमोलची इमेज टिकायची पण नाही. तेव्हा या ड्रीमबॉयच्या नव्या कथेचा इंतजार. ◻

## तुम्ही घेणार का संन्यास ?

सध्या इंडस्ट्रीत जो तो एकमेकाला घाबरून हाच प्रश्न विचारतोय, 'काहो, तुम्ही घेणार का संन्यास?' कारण भगवी कफनी आणि रुद्राक्षमाळांचा भाव सध्या जाम वधारला आहे.

मध्यंतरी चित्रपटसंन्यासाची एक लाट उसळली होती. त्या लाटेत बडे बडे कलाकार वाहून गेले अन् निर्मातिमंडळी मात्र हवालदील झाली. आता पुन्हा एक लाट येत आहे. संन्यासाचीच–पण हा चित्रपटसंन्यास नव्हे; तर इंडस्ट्रीत राहून चक्क सर्वसंगपरित्याग, भगवी कफनीवाला संन्यास. विजय आनंदने रजनीशांचे शिष्यत्व पत्करल्यापासून ही नवी लाट उसळू लागली आहे. मोठेमोठे बाबा, मुनी, महाराज यांचे शिष्यत्व ही तशी नवी बाब नाही. पण त्या फॅशनमधली ही नवी चीज नाही. इथे ऐकू येते आहे ती चक्क अध्यात्म, आत्मा वगैरेंची भाषा. बरे, हीदेखील तशी तोंडदेखली नाही, तर चक्क मद्यपान, मांसभक्षण इत्यादी नेहमीच्या गोष्टींनासुद्धा सुट्टी. चित्रविचित्र पोशाखांऐवजी भगवी कफनी म्हणजे कमालच.

विजय आनंदचे एक ठीक आहे. पण त्या पाठोपाठ विनोद खन्ना, तरुण दिग्दर्शक महेश भट्ट यांनी पण हे खडतर व्रत स्वीकारावे, हेसुद्धा बरे म्हणायची वेळ यावी, अशी अफवा इंडस्ट्रीत पसरली अन् जाम खळबळ उडाली. अफवा काय तर, ऋषिकपूर विजय आनंदची दीक्षा घेणार. बापरे, या सुकुमार राजपुत्राकडून हे व्रत कसे बरे निभणार? घेतला वसा हे बाळ टाकून तर देणार नाही? आणि मग राजकुमारच्या भव्य स्वप्नांचे काय होणार? असे अनेक चिंतायुक्त प्रश्न निर्माण झाले. काही चिंतातुर जंतूंनी चक्क चिंतूलाच गाठले अन् बेधडक विचारले की, पण काय स्वारी खवळलीय. अखेर ती अफवाच ठरली तर.

— निलेशकुमार

# परंतू दादा कोंडके सोंगाड्ये इतके झाले!



मंदू राजे

## लेखांक पाच

एखादं हलकंफुलकं शृंगारिक, द्वयर्थी, फार्सिकल रिबाल्ड (Ribald) गाणं अन् त्यानंतरची सोंगाड्याची बतावणी कॉमेडी ही वॉडेविल बोर्डावरची परंपरा चॅप्लिन व त्याच्यानंतर पाच वर्षांनी मूक चित्रपटांत शिरणाऱ्या किटनमुळे निदान सिनेमापुरती तरी संपुष्टात आली. सिनेमापुरतं सोंगाड्याचं गाणं विरून गेलं. अगदी सुरुवाती सुरुवातीला, सिनेमा दाखवताना पार्श्वसंगीत म्हणून, काही बॅण्ड वगैरे वाजत असे पण तो केवळ जुजबी परिणामापुरता. बस्टर किटन तर मूक चित्रपटांतून बोलणाऱ्या सिनेमात गेलाच नाही. बदफैली बायको, अति शराब पिणं आणि फुपफुसाचा कॅन्सर यांच्या विकल, अपरिहार्य दबावाखाली बस्टर वैयक्तिक ट्रॅजिडीचा वेध घेत स्वजर्जर होत गेला, तर चॅप्लिन बोलके चित्रपट आल्यानंतरही हट्टानं मूक चित्रपटांना धरून बसला. 'हे बोलण्याचं फॅड लवकरच जाईल' असं जरी चार्ली वरपांगी बोलत होता, तरी सिनेमातल्या बोलण्यामुळं त्याच्या ट्रॅम्पचं युनिव्हर्सल स्वरूप नष्ट होईल ही एक भीती–(हाऊ इज् द ट्रॅम्प टॉक ? चॅप्लिन म्हणाला होता) व स्वतःचे सदोष उच्चार ही रास्त शंका चॅप्लिनला होतीच. आणि म्हणूनच बोलपटाचा जमाना सुरू झाल्यानंतरही, चॅप्लिननं सिटी लाईटस् हा मूक चित्रपटच निर्माण केला. त्यानंतरच्या ग्रेट डिक्टेटरमध्येही चॅप्लिन प्रथमच बोलला ते ट्रॅम्पद्वारे. नाही तर त्याच्याचसारख्या दिसणाऱ्या डिक्टेटरच्या मुखानं......

आणि चॅप्लिनच्या पुढच्या बोलपटात चार्लीचा ट्रॅम्प संपूर्ण संपला. 'इट वॉज् नेसेसरी टू मर्डर हीम' चॅप्लिननं लिहून ठेवलंय.

म्हणूनच त्याच्या पुढल्या, पहिल्या संपूर्ण बोलपटात चॅप्लिन पडद्यावर आला तो, चार्ली चॅप्लिन म्हणून नाही, तर चार्लस् चॅप्लिनच्या नव्या स्वरूपात. फ्रान्समधील कुप्रसिद्ध ब्लूबिअर्ड खुनी, लॅण्ड्र्यूच्या जीवनावर बेतलेल्या मोशिए व्हर्डू या बोलपटात चॅप्लिन एक पैशसाठी बायांना फितवून, लग्न करून खून करणाऱ्या थंड रक्ताच्या खुन्याच्या भूमिकेत उभा राहीला न त्याच्यावर टीकेचा भडिमार झाला. ही अत्यंत सुंदर ब्लॅक कॉमेडी केवळ अकलात्मक भडीमारातच गाजली. त्यानंतरची चॅप्लिनची अमेरिकन सरकारी ससेहोलपट प्रसिद्धच आहे.

पण तरीही सोंगाड्या संपूर्ण संपला–मेला नव्हता. तो शेवटचाच दिसायचा होता न तोदेखील त्याच्या असली, पारंपारिक वॉडेविल स्वरूपात. जुना सोंगाड्या व नवा चॅप्लिन अशी चार्लीची दोन रूपं दाखवणाऱ्या लाईम लाईटमध्ये ह्या सोंगाड्याचं मरणच चित्रीत केलं गेलं......अवतार समाप्तीची इतिहास नोंद !

एका खचलेल्या, पोखरलेल्या सोंगाड्याची शेवटली वर्षं नोंदणाऱ्या ह्या चित्रपटांचा विकल तरीही हसरा शेवट मी कधीही विसरणार नाही. आणि जणू ह्या सोंगाड्याचं अखेरचं ऐतिहासिक मरण संपूर्ण अर्थानं थरारून जिवंत व्हायचं होतं म्हणूनच की काय, या प्रवेशात चार्लीच्या साथीला होता म्हातारा, रोगजर्जर, हाडाळ, वाळलेला बस्टर किटन !

**पण धुण्याच्या घंगाळात**
**शेवटचा डायलॉग मारून मरणारा**
**हा सोंगाड्या मराठमोळ्या**
**ग्रामीण मातीतून जन्मायचा होता**
**तो दादा कोंडकेच्या निमित्तानं....**

......स्प्रिंग इज् हीअर......सोंगाड्याचं गाणं म्हणून झालेलं असतंय...तो आता व्हायोलिन वाजवणार असतोय...त्याच्या व्हायोलिन सुराला...बस्टरचा पियानो सूर जुळत नाहीय्...सोंगाड्या पुन्हा पुन्हा वाजवून दाखवतोय...बस्टर अख्ख्या पियानोभर तो सूर हुडतोय्...ताटकळून चॅप्लिनच्या पायाला मुंग्या येताहेत...बस्टरचे पियानोवरील सूर कागदासारखे घरंगळताहेत...घामानं त्याचा चष्माही सारखा सरकतोय. पाय झटकताना चॅप्लिनच्या पायानं त्याचं व्हायोलिन तुटूनफुटून जातंय्......

आणि बस्टरला असली सूर सापडतोय्...अचानक...सोंगाड्या त्याच्या मागच्या खिशातून एक खेळातलं व्हायोलिन काढतोय...... आणि तुफान संगीताची बेहोशी चालू होतेय...त्या बेहोशीत सोंगाड्या स्टेजवरून खाली पडतोय तो कपडे धुण्याच्या लाकडी घंगाळात. तरी तो व्हायोलिन वाजवतोच आहे...पियानोही घुमतोय...प्रेक्षकांतून प्रचंड टाळ्यांच्या वर्षावात टबात अडकलेल्या सोंगाड्याला टबासकट स्टेजच्या मध्यभागी आणलं जातंय् न तो सोंगाड्या म्हणतो, शेवटचं म्हणणं म्हणतोय......I would like to continue but I am stuck......आणि मान टाकतो......चार्लीचा सोंगाड्या संपूर्ण संपलाय......!

पण धुण्याच्या घंगाळात शेवटचा डायलॉग मारून मरणारा हा सोंगाड्या मराठमोळ्या, ग्रामीण मातीतून जन्मायचा होता तो दादा कोंडकेच्या निमित्तानं. हे पुनरुत्थापन अपघातानं, कर्मधर्मसंयोगाने केवळ धंद्याच्या हिशेबानं किंवा कसंही व्हायचं होतं हे गैरलागू आहे. ही चमत्कृती घडायची होती न ती घडली हाच महत्त्वाचा भाग. 'विच्छा माझी पुरी करा' सारख्या लेखनदृष्ट्या अतिसामान्य वगातूनदेखील हा सोंगाड्या जिवंत राहिला.दादाच्या आतापर्यंतच्या बेतासबात चित्रपटांतून तो जिवंत राहिला, याबद्दलचं संपूर्ण श्रेय दादाला जातंय, ते कलात्मक चित्रपटांचा डांगोरा पिटणाऱ्या दुढ्ढाचार्यांना, कदाचित मान्य नसेल पण प्रेक्षकांनी त्याला उत्स्फूर्त उचलून धरलंय. जगभरच्या चित्रपट इतिहासातदेखील निखळ कलात्मक बोलपट हाताच्या बोटांवर मोजण्याइतपतच झालेले आहेत. आणि म्हणूनच दादाचे बोलपट सामान्य दर्जाचे असले, तरी सामान्यांना रिझवणारे असामान्य आहेत. हा सामान्यांना हसवण्याचा धंदा अनेकांनी केलेला आहे. अगदी किटन, चॅप्लिनपासून थेट अत्रे, पुलंपर्यंत. पण या मंडळींना मिळालेली वाजवी प्रतिष्ठा दादा कोंडके या इसमाला का मिळाली नाही याचं मला नेहमीच आश्चर्य वाटतं.

काळपिढी चुकलेल्या दादाच्या या सोंगाड्याला गाणं चिकटणं ह व्यावसायिक अटळ भाग होताच, पण ज्या चपखल रीतीनं हे गाणं सोंगाड्याचं अविभाज्य अंग बनलं, यात सोंगाड्याच्या प्रवृत्तीचा जितका भाग आहे तितकाच दादाच्या स्वभावप्रकृतीचा; कारण गाणं हा दादाच्या मूलभूत प्रकृतीचा स्थायिभाव आहे.

बालपणात वारकरी वडलांना सुरात वाचून दाखवलेली ज्ञानेश्वरी, दादाचं शार्दूलविक्रीडातलं पहिलंवहिलं गाणं. (कविता नव्हे. कारण कविता हे फसलेलं गाणं असतं.) बॅण्डपथकातली ॲप्रेंटीसगिरी, सेवादलाच्या कलापथकातली शाहिरी अशी विलक्षण गाण्याची पार्श्वभूमी दादाच्या पाठुंगुळीला आहेय्. माझ्या अंदाजानं दादाला शास्त्रीय संगीत वगैरे बहुधा समजत नसावं, पण माझी खात्री आहेय् की, हा अभिजात संगीत ऐकायला बसला तर, त्यातल्या दर्दी जागा पकडण्याइतका, दादाचा कान तालासुराला पक्का आहेय्...इतर कामांत व्यग्र नसला, न दादाचं तोंड पानासाठी किंवा फेकाफेकीसाठी गुंतलेलं नसलं तर, उरला पुरा वेळ दादाच्या तोंडात गाणं असतं न्

ते नुस्तं नरड्यातच नसतं, तर चालताना, हालताना असली सोंगाड्यासारखं अंगभर लचकत, मुरडत असतंय. मला आठवतंय, मध्यंतरी...पैशेबिशे मिळवल्यानंतर दादानं टेपरेकॉर्डर्सचा दणदणीत शोक केला...

'तिच्या आयला, लय दनादन टेपरेकॉर्डर घेतले. मिळेल ते म्युझिक टेप करून ठेवायचं. मग या गान्याचं तोंड त्या गान्याच्या अंगाला, असं उलटसुलट करून पाहायचं की आणखीन चांगलं गाणं मिळतंय की नाही. नायतर या गाण्याचा ऑर्केस्ट्रा त्या गाण्याला न त्या गाण्याचा दुसऱ्याच कुठल्या गाण्याला.. मग साला एक दिवस डोक्श्यातली टचूब पेटली की, हे काय भलतंच मला व्यसन लागलंय. सालं, पान, तंबाखू ठीक हाय, पण यात भलताच वेळफिळ जायला मागतोय. मग एक दिवस सगळे टेपरेकॉर्डर बंद करून माळचावर टाकले.'

थोडक्यात दादाची स्वदस्तूर शिस्त व्यसनांवर अशी मात करून टाकते. कुणातही, कशातही असं गुंतणं, त्यासाठी फुका वेळ दवडणं हे दादाला मान्य नसावं. मग ती बाई असो बाटली; किंवा खरी मनपसंत गोष्ट—गाणं!

'दादा, तू लावणीपासून गोंधळापर्यंत सगळे गाण्याचे प्रकार तुझ्या सिनेमात वापरलेस, पण अजून भजन अभंगावर आला नाहीस ते का?' अगदी अलीकडे, खरं तर काही कारण नसताना, दादाला उगाउगा विचारलेला प्रश्न. कारण सोंगाड्याला चपखल बसणारं गाणं शृंगारिकच असायला हवं किंवा गोंधळाचं.

दादा मनापासून हसला.

'साला, ते भजनफिजन म्हंजे भलतंच डर वाटायचं बघ. बरं, लिवायचं तरी डिफिकल्टच. पण तू थांब. माझ्या पुढल्या पिक्चरमध्ये खरंच एक भजन टाकलंय. अगदी टाळ, चिपळ्या, मृदंगासकट. ऐकतोस?' मग लगबग करून ते भजन लावणं. जागा घेण्यासाठी मानेला दिलेले लचके, मुरके, तालावर हलवलेलं शरीर.

तरीसुद्धा हे असं आल्यागेल्या मंडळींना पुढल्या चित्रपटातलं गाणं ऐकवत राहणं हा त्या गाण्याचा न् चित्रपटाच्या प्रसिद्धीचा एक सूक्ष्म प्रयत्न आहे, ही गोष्ट डोळ्याआड होत नाहीच.

पुन्हा सोंगाड्याला त्याच्या प्रकृतीबाहेरील भजन देणं अशा तऱ्हेची व्यावसायिक तडजोडदेखील दादा आत्तापर्यंत वारंवार करत आलेला आहे. पहिल्या चित्रपटानंतर 'एकटा जीव सदाशिव'मध्ये दादानं टिंगलीत का होईना, सोंगाड्याची भोंगळ हापपँट फेडून त्याला सूटाबुटांत आणलं होतं. 'आंधळा मारतो एक डोळा'मध्ये डबल रोल करतानाचा दुसरा दादा, थेट फिल्मी कपड्यांत अवतार घेतो. नाही म्हणायला 'पांडू हवालदार'मध्ये तो पुन्हा नीटपणे हाफपँटीत आला. पण कदाचित त्याच्या पुढल्या चित्रपटात भजनाच्यावेळी तो वारकरी सोंग काढण्याची शक्यता नाकारता येत नाहीच.

पण गाणं संगीताच्या बाबतीत मात्र दादानं तडजोडीला फारशी जागा ठेवल्याचं दिसत नाही. जास्त करून त्यानं लोकसंगीताचाच आश्रय घेतला. प्रेक्षकांच्या तोंडात सहजी बसतील अशाच चाली त्यानं बांधून घेतल्या न् तितकीच सुगम गाणी लिहून तरी घेतली किंवा स्वतःच लिहिली. आपल्या डोक्यातील चाल सुगमपणे राबवतील, असेच संगीत दिग्दर्शक त्यानं घेतले. राम कदमसारखा मातब्बर संगीत दिग्दर्शक आपल्याला निश्चित डोईजड होईल, या हिशेबानं दादानं त्यांना फाटा देऊन, प्रभाकर जोगांना म्युझिक दिलं. त्याच्यानंतर रामलक्ष्मणसारख्या नव्या जोडीला संधी दिली. गाण्याच्या प्रसंगातदेखील त्यात कॉमेडीला, नाचाला नीटपणे जागा ठेवल्या. संगीत, गाणी लोकप्रिय होणं म्हणजे चित्रपटाच्या किमान अर्ध्या यशाची गॅरंटी आहे, हे त्यानं बेरकीपणानं हेरून ठेवलं होतं. तरीही दादाच्या सिनेमांतली गाणी कथानकाच्या प्रवाहाला सहसा अडवणारी आढळत नाहीत. ती गाणी त्या प्रसंगातून फुलल्यासारखी वाटतात. अलीकडल्या पांडू हवालदारमध्ये दादा मॅनहोलमध्ये पडून समुद्रालगत गटारातून बाहेर पडतो न् लगेच एक कोळी नाचगाणं चालू होतं. पण पांडू हवालदार यायला अजून पुष्कळ वेळ असायला हवा. हे लिहिताना उगाचच आधलं अर्धवट सोडून पुढं जाण्याचा मोह टाळणं कठीण होऊन बसतं आहे...

'मग सोंगाड्या पिक्चर काढताना तू नवाच, निर्माता म्हणून खूप त्रास झाला असेल नाही?'

'तर. पण खरा त्रास झाला पिक्चर विकताना. आम्ही लय डबे घेऊन ट्रायलबियल दाखवत राहिलो, पण एक डिस्ट्रीब्यूटर पिक्चर घ्यायला तयार झाला नाही. एकानं तर साठ हजारांत देऊन टाका म्हणून सांगितलं. आयला, अडीच लाखाचं पिक्चर साठ हजाराला...'

'दादा, ते सोड. सोंगाड्याची सुरुवात कशी झाली ते नीट सांग' याची गाडी वेळेआधीच स्टेशनावर पोहोचू नये, म्हणून मी दादाला मध्येच सिग्नल दाखवला.

'आयला, पिक्चर कसं स्टार्ट होतं? आपण म्हणलं पिक्चर काढायचं. बाबांनी एक स्टोरीचा सांगाडा आखून दिला. टायटल पण झ्याक सुचवलं, सोंगाड्या. आपून वसंतराव सबनिसांना म्हटलं...ह्या स्टोरीवर पिक्चर लिवा, आपण काढतो...'

[ क्रमशः ]

# इंद्रायणीचे खोरे : पृष्ठ ८ वरून

पण उत्पादन जास्त मिळावे, यासाठी ह्या केंद्रात प्रयोग चालू आहेत. कामशेतच्या तालुका बीजगुणन केंद्रातर्फे शेतकऱ्यांना बियाणे दिले जाते. भाताची शुद्धता राखण्यासाठी एक एक काडी लावून लागवड केली जाते. नगर, सोलापूर, पुणे, सातारा, सांगली ह्या ठिकाणी बियाणे पाठविले जाते.

लोकसंख्या : इंद्रायणीच्या खोऱ्यातील एकूण लोकसंख्येचा विचार करता, नागरी केंद्रातील लोकवस्ती व ग्रामीण भागातील लोकवस्ती असा विचार करावा लागतो. सर्व नागरी केंद्रांवर पुण्याचा प्रभाव व परिणाम जाणवतो. पुणे व भोवतालच्या परिसरात होत असलेला औद्योगिक विकास यामुळे इथल्या खेडयापाडयांतील अनेक लोकांना रोजगार मिळविण्याचे साधन उपलब्ध झाले आहे.

कार्ला, मळवली आणि इतर १८ गावांची एकूण लोकसंख्या ७७६४ इतकी आहे. यांपैकी जवळजवळ ५१ टक्के लोक कामात, रोजगारात, नोकरीपेशात गुंतलेले आहेत. १९६१ च्या जनगणनेनुसार असलेले प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

| प्रकार | संख्या | एकूणपैकी टक्के |
|---|---|---|
| १) शेतीकाम, शेतीवरील कामगार | २९३८ | ७५·०६ |
| २) खाणकाम, मासेमारी, घरगुती लहानमोठे उद्योग. | ३४० | ८·७५ |
| ३) व्यापार व उद्योग | ४४ | १·७५ |
| ४) दळणवळण, वाहतूक | २८६ | ७·३६ |
| ५) इतर सेवा | २७५ | ७·०८ |
| एकूण | ३८८३ | |

ह्यावरून असे ध्यानात येते की, बहुसंख्य लोक शेतीकामात गुंतलेले आहेत. देहूची लोकसंख्या १९,२४२ आहे, त्यापैकी नोकरी व इतर कामात गुंतलेले लोक ६८१२ इतके आहेत. देहूच्या मिलिटरी डेपोमधे अनेक लोक कामावर आहेत. ह्या भागात शेतीचे प्रमाण कमी आहे. तळेगावची लोकसंख्या २४,००० आहे. वाहतुकीच्या चांगल्या सोयी उपलब्ध असल्याने तळेगाव ही एक मोठी बाजारपेठ आहे. देवाण-घेवाणीचे ते एक प्रमुख केंद्र आहे.

वडगाव हे तालुक्याचे ठिकाण. लोकसंख्या ३१२५ इतकी आहे. वडगावातील व्यवसाय करणाऱ्या लोकांपैकी बहुतांश लोक शेती-कामात गुंतलेले आहेत.

उद्योगधंदे : किर्लोस्करांच्या लकाकिव्यतिरिक्त कोणत्याही क्षेत्रातला मोठा कारखाना ह्या परिसरात नाही. फक्त काचधंद्यातील बांगडी व इतर काचसामान तयार करण्याचा कारखाना तळेगाव–दाभाडे येथे आहे. त्याचप्रमाणे रासायनिक उपकरणे, बाटल्या, पेपरवेट, दिव्याच्या चिमण्या इत्यादी मालाचे उत्पादन होते. चिनी मातीच्या बरण्या, कपबशा, निरनिराळ्या आकाराचे सट, ग्लासेस इत्यादी उत्पादनही तळेगाव काचकारखान्यात होते. लष्करी साहित्याचे कारखाने देहू एम्. टी. स्टोअर्स, सेंट्रल प्रोव्हिजन डेपो येथे आहेत. देशात वेगाने होणाऱ्या औद्योगीकरणामुळे मुंबई–पुणे शहराची झपाट्याने वाढ झाली. ह्या दोन शहरांना जोडणाऱ्या हमरस्त्यावरही छोटी छोटी औद्योगिक केंद्रे निर्माण झाली. लोणावळा येथे औद्योगिक सहकारी वसाहत स्थापन झाली.

लोणावळा औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित या संस्थेने सध्या १० प्लॉटस्वर १८ निरनिराळ्या प्रकारच्या शेडस् बांधल्या असून त्यात खालीलप्रमाणे कारखाने चालू आहेत.

| कारखान्याचे नाव | उत्पादन |
|---|---|
| कोडेक्स इंजिनीअरिंग कंपनी | वुडन वॅटस् व फिल्टर प्रेस. |
| महेश फौंड्री | कास्टींग फौंड्री |
| स्टँडर्ड फॅब्रिकेटर्स इंडिया | टेक्स्टाईल मशिनरी व केमिकल प्लॅन्टस्. |
| प्रिंट ओरिजन कंपनी | इलेक्ट्रिकल मोटर्स व अनोडिस |
| भावसार मेटल इंडस्ट्रीज | स्टील युटेन्सिलस |
| पेठे इंजिनीअरिंग अँड कन्स्ट्रक्शन कं. | इलेक्ट्रो मॅग्नेटिक क्लचेस व सर्व ब्रेकस. |
| असोसिएटेड इंजिनीअरिंग कंपनी | फायटोल थ्रस्टर्स इलेक्ट्रो मॅग्नेटिक सेपरेटर्स. |
| छडा इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन | ॲटोमोबाईल्स पार्टस |
| रोबस्टा मशीन मॅन्यु. प्रा. लि. | टेक्स्टाईल मशिनरी |
| सि. जे. इंडस्ट्रीज | पी. व्ही. सी. ग्रीप्स अँन्ड सायकल ॲक्सेसरीज प्रेस्टोसाइन प्रेस्टोग्राफ |
| मोनसॅन्टो केमिकलस प्रा. लि. | फॉर्म्युलेशन युनिट फॉर ॲग्रिकल्चर |
| अक्षर मुद्रणालय | सर्व प्रकारची पुस्तक छपाई |
| पाम इंडस्ट्रीज | ग्लास रिफ्लेक्टर्स व हिट रेझिस्टन्स फलडलाईट कव्हर्स. |

याखेरीज सरस्वती प्रा. लि., अशोक मॅन्युफॅक्चरर्स अँन्ड गिल्डर्स-मध्ये हॉस्पिटलसाठी लागणारे लोखंडी सामान, टेक्स्टाईलकरता लागणारे प्लॅस्टिक पार्टस् तयार होतात. लुणावत सॉ मिल्स असोसिएटेड इंजिनिअरिंग कंपनी, तयार कपडे बनविणारे मॉडर्न ड्रेसेस इत्यादी उद्योगधंदे आहेत.

लोणावळ्याहून वडगावकडे आलो की काही कारखाने दृष्टीस पडतात.

| कारखान्याचे नाव | उत्पादन |
|---|---|
| १) अंबिका कन्फेक्शनरी | रेवडी, चॉकलेट, टॉफी, चिक्की |
| २) धोंडे बंधू | कांडी कोळसा |
| ३) भंडारी क्रॉसफील्डस् | पोल्ट्री फीड |

तळेगावला अनेक नवीन छोटे उद्योगधंदे सुरू झाले आहेत. त्यामुळे तळेगावची औद्योगिक प्रगती झपाट्याने होत आहे.

| कारखान्याचे नाव | उत्पादन |
|---|---|
| १. पैसाफंड काचकारखाना | काच सामान |
| २. शारदा बँगल्स | बांगडी (काच) |
| ३. ठाकूर ऑटो पार्ट | ऑटो स्पेअर पार्ट |
| ४. एल्डा इंजिनिअरिंग | लोखंडी पार्ट |
| ५. इगल व्हॅक्युम बॉ. मॅ. कं. | थर्मास |
| ६. मेमे इंजिनिअरिंग वर्क्स | लोखंडी पार्टस् |
| ७. तपोधाम इंडस्ट्रीज | लोखंडी पार्टस् |
| ८. ॲटम प्लास्ट | प्लॅस्टिक पावडर |
| ९. कावले कन्स्ट्रक्शन | प्लॅस्टिक सामान |
| १०. लिंबा इंडस्ट्रीज | खडू |
| ११. स्लिग इंडस्ट्रीज | पॅकिंग (पुठ्ठे) |
| १२. मुद्रण विद्या मंदिर | छपाई |
| १३. कल्पना प्रिंटिंग प्रेस | छपाई |
| १४. प्रकाश प्रिंटिंग प्रेस | छपाई |
| १५. भारत कंडेन्सर | मशिन पार्ट |

चाकणला महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस व लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस आहे. कन्फेक्शनरी तयार करण्याचा देशमुख बेकरी प्रॉडक्टस् हा कारखानाही चाकणला आहे. खाद्यतेल तयार करणारा विकास उद्योग इंडस्ट्रीज, देशमुख इंजिनिअर्स, चाकण ऑईल मिल्स हे उद्योगधंदे चाकणला आहेत. वर्षा ऑईल मिल्स हा एकच कारखाना आळंदीला आहे. अद्यापही इंद्रायणीच्या परिसरात औद्योगिक विकासाला भरपूर वाव आहे.

शिक्षण : बहुतेक सर्व गावी मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. माध्यमिक शाळा १९ गावी आहेत. औन्धा, आळंदी, आकुर्डी, आंबले, चऱ्होली खुर्द, कांबळी, देहू, देहू रोड, इंदुरी, कामशेत, कार्ला, मोशी, महाळुंग, मालेगाव सांगवी ह्या गावी प्रत्येकी १ माध्यमिक शाळा आहे. लोणावळा व तळेगाव येथे (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालये आहेत. लोणावळ्याला सहा शाळा, तळेगावला तीन व वडगावला तीन माध्यमिक शाळा आहेत. □

---

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १।५।७६ ते ७।५।७६

**मेष : कामांना वेग आणा**

वृषभ चंद्रावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. आठवड्याच्या मध्यावर म्हणजे ४ मेला मंगळ चौथा होत आहे, त्यापूर्वी तुमची महत्त्वाची कामे उरकून घ्यावी. कारण शनी-मंगळ सुखस्थानी बसून तुमचे मानसिक स्वास्थ्य हरवून टाकण्याच्या कारवाया करणार आहेत. एकटा गुरू हाच तेवढा सध्या तरी तुमचा त्राता आहे. यावेळी कोणतेही नवे पाऊल उचलू नका. नवी योजना उद्योगधंद्यात जारी करू नका. कारखानदारांनी, कामगारांसाठी सध्या तरी नवे कोणतेच प्रतिकूल पाऊल उचलू नये. नोकरीत वरिष्ठांच्या दडपणाखाली राहावे लागेल. चुका तर होत नाहीत ना, अशी गर्भित भीती सारखी वाटत राहील. पण ती शेवटी फोल ठरेल. पैसा मिळण्यात कमतरता नाही. उष्ण प्रकृतीच्या लोकांना तब्येत त्रासाची होऊन बसेल. शुभ दिनांक १–४–५

**महिलांना :** गरोदर स्त्रियांनी तब्येतीची जास्त जपणूक करावी. नोकरीत प्रतिकूलता नाही.

**विद्यार्थ्यांना :** स्वतःला मोहाचे बळी होऊ देऊ नका. चांगल्या संगतीत राहा.

**वृषभ : डोकेदुखी कमी होईल**

राशीत चंद्र असतानाच आठवड्याची सुरुवात होत आहे. मंगळ दि. ४ ला तिसरा होत आहे. ही ग्रहरचना 'दगडापेक्षा वीट मऊ' इतक्या सुधारणेची असली, तरी ती मनाला थोडी प्रसन्नता आणील. अनेक गुंतागुंतीच्या समस्यांनी व आर्थिक कोंडीने तुमच्या डोक्यावर जे 'ओझे' निर्माण केले आहे त्यात निश्चित सुधारणा होईल. गुंतागुंत सुटण्याच्या दृष्टीने मार्ग सापडेल. एखाद्या प्रश्नाची टांगती तलवार डोक्यावर असेल, तर तिचा निरास होईल. अनेकांचे सहकार्य अपेक्षेपेक्षा जास्त मिळेल. नोकरीत आजवर मिळवलेला चांगुलपणा टिकून राहील. गुणांचे व कार्यक्षमतेचे चीज होईल. वरिष्ठांच्या मर्जीचा वारा तुमच्या वाट्यास येईल. सर्वच अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, तरी आशा-आकांक्षांना स्फूर्ती मिळेल. आर्थिक बाजू बांधली जाईल. बेकारांचा वनवास संपेल. शुभ दिनांक २–४–५

**महिलांना :** या आठवड्यात करमणूक घडेल. धंद्यात ठरवलेले बेत तडीस जातील.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहील. चांगुलपणाचा प्रत्यय येईल. गुणांना वाव मिळेल.

**मिथुन : कटकटीला उतार**

व्ययस्थानी चंद्र असताना हा आठवडा सुरू होत असला तरी दि. ४ पासून मंगळ दुसरा होत असल्यामुळे तुम्हाला बरेच हायसे वाटेल. अनेक दिवस नाना प्रकारच्या कटकटींनी तुम्हाला अगदी जिकीरीस आणले होते. नोकरीतील दगदग काय, शारीरिक त्रास काय, की पैशासाठी वणवण काय काही विचारू नका. यातला एखादा प्रश्न मार्गी लागला असेल. बाकीच्या प्रश्नांची उकल या आठवड्यात दृष्टिपथात येईल. तुमच्या प्रयत्नांचे मोठे फळ तुमच्या पदरात पडेल. स्थावर, घर, शेतीवाडी या बाबतीत काही अडचणी निर्माण झाल्या असतील तर त्या अडचणींचा योग्य प्रकारे निरास होईल. अगदी कर्जमुक्त झाला नाहीत, तरी जबाबदारीचे व चिंतेचे ओझे कमी झाल्यासारखे वाटेल. नोकरीत दगदग कमी होईल. वरिष्ठांची थोडी माणुसकी वाट्याला येईल.

दुरावलेली माणसे पुन्हा तुमची विचारपूस करू लागतील. शुभ दिनांक ३–६–७

**महिलांना :** गुदमरलेल्या मनाला गार वाऱ्याची झुळूक मिळेल. मन प्रसन्न होऊ लागेल.

**विद्यार्थ्यांना :** पेपर्स कसे गेले ही काळजी मुळीच करू नका. दैवाचा हात मिळणार आहे.

**कर्क : नोकरीत अधिकारवाढ**

लाभस्थानी चंद्र असताना हा आठवडा उगवत आहे हा एक अपूर्व योगायोगच म्हणावा लागेल. पैशाच्या काळजीने ताणलेले तुमचे मन आता समाधानाचा सुस्कारा सोडील. कारण दि. ४ पासून व्ययस्थानी ठाण मांडून बसलेला मंगळ राशीवर येत आहे. राशीतच असलेल्या शनीला म्हणजेच त्याच्या उपद्व्याला, तो मदत करणार असला तरी, त्यामुळे तुमच्या यशात कोणतीच उणीव भासणार नाही. अंगावर घेतलेली जबाबदारी किंवा नोकरीत वरिष्ठ दर्जाची तुमच्यावर सोपवलेली कामगिरी तुम्ही समर्थपणे पार पाडाल. सरकारी नोकरीत असलेल्या व्यक्तींना प्रमोशन मिळू शकेल. हाताखालची माणसे आजवर सहकार्य देत नव्हती ते सहकार्य आता मिळणार आहे. पैशाची अडचण भासणार नाही. पत्रव्यवहारातून न झालेले काम समक्ष भेटीतून होऊ शकेल. शुभ दिनांक २–३–६

**महिलांना :** साहित्याला प्रसिद्धी मिळेल. अपूर्व व अनपेक्षित भेटीचा एखादा मनोहरी क्षण या वेळी अनुभवू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** नैराश्य इतिहासजमा झाले असून उत्साहाचे नवे पर्व सुरू होईल.

**सिंह : व्ययस्थानी शनी–मंगळ**

तुम्हाला साडेसाती सुरू असली तरी, त्याचा ठसठशीत जाणवणारा अनुभव तुम्हाला आजवर आला नव्हता. आता तसा अनुभव येणार असेल तर, मनाचा तोल याही परिस्थितीत तुम्ही ढळू देणार नाही. यातच तुम्ही मोठी लढाई जिंकली आहे असे म्हणता येईल. राजकारणात कधी भरती तर कधी ओहोटी येत असते. आध्यात्मिक वृत्तीने त्याचा उपभोग भोगणे शेवटी सुखाचे ठरते. म्हणूनच शनी–मंगळ हे दोन परस्पर भिन्न गुणांचे ग्रह एकत्र व्ययस्थानी आले असतानाच तुमची खरी कसोटी लागणार नाहे. दोघांच्या भांडणात तुम्ही मध्येच सापडले गेल्यास तोल ढळू देऊ नका. कारण काही झाले तरी, भाग्यस्थानी असलेला गुरू तुमची अप्रतिष्ठा होऊ देणार नाही. राजकारणात यावेळी तुम्ही 'मला नको' आहे. तुम्ही म्हटल्यास 'तुम्हीच का' म्हणून मान तुमच्याकडे चालत येईल. नोकरीत तुम्हीच वरिष्ठ होऊ शकाल. उद्योगधंद्यात बराच पैसा खर्च होईल. त्यासाठी कर्जही काढावे लागेल. प्रवासात काही अनपेक्षित घटना घडून येतील. वैवाहिक जीवन सुख घेऊन येईल. शुभ दिनांक–३–४–६

**महिलांना :** माहेरचा राग कमी होईल. भाऊबंद आपुलकीने वागतील.

**विद्यार्थ्यांना :** अनाठायी खर्चाला आळा घाला. हौसेपायी फसवणूक होण्याचा संभव आहे.

**कन्या : आर्थिक सुधारणा**

भाग्यस्थानी चंद्र असताना हा आठवडा उगवत आहे, ही भाग्यकारक घटनाच होय. कन्या व्यक्ती, सार्वजनिक व अनेक बाबतीत आज आघाडीवर आहेत, पण तब्येतीचे वरदान मात्र त्यांना लाभत नाही. त्यामुळे परिश्रमाचे फल हाती पडले तरी, त्याचा उपयोग करून घेण्याइतका शारीरिक उत्साह शिल्लक राहणार नाही. या आठवड्यापासून उन्हाळ्याच्या निमित्ताने उद्भवलेले डोळ्याचे; हातापायाचे आजार कमी होऊ लागतील. उत्साहात थोडी वाढ होईल. प्रामुख्याने दि. ४ च्या मंगळाच्या राश्यांतरापासून आर्थिक कोंडी फुटेल. अडचणींवर मात करण्याचा मार्ग सापडेल. यावेळी तुम्ही लॉटरीचे तिकीट घ्या. नोकरी धंद्यात साशंक मनाचे प्रतिबिंब उमटेल. कामाचा ताण असला तरी, सहकार्यही मिळेल. आवश्यक पत्रव्यवहार हातून पार पडेल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. शुभ दिनांक १–४–५

**महिलांना :** उधळपट्टी थांबवणे आवश्यक आहे. नोकरीत त्रास नाही. पत्रव्यवहारास अचूक परिणाम साधता येईल.

**विद्यार्थ्यांना :** चंचल मन नियंत्रणाखाली ठेवणे आवश्यक आहे. मित्रपरिवार चांगला ठेवा. त्यामुळे आनंद मिळेल.

**तूळ : नोकरीत प्रमोशन**

आठवा चंद्र स्थावराच्या बाबतीत एखादे नवे प्रश्नचिन्ह उभे करण्याची शक्यता दृष्टिआड करू नका. पोहोण्याची ज्यांना आवड आहे आणि जे पोहोण्यात प्रवीण आहेत, त्यांनीदेखील बेसावध राहून चालणार नाही, पण एवढी उणीव सोडली तर, दि. ४ चे मंगळाचे दशमस्थानी होणारे राश्यांतर अनेक पटींनी तुम्हाला लाभदायक ठरणार आहे. अधिकार, सन्मानाचा योग, प्रतिष्ठेची झेप, उद्योगाची चलती, पैशाची उलाढाल असे अनेक चांगले अनुभव हा मंगळ आणून देणार आहे. या ना त्या कारणामुळे थांबलेले प्रमोशन अनपेक्षितपणे तुमच्या पदरी पडले तर, आश्चर्य वाटू नये. हा फार छान सप्ताह आहे. कष्टाच्या जागी झालेली बदली यावेळी तुम्ही रद्द करून घेऊ शकाल. बेकारांच्या मनाची आजवर होत असलेली उलघाल आता बंद होणार आहे व अपेक्षा पूर्ण होणार आहे, शुभ दिनांक १–३–४

**महिलांना :** कलावंत महिलांना चांगले दिवस आहेत. सिनेमा, नाटचक्षेत्रात वावरणाऱ्या स्त्रियांना प्रसिद्धी व पैसा भरपूर मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** हा आठवडा फार छान आहे. प्रगतीला वाव मिळेल. गुण प्रदर्शित होतील.

**वृश्चिक : अनुकूलतेची चाहूल**

गेल्या आठवड्यापेक्षा काही तरी वेगळाआगळा सुखकर असा अनुभव हा आठवडा आणून देणार आहे. राशीस्वामी मंगळ दि. ४ पासून भाग्यस्थानी प्रवेश करीत आहे. त्यावेळेपासूनच तुमचे अनेक प्रश्न अडचणींवर मात करून मार्गी लागतील. राहू, केतू व हर्षल व्ययस्थानी आले तरी ते आता तुमचे काहीही प्रतिकूल करू शकणार नाहीत. आता आत्मविश्वास वाढेल. त्रास व संकटे यांवर मात करण्याचे मार्गपण सापडतील. निराशा व हतबलपणा आता सोडून देऊन कोणतेही नवे पाऊल उचलण्यासाठी सज्ज व्हा. अपेक्षित पत्रव्यवहार होईल. ज्यांच्या गाठीभेटी

घ्यायच्या असतील त्यांच्या गाठीभेटी होतील. त्यांचे सहकार्य मिळेल. नोकरीत, कामाच्या कटकटीत तुम्ही गांजले असाल तर, तो ताण कमी होईल. कामात बदल होईल. उद्योगातील अडचणींवर मात कराल. बँकेची कामे होतील. शुभ दिनांक ३–४–६.

**महिलांना :** नोकरीत तुमचे मनोरथ पूर्ण होतील. आशा फलवतील. उत्साह द्विगुणीत होईल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश पदरात पडेल. संशोधनात रस वाटेल. वाङ्मयात भाग घ्या.

## धनु : पैसा मिळेल

आठवड्याची सुरुवात जरी काहीशी कंटाळवाणी झाली, तरी सोमवारनंतर सर्वच बाबतीत चांगले वातावरण होईल. प्रामुख्याने दि. ४ रोजी मंगळाने मिथुन रास सोडली की, सांसारिक जीवनात थोडीफार शीतलता निर्माण होईल. घरात अनेक दिवस ठाण मांडून बसलेला आजार, उष्णतेचे विकार हळूहळू कमी होऊ लागतील. अंगात उत्साह संचारू लागेल. नोकरीत अनुकूल वातावरण राहील. सहकार्य चांगले मिळेल. कामात कार्यक्षमता वाढेल. कोणतीही जबाबदारी अंगावर टाकली तरी, ती पार पाडण्याचे मानसिक धैर्य व आत्मविश्वास जागा होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. वरिष्ठांकडे तुमच्या काही मागण्या असल्यास त्या तुम्ही त्यांच्याकडे मांडू शकता. शुभ दिनांक २–४–५

**महिलांना :** शनीबरोबर मंगळदेखील आठवा झाला आहे. आर्थिक परिस्थिती सुधारेल. स्थावरात अगर लॉटरीसारख्या मार्गात पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** वाहन फार वेगाने चालवण्याचा मोह टाळणे आवश्यक आहे. पैशाच्या अडचणी नाहीत. संशोधनाकडे मन वळेल.

## मकर : सावधगिरीने वागा

मकर राशीच्या व्यक्ती सध्या तरी टॉपला आहेत. पण जीवनातली चढण आणि उतरण कायम राहात नाही हा नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपल्या भोवती प्रतिकूल ग्रहांची जमवाजमव सुरू झाली आहे, होत आहे. चंद्रासमोर शनी आहे. त्याला भेटण्यासाठी दि. ४ रोजी मंगळ येत आहे. प्रत्यक्ष भेट जरी पुढच्या आठवड्यात होत असली, तरी शनि-मंगळाचे हे 'जवळ येणे' म्हणजे 'सावध रहा' असाच इशारा होय. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिकोनातून सांगणे आवश्यक आहे. यावेळी नोकरीत डोळ्यात तेल घालून जपणे आवश्यक आहे. कोणत्याही मोहातून आगामी संकटाची गुंफण होऊ शकेल. कामाचा ताण पडेल. सहकारी मनापासून सहकार्य देणे कठीण आहे. आर्थिक बाजू जरी कमकुवत झाली नाही, तरी पैसे मिळवण्यासाठी उत्साहच राहणे कठीण. शुभ दिनांक १–४–५.

**महिलांना :** मुलांच्या बाबतीत भारी श्रम होतील. काळजी करण्यासारखे फारसे काही नसले, तरी बेदरकारपणा उपयोगी नाही.

**विद्यार्थ्यांना :** वागण्यात कंटाळवाणा वेळ जास्त येईल. आळस व उदासीनता याची वाढ होईल.

## कुंभ : नव्या पर्वाची सुरुवात

पाचवा मंगळ चार तारखेपासून कर्क राशीत प्रवेश करीत आहे. शनीची त्याची प्रत्यक्ष भेट जरी पुढच्या आठवड्यात होणार असली, तरी त्या दोघांच्या 'योजना' मात्र 'संयुक्त'पणे आताच आखल्या जाणार आहेत. शत्रुस्थानी असे ग्रह असावेत. मित्रहो, तुमचे विरोधक आता संपले आहेत याची खात्री बाळगा. आता कुणीही स्पर्धक तुमच्याबरोबर स्पर्धा करणार नाही. तुम्हाला विरोध करणार नाही. तुमच्या जीवनात एका नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. नोकरी व्यवसायाची स्थिती एकंदरीत चांगलीच सुधारणार आहे. तुमचा कोणताही उद्योग असो, मंदीच्या लाटेतून तुम्ही पोहून बाहेर पडला आहात असाच अनुभव येईल. नोकरीत तुमच्या प्रामाणिक सेवेची पावती पगारवाढ, भत्तावाढ किंवा मोठे प्रमोशन देऊन तुम्हाला मिळणार आहे. शुभ दिनांक २–३–५.

**महिलांस** तुम्ही जरी त्रास घेऊन काम केले, तरी त्याचे चीज आता होणार आहे. नोकरीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** तुम्हाला हा आठवडा छान आहे. शैक्षणिक प्रगती व आर्थिक स्वास्थ्य मिळेल. महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन मिळेल.

## मीन : प्रगतीकडे वाटचाल

हा आठवडा तुम्हाला मागच्यापेक्षा प्रगतीचा व मन उत्साही ठेवणारा आहे. मंगळ दि. ४ पासून पाचवा होणार आहे. शनी-मंगळ यांची प्रत्यक्ष भेट जरी पुढील आठवड्यांत होणार असली, तरी त्याची चाहूल याचवेळी लागणार आहे. नोकरीत तुम्ही जर वरिष्ठ दर्जाची परीक्षा दिली असेल, तर तुमचा फायदा होईल. यश पदरी पडेल. व्यावसायिक क्षेत्रात काही तरी घवघवीत घडणार आहे. चालू उद्योगात भागीदारी घेण्याचा विचार करायला हरकत नाही. एखादी नवी योजना प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने विचार करा. प्रामुख्याने प्रकाशन, मुद्रण, इंजिनियरिंग उद्योग, वर्कशॉप, धान्य व्यापार, उंची कपडे हा व्यवसाय मंदीत जाणार नाही. नोकरीत बदली व बढती मिळण्याची शक्यता आहे. बेकारांना मिळालेले आश्वासन यावेळी प्रत्यक्षात उतरेल. शुभ दिनांक ३–४–६.

**महिलांस :** नोकरी करून अभ्यास करता येईल. एखादा कोर्स घ्यावा. माहेरवास घडेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत तुम्ही केलेल्या परिश्रमाचे गोड फळ पदरात पडेल. जवळपासचा प्रवास घडेल. ☐